

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

मूळ संस्कृत

रामायण

६

मराठी श्लोक

श्री. श्याम

कुलकर्णी



अयोध्याकांड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

-श्रीवाल्मिकी रामायण-

खंड ६- अयोध्याकांड

मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

-श्रीवाल्मिकी रामायण – खंड ६

मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, "गन्धार" फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ९ जून २०२३ (रामनवमी शके १९४५)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)

यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त.

लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी

Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्ह्यायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)



श्याम कुलकर्णी

श्रीवाल्मिकी रामायण- १ ते ५ वाचण्या-साठी खालील मुखपृष्ठांवर क्लिक करावे

- अथ श्रीवाल्मिकी रामायण- ६

अयोध्याकाण्ड सर्ग 14

पुत्रशोकार्दितं पापा विसंज्ञं पतितं भुवि ।
विचेष्टमान्मुत्प्रेक्ष्य ऐक्ष्याकमिदमब्रवीत ॥1॥

पुत्रशोके भूमिवरि पतिता इक्ष्वाकुनन्दन ।
कैकेयी पापिणी त्याला अवस्थेत अश्या म्हणे ॥1॥

पापं कृत्वेव किमिदं मम संश्रुत्य संश्रवम ।
शेषे क्षितितले सन्न: स्थित्यां स्थातुं त्वमर्हसि ॥2॥

मागता वर मी पाप केल्यापरि सुन्न होउनी ।
धराशायी होता का हे न आपणा शोभते ॥2॥

आहु: सत्यं हि परमं धर्म धर्मविदो जना:।
सत्यमाश्रित्य च मया त्वं धर्म प्रतिचोदित: ॥3॥

सत्य हा परमधर्म असे धर्मज्ञ सांगती ।
सांगते सत्याधारे मी कराया धर्मपालन ॥3॥

संश्रुत्य शैब्य: श्येनाय स्वां तनुं जगतीपति:।
प्रदाय पक्षिणे राजा जगाम गतिमुत्तमम् ॥4॥

पृथ्वीपति शिबी राजा ससाण्या स्वमांस देउनी ।
प्रतिज्ञा पाळुनी त्यास मिळाली उत्तम गति ॥4॥

तथा ह्यलर्कस्तेजस्वी ब्राह्मणे वेदपारगे ।
याचमाने स्वके नेत्रे उधृत्याविमना ददौ ॥5॥

तेजस्वी अलर्क देई डोळे विद्वान ब्राह्मणा ।
याचना करता त्याने करता न खेद मनी ॥5॥

सरितां तु पति: स्वल्पां मर्यादां सत्यमन्वित:।
सत्यानुरोधात समये वेलां स्वां नातिवर्तते ॥6॥

सत्यानुसारे समुद्र सीमातट स्वभूमिका ।
पर्व समयी कधीही ओलांडुनि जात तो नसे ॥6॥

सत्यमेकपदं ब्रह्म सत्ये धर्मः प्रतिष्ठितः।
सत्यमेवाक्षया वेदाः सत्येनावाप्यते परम् ॥7॥

सत्य हेच परब्रह्म त्यात धर्म प्रतिष्ठित ।
सत्य अविनाशी वेद प्राप्त परब्रह्म त्यामुळे ॥7॥

सत्यं समनुवर्तस्व यदि धर्मे धृता मतिः।
स वरः सफलो मेऽस्तु वरदो ह्यसि सत्तम ॥8॥

तेव्हां अनुसरा सत्य धर्मात जर बुद्धि स्थिर ।
होणे वर सफल सत्य आपण चि जो दिला ॥8॥

धर्मस्यैवाभिकामार्थ मम चैवाभिचोदनम् ।
प्रव्राजय सुतं रामं त्रि:खलु त्वां ब्रवीमहम् ॥9॥

धर्मपालनासाठीच त्रिवार सांगते तुम्हा । ।
गृह त्यागण्या रामास सांगा मम प्रेरित ॥9॥

समयं च ममार्येमं यदि त्वं न करिष्यसि।
अग्रतस्ते परित्यक्ता परित्यक्ष्यामि जीवितम् ॥10॥

प्रतिज्ञापालन तुम्ही जर केले न त्यामुळे ।
उपेक्षित तुम्हापुढती प्राणत्याग करेन मी ॥10॥

एवं प्रचोदितो राजा कैकेय्या निर्विशङ्कया।
नाशकत पाशमुन्मोक्तुं बलिरिन्द्रकृतं यथा ॥11॥

कैकेयी वदे नि:शंक राजा पाशातून त्या ।
शके न सुटण्या जैसा इन्द्रपाशातुनि बलि ॥11॥

इन्द्राने वामनरूपी पाश बळी राजावर टाकला होता तो संदर्भ

उद्भ्रान्तहृदयश्चापि विवर्णवदनोऽभवत ।

स धुर्यो वै परिस्पन्दन्युगचक्रान्तरं यथा ॥12॥

वृषभ आसचक्री बद्ध सुटाया धडपडे जसा ।

तसे हृदय उद्भ्रान्त विवर्ण मुख होतसे ॥12॥

विकलाभ्यां च नेत्राभ्यामपश्यन्निव भूमिप:।

कृच्छ्राद् धैर्येण संस्तभ्य कैकेयीमिदमब्रवीत ॥13॥

पाहण्या व्याकुल नेत्रे काहीही असमर्थ जो ।

परि धैर्ये सावरूनी कैकेयीस वदे असे ॥13॥

यस्ते मन्त्रकृत: पाणिरग्नौ पापे मया घृत:।

सत्यजामि स्वजं चैव तव पुत्रं सह त्वया ॥14॥

पापिणी धरिले हात अग्निसाक्ष समन्त्र जे ।

आज मी करतो त्याग त्यांचा पुत्रासवे तुझ्या ॥14॥

प्रयाता रजनीं देविं सूर्यस्योदयनं प्रति ।

अभिषेकाय हि जनस्त्वरयिष्यति मां ध्रुवम् ॥15॥

सरे रात्र आता देवी लोक सूर्योदयासवे ।

म्हणतील करा शीघ्र रामा राज्याभिषेक तो ॥15॥

रामाभिषेकसम्भारैस्तदर्थमुपकल्पितै:।

रामः कारयितव्यो मे मृतस्य सलिलक्रियाम् ॥16॥

सपुत्रया त्वया नैव कर्तव्या सलिलक्रिया ।

त्यावेळि जमा केलेले साहित्य अभिषेकास्तव ।

वापरून जलाञ्जलि द्या रामाकडुन मृत मला ॥16॥

परि तू स्वपुत्रासह नको देऊ जलाञ्जलि

व्याहन्तास्यशुभाचारे यदि रामाभिषेचनम् ॥17॥

न शक्तोऽद्यास्महं द्रष्टुं दृष्ट्वा पूर्वं तथामुखम् ।

हतहर्ष तथानन्दं पुनर्जनमवाङ्मुखम् ॥18॥

रामाभिषेकात विघ्न आणसी जर पापिणी ॥17॥

जनसमुदाय सुखी उल्लसित जो पाहिला ।

तया हर्षानन्द शून्य पाहण्या शकतो न मी ॥18॥

तां तथा ब्रुवतस्तस्य भूमिपस्य महात्मन: ।

प्रभाता शर्वरी पुण्या चन्द्रनक्षत्रमालिनी ॥19॥

तिजसी बोलता ऐसे महाराज दशरथ ।

नक्षत्रयुक्त टळुनी रात्र प्रभात समीप ये ॥19॥

किमिदं भाषसे राजन् वाक्यं गररूजोपमम् ।

आनयितुमक्लिष्टं पुत्रं राममिहार्हसि ॥21॥

स्थाप्य राज्ये मम सुतं कृत्वा रामं वनेचरम् ।

नि:सपत्नां च मां कृत्वा कृतकृत्यो भविष्यसि ॥22॥

बोलता का असे राजन् वाक्यविष शूलासम ।

श्रीरामा बोलवा येथे तेचि योग्य आपणा ॥21॥

राज्य देउन मम पुत्रा रामा वनि धाडुनी ।

निष्कंटक मज करुनी कृतकृत्य व्हा तुम्ही॥22॥

स तुन्न इव तीक्षेण प्रतोदेन हयोत्तमः।

राजा प्रचोदितोऽभीक्ष्णं कैकेय्या वाक्यमब्रवीत ॥23॥

पीडित प्रतोदे तीक्ष्ण होतसे अश्व उत्तम ।

तसा कैकेयीकडुनी व्यथित राजा बोलला ॥23॥

धर्मबन्धेन बद्धोऽस्मि नष्टा च मम चेतना ।

ज्येष्ठ पुत्रं प्रियं रामं द्रष्टुमिच्छामि धार्मिकम् ॥24॥

धर्मबंधने मी बद्ध चेतना लुप्त हो मम ।

पहाया ज्येष्ठ पुत्रास रामा धार्मिक इच्छितो ॥24॥

ततः प्रभातां रजनीमुदिते च दिवाकरे।

पुण्ये नक्षत्रयोगे च मुहुर्ते च समागते ॥25॥

वशिष्ठो गुणसंपन्नः शिष्यैः परिवृतस्तथा ।

उपगृह्याशु सम्भारान् प्रविवेश पुरोत्तमम् ॥26॥

रात्र जाउन तेव्हा प्रभाते उदिता रवी।
मुहूर्त पुण्यनक्षत्री अभिषेकाचा येतसे ॥25॥
वसिष्ठ गुणसंपन्न शिष्यांसह येति घेउनी ।
सामग्रि अभिषेकाची पुरीत शीघ्र प्रवेशती ॥26॥
सिक्तसंम्मार्जितपथां पताकोत्तम्भूषिताम् ।
संहृष्टमनुजोपेतां समृद्धविपणापणाम् ॥27॥
मार्ग जलसिंचित स्वच्छ पताकांनी विभूषित ।

जन हर्षोत्साहित ते विपणेही समृद्ध ती ॥27॥

महोत्सवसमायुक्तां राघवार्थे समुत्सुकाम् ।

चन्दनागुरुधूपैश्च सरवत: परिधूमिताम् ॥28॥

पुरी महोत्सव सज्ज अभिषेकास्तव राघवा ।

धूप चन्दन सुगन्धाने दिशा सर्व व्यापती ॥28॥

तां पुरीं समतिक्रम्य पुरंदरपुरोपमाम् ।

ददर्शान्त:पुरं श्रीमान् नानाध्वजगणायुतम् ॥29॥

इन्द्रपुरीसम नगरी ओलांडुन अन्त:पुरी ।
वसिष्ठ प्रवेशति जेथे सहस्र ध्वज डोलती ॥29॥

पौरजानपदाकीर्णं ब्राह्मणैरुपशोभितम् ।
यष्टिमद्भि: सुसम्पूर्ण सदश्वै: परमार्चितम् ॥30॥

पौरजन जानपद तैसे ब्राह्मण करति शोभित।
राजसेवक,सुन्दर अश्व उपस्थित त्यास्थळी ॥30॥

तदन्त:पुरमासाद्य व्यतिचक्राम तं जनम् ।

वसिष्ठ: परमप्रीत: परमर्षिभिरावृत: ॥31॥

ओलांडुन त्या जनां सर्व वसिष्ठ परमहर्षित ।

मुनिश्रेष्ठांसवे सर्व अन्त:पुरी प्रवेशती ॥31॥

स त्वपश्यद् विनिष्क्रान्तं सुमन्त्रं नाम सारथिम् ।

द्वारे मनुजसिंहस्य सचिवं प्रियदर्शनम् ॥32॥

सुमन्त्रा पाहती तेथे सचिव सारथीहि जो ।

अन्त:पुर द्वारातुनि निघताना प्रियदर्शन ॥32॥

तमुवाच महातेजा: सूतपुत्रं विशारदम् ।

वसिष्ठ: क्षिप्रमाचक्ष्य नृपतेर्मामिहागतम् ॥33॥

महातेजस्वी वसिष्ठ सूतपुत्रास चतुर त्या ।

सांगती सूचना देण्या नृपास येति ते अशी ॥33॥

इमे गङ्गोदकघटा: सागरेभ्यश्च काञ्चना: ।

औदुम्बरं भद्रपीठमभिषेकार्थमाहृतम् ॥34 ॥

गङ्गाजल भरलेले काही सुवर्ण समुद्रजले ।

कुम्भ तैसे औदुम्बर अभिषेकास आसन ॥34॥

सर्वबीजानि गन्धाश्च रत्नानि विविधानि च ।

क्षौद्रं दधि घृतं लाजा दर्भा: सुमनस: पय: ॥35॥

अष्टौ च कन्या रुचिरा मत्तश्च वरवारण:।

चतुरश्वो रथ: श्रीमान् निस्त्रिंशो धनुरुत्तमम् ॥36॥

वाहनं नरसंयुक्तं छत्रं च शशिसंनिभम् ।

श्वेते व वालव्यजने भृङ्गारं च हिरण्मयम् ॥37॥

हेमदामपिनद्धश्च ककुद्मान् पाण्डुरो वृषः।
केसरी च चतुर्दष्ट्रो हरिश्रेष्ठो महाबलः॥38॥
सिंहासनं व्याघ्रतनुः समिधश्च हुताशनः।
सर्वे वादित्रसङ्घाश्च वेश्याश्चालंकृताः स्त्रियः ॥39॥
आचार्या ब्राह्मणा गावः पुण्याश्च मृगपक्षिणः।
पौरजानपदश्रेष्ठा नैगमाश्च गणैः सह ॥40॥
एते चान्ये च बहवः प्रीयमाणाः प्रियंवदाः ।

अभिषेकाय रामस्य सह तिष्ठन्ति पार्थिवै:॥41॥

बीजे सर्व प्रकाराची, रत्नेही वेगवेगळी ।

रत्ने दूध दही लाजा कुश दर्भ फुले तुप ॥35॥

अष्टसुन्दरी कन्या गजराज मत्त त्यासवे ।

रथ अश्वासह चार तीक्ष्ण खड्ग धनु उत्तम ॥36॥

चंद्रासम शूभ्र छत्र पालखी चवऱ्यांसह ।

झारी सुवर्णाची सवे सुवर्ण माला अलंकृत ॥37॥

सुवर्ण माला मण्डित श्वेत पीत वृषभ उंच ।
आयाळी चार असा सिह बलवान अश्व उत्तम ॥38॥
सिंहासन व्याघ्रचर्म समिधा व हुताशन ।
वाद्ये सर्व गणिकाही अलंकृत सौभाग्यिनी ॥39॥
आचार्य,ब्राह्मण,तायी पवित्र पशुपक्षिही ।
नागरिक गावकरी व्यापारी लोक पुष्कळ ॥40॥
तसे इतर प्रियभाषी प्रसन्न मने उपस्थित ।

पहाया रामाभिषेक सोहळा अतिउत्तम ॥41॥

त्वरयस्व महाराजं यथा समुदितेऽहनि।

पुष्ये नक्षत्रयोगे च रामो राज्यमवाप्नुयात ॥42॥

त्वरा करण्या महाराजा सांगा पुष्यनक्षत्रावरी ।

उगवता सूर्य रामाचा अभिषेक सिद्ध होतसे ॥42॥

इति तस्य वचः श्रुत्वा सूतपुत्रो महाबलः।

स्तुवन् नृपतिशार्दूलं प्रविवेश निवेशनम् ॥43॥

ऐकुनिया वाक्य त्याचे सूतपुत्र महाबली ।
स्तुती करित राजाची प्रवेश भुवनी करी ॥43॥

तं तु पूर्वोदितं वृद्धं द्वारस्था राजसम्मता:।
न शेकुरभिसंरोधुं राज्ञ; प्रियचिकीर्षव:॥44॥

द्वारपाल न शके रोखू वृद्धा सचिवास त्या।
आदेश नृपाचा होता कोणा न रोखणे आता ॥44॥

स समीपस्थितो राज्ञस्तामवस्थामजज्ञिवान् ।

वाग्भि: परमतुष्टाभिरभिष्टोतुं प्रचक्रमे ॥45॥

न जाणुन नृपावस्था जाता जवळि उद्यत ।

संतोषजनक वाक्ये स्तुति त्याची करावया ॥45॥

तत: सूतो यथापूर्वं पार्थिवस्य निवेशने ।

सुमन्त्र: प्राञ्जलिर्भूत्वा तुष्टाव जगतीपतिम् ॥46॥

सुमन्त्र भुवनी हात जोडुनी पूर्विसारखा ।

करण्या महाराजांची स्तुति प्रारंभ तो करी ॥46॥

यथा नन्दति तेजस्वी सागरो भास्करोदये।

प्रीत: प्रीतेन मनसातथा नन्दय नस्तत: ॥47॥

उगवता सूर्य तेजस्वी सागर आनंदवी जना ।

तसे प्रसन्न चित्ताने आपण आम्हा सेवकां ॥47॥

इन्द्रमस्यां तु वेलायामभितुष्टाय मातलि:।

सोऽजयद् दानवान् सर्वांस्तथा त्वां बोधयाम्यहम् ॥48॥

करी स्तुति देवेन्द्राची मातलि देवसारथि ।

दानवां जिंकी जसा तो मी आपणा जागृत करी ॥48॥

वेदा: सहाङ्गा विद्याश्च यथा ह्यात्मभुवं प्रभुम।

ब्रह्माणं बोधयन्त्यद्य तथा त्वां बोधयाम्यहम ॥49॥

वेद सहा अङ्गे विद्या सर्व ब्रह्म्यासही जश्या ।

जागवीती जश्या ब्रह्म्या तसा मी आपणा करी ॥49॥

आदित्य: सह चन्द्रेण यथां भूतधरां शुभाम ।

बोधयत्यद्य पृथिवीं तथा त्वां बोधयाम्यहम ॥50॥

जसा चंद्रासह आदित्य जागवी पृथ्विला शुभ ।

भूता आधार जी तैसा आपणा मी जागृत करी ॥50॥

उत्तिष्ठ सुमहाराज कृतकौतुकमङ्गल:।

विराजमानो वपुषा मेरोरिव दिवाकर:॥51॥

उठा महाराज मङ्गल कार्यास्तव अलंकृत ।

बसा सिंहासनी जणु सूर्य उगवे मेरु पर्वती ॥51॥

सोमसूर्यो च काकुत्स्थ शिववैश्रवणावपि।

वरुणश्चाग्निरिन्द्रश्च विजयं प्रदिशन्तु ते ॥52॥

कुलनन्दन काकुत्स्था सूर्य,अग्नि,इन्द्र,शिव,।

चन्द्र,कुबेर,वरुण विजय देवो आपणा ॥52॥

गता भगवती रात्रि: कृतं कृत्यमिदं तव।

बुध्यस्व नृपशार्दूल कुरु कार्यमनन्तरम् ॥53॥

उलटे रात्र महाराज कार्ये आज्ञापिली आपण।

पूर्ण हे जाणुनी अभिषेक करावा शेष राहिला ॥53॥

उदतिष्ठत रामस्य समग्रमभिषेचनम् ।

पौरजानपदाश्चापि नैगमश्च कृताञ्जलि:॥54॥

रामास अभिषेकाची तयारी पूर्ण होउनी ।

जनपदवासी पौर उपस्थित हात जोडुन ॥54॥

स्वयं वसिष्ठो भगवान् ब्राहमणै: सह तिष्ठति।

क्षिप्रमाज्ञाप्यतां राजन् राघवस्याभिषेचनम् ॥55॥

स्वत: वसिष्ठ भगवान ब्राह्मणांसह उपस्थित ।

श्रीरामाभिषेकाज्ञा द्यावी त्वरित आपण ॥55॥

यथा ह्यपाला: पशवो यथा सेना ह्यनायका:।

यथा चंद्रं विना रात्रिर्यथा गावो विना वृषम् ॥56॥

एवं हि भविता राष्ट्रं यत्र राजा न दृष्यते ।

गुरे गुराख्यावीण सेना सेनापतीविना ।

रात्रीविना जसा चंद्र गायी बैलाविना जश्या ॥56॥

अवस्था तशी राष्ट्राची राजा न दिसता तया ।

एवं तस्य वचः श्रुत्वा सान्त्वपूर्वमिवार्थवत ॥57॥

अभ्यकीर्यत शोकेन भूय एव महीपतिः।

त्याचे वचन ऐकून सान्त्वना सार्थक युक्त ते ॥57॥

पुन्हा दशरथ राजा होति शोकग्रस्त ते ।

ततस्तु राजा तं सूतं सन्नहर्षः सुतं प्रति ॥58॥

शोकरक्तेक्षणः श्रीमानुद्रीक्ष्योवाच धार्मिकः।

वाक्यैस्तु खलु मर्माणि मम भूयो निकृन्तसि ॥59॥

हर्ष मावळलेले पुत्रवियोग कल्पनेमुळे ॥58॥

नेत्र रक्तवर्ण दृष्टि वळवूनि सुताकडे ।

म्हणे आघात करिसी वचने मर्मस्थानी मम ॥59॥

सुमन्त्रः करुणं श्रुत्वा दृष्ट्वा दीनं च पार्थिवम् ।

प्रगृहीताञ्जलिः किंचित् तस्मात् देशादपाक्रमत् ॥60॥

करुण स्वर राजाचे ऐकुनी पाहुनी दीन त्यां ।

सुमन्त्र हात जोडूनी मागे सरती स्थान सोडुनी ॥60॥

यदा वक्तुं स्वयं दैन्यान्न शशान्क महीपति:।

तदा सुमन्त मंत्रज्ञा कैकेयी प्रत्युवाच ह ॥61॥

दु:खे दीन राजा बोलू जेव्हां न शके स्वत:।

तेव्हा सूत्रे जिच्या हाती सुमंत्रा कैकेयी वदे ॥61॥

सुमन्त्र राजा रजनीं रामहरशसमुत्सुक: ।

प्रजागरपरिश्रान्तो निद्रावशमुपागत:॥62॥

सुमन्त्रा रात्रभर राजा विचारे अभिषेक जागृत ।

थकुनी त्यामुळे त्याना निद्रा अता येतसे ॥62॥

तद् गच्छ त्वरितं सूतं राजपुत्रं यशस्विनम् ।

राममानव भद्रं ते नात्र कार्या विचारणा ॥63॥

तेव्हां त्वरित जा सूता राजपुत्र यशस्वि जो ।

रामा घेउनि ये शीघ्र विचार अन्य ना करी ॥63॥

अश्रुत्वा राजवचनं कथं गच्छामि भामिनि ।

तच्छ्रुत्वा मन्त्रिणो वाक्यं राजा मन्त्रिणमब्रवीत ॥64॥

राजाज्ञे'विण कसा जाऊ सुमन्त्र तिजला म्हणे ।

वाक्या ऐकुनिया त्याच्या वदती महाराज त्या॥64॥

सुमन्त्र रामं द्रक्ष्यामि शीघ्रमानय सुन्दरम् ।

स मन्यमान: कल्याणं हृदयेन ननन्द च ॥65॥

आण त्या पाहण्या रामा इच्छितो मी त्वरा करी ।

दर्शनाच्या कल्पनेने आनंदी मनि होतसे ॥65॥

निर्जगाम च स प्रीत्या त्वरितो राजशासनात ।

सुमन्त्रश्चिन्तयामास त्वरितं चोदितस्तथा ॥66॥

सुमन्त्र जाइ आनंदे राजाज्ञेने त्वरा करी ।

चिन्ती परि मनामध्ये त्वरा का करिति अशी ॥66॥

व्यक्तं रामाभिषेकार्थे इहायास्यति धर्मराट् ।

इति सूतो मतिं कृत्वा हर्षेण महता पुन:॥67॥

निर्जगाम महातेजा राघवस्य दिदृक्षया ।

सागरह्रदसंकाशात्सुमन्त्रोऽन्त:पुराच्छुभात ।

निष्क्रम्य जनसम्बाधं ददर्श द्वारमग्नत:॥68॥

वाटे दशरथ राजे धर्मज्ञ अभिषेकास्तव ।
उपस्थित त्यासाठीच विचारे या त्वरा करी ॥67॥
राघवा महातेजस्वी पाहण्या हर्षे जातसे ।
समुद्रातिल जलाशय असे रम्य अन्त;पुर ।
द्वारात गर्दी करिता सुमन्त्र लोकां पाहतो ॥68॥

ततः पुरस्तात् सहसा विनि:सृतो महीपतेरिगतान् विलोकयन् ।
ददर्श पौरान् विविधान् महाधनानुपस्थितान् द्वारमुपेत्य विष्ठितान् ॥69॥

अन्त:पुरातून निघून नृपाच्या द्वारात लोक जमले पहातो ।
सुमन्त्र पाही पुरवासी बहुसंख्य महाधनी अनेक असती तयात ॥69॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुर्दश: सर्ग:॥14॥

अयोध्याकाण्ड सर्ग 15

ते तु तां रजनीमुष्य ब्राह्मणा: वेदपारगा:।
उपतस्थुरुपस्थानं सह राजपुरोहिता: ॥1॥

वेदपारङ्गत ब्राह्मण तसे राजपुरोहित ।
संपता रात्र आज्ञेने राजद्वारि उपस्थित ॥1॥

अमात्या बलमुख्याश्च मुख्या ये निगमस्य च ।
राघवस्याभिषेकार्थे प्रीयमाणा: सुसंगता:॥2॥
मन्त्री प्रमुख सेनानी वैश्य नि साहुकारही ।
अभिषेकार्थ रामाच्या अत्यानन्दे उपस्थित ॥2॥
उदिते विमले सूर्ये पुष्ये चाभ्यागतेऽहनि ।
लग्ने कर्कटके प्राप्ते जन्म रामस्य च स्थिते ॥3॥
अभिषेकाय रामस्य द्विजेन्द्रैरुपकल्पितम् ।
काञ्चना जलकुम्भाश्च भद्रपीठं स्वल्लंकृतम् ॥4॥

रथश्च सम्यगास्तीर्णो भास्वता व्याघ्रचर्मणा ।

गङ्गायमुनयोः पुण्यात संगमादाहृतं जलम् ॥5॥

रवि येता उदयास रामाची जन्मवेळ जी ।

पुष्यनक्षत्र कर्कलग्न स्थिति प्राप्त होतसे ॥3॥

समयी सामग्रि सर्व एकत्र श्रेष्ठ ब्राह्मण ।

करती अभिषेकार्थ रामाच्या संकल्पित ॥4॥

जलकुम्भ सुवर्णाचे ,भद्रपीठ अलंकृत ।

पवित्र गङ्गायमुना संगमजल त्यासवे ।

व्याघ्रचर्माच्छादित रथ सामग्रि सर्व ही ॥4॥

याश्चान्या:सरित: पुण्या ह्रदा: कूपा: सरांसि च ।

प्राग्वहाश्चोर्ध्ववाहाश्च तिर्यग्वाहाश्च क्षीरिण: ॥6॥

ताभ्यश्चैवाहृतं तोयं समुद्रेभ्यश्च सर्वश:।

क्षौद्रं दधिं घृतं लाजा दर्भा: सुमनस: पय:॥7॥

अष्टौ च कन्या रुचिरा मत्तश्च वरवारण:।

सजला: क्षीरिभिश्छन्ना घटा: काञ्चनराजता: ॥8॥

पद्मोत्पलयुता भान्ति पूर्णा: परमवारिणा ।

अन्य सरिता पुण्या जलाशय कूप सरोवर ।
पूर्ववाहिनी तैश्या उत्तर दक्षिण वाहिनी॥6॥
नद्या सरोवर ज्यांचे जल दुग्धापरि निर्मल।
त्यासवे सागराचेही जल संग्रही आणखी ॥7॥
दुध,दही,घृत तैस्या अष्टकन्याहि सुन्दर ।
मदमत्त गजराज,पल्लवाच्छादित घट ॥8॥
सुवर्ण,रुपे यांचे जल उत्तम ज्यात ते ।
चंद्रांशुविकचप्रख्यं पाण्डुरं रत्नभूषितम् ॥9॥

सज्जं तिष्ठति रामस्य वालव्यजनमुत्तमम् ।

चन्द्रकिरणांसम श्वेत कान्तिचा रत्नभूषित ॥9॥

सज्ज रामासाठी राही रथ रत्नजडित उत्तम ।

चंद्रमन्डलसंकाशमातपत्रं च पाण्डुरम् ॥10॥

सज्जं द्युतिकरं श्रीमदभिषेकपुर्स्सरम् ।

चंद्रमण्डल सम श्वेत छत्र परम सुंदर ॥10॥

प्रकाशदायक सुद्धा अभिषेक सामग्रीसह ।

पाण्डुरश्च वृषः सज्जः पाण्डुराश्वश्च संस्थितः॥11॥

वृषभ श्वेत तसा सज्ज श्वेत अश्व असे उभा ॥11॥

वादित्राणि च सर्वाणि वन्दिनश्च तथापरे ।

इक्ष्वाकूणां यथा राज्ये सम्प्रियेताभिषेचनम् ॥12॥

तथाजातीयमादाय राजपुत्राभिषेचनम् ।

ते राजवचनात् तत्र समवेता महीपतिम् ॥13॥

वाद्ये सर्व प्रकाराची स्तुति पाठकही तसे ।

जैसे इक्ष्वाकुराज्यात अभिषेकी आवश्यक ॥12॥

येथे घेउनिया येती राजपुत्राभिषेकास्तव ।

दर्शना आले होते राजाज्ञेने ते घेउनी ॥13॥

अपश्यन्तोऽब्रुवन् को नु राज्ञो नः प्रतिवेदयत ।

न पश्यामश्च राजानमुदितश्च दिवाकरः ॥14॥

यौवराज्याभिषेकश्च सज्जो रानस्य धीमतः।

राजद्वारि म्हणती "कोण देइल सूचना"।

" दिसती न महाराज सूर्योदय होऊनही"॥14॥

"सामग्रि अभिषेकाची श्रीरामाच्या जमविलि"।

इति तेषु ब्रुवाणेषु सर्वास्तांश्च महीपतीन् ॥15॥

अब्रवित तानिदं वाक्यं सुमन्त्रो राजसत्कृत:।

बोलताति असे तेव्हां भूपतींना सर्व तेथिल ॥15॥

वदे त्यां सुमन्त्र ऐसे महाराज सन्मानित ।

रामं राज्ञो नियोगेन त्वरया प्रस्थितो ह्यहम्॥16॥

पूज्या राज्ञो भवन्तश्च रामस्य तु विशेषत: ।

अयंपृच्छामि वचनात सुखमायुष्मतामहम् ॥17॥

आज्ञेने महाराजांच्या त्वरेने जात मी आहे ॥16॥

पुजनीय आपण सर्व महाराजा,रामा विशेषच।

तयांतर्फे विचारीतो सर्वांचे कुशल आपणा ॥17॥

राज्ञ: सम्प्रतिबुद्धस्य चानागमनकारणम् ।

इत्युक्त्वान्त: पुरद्वारमाजगाम पुराणवित् ॥18॥

मग सांगे का न येति श्रीमहाराज बाहेर।

पूर्ववृत्तान्त जाणे जो परते अंत:पुरी पुन्हा ॥18॥

सदा सक्तं च तद् वेश्म सुमन्त्र: प्रविवेश ह।

तुष्टावास्य तदा वंशं प्रविश्य स विशाम्पते:॥19॥

सदैव मुक्त सुमन्त्रा प्रवेशी भवनी पुन्हा ।

महाराज वंशाची स्तुति तो करु लागला ॥19॥

शयनीयं नरेन्द्रस्य तदासाद्य व्यतिष्ठत ।

सोऽत्यासाद्य तु तद् वेश्म तिरस्करनिमन्तरा ॥20॥

आशीर्भिर्गुण्युक्ताभिरभितुष्टाव राघवम् ।

निद्रास्थलि राजाच्या जाउनी राहती उभे ।

अंतर नसे जणु जेव्हां वचने आशीर्वादपर॥20॥

रघुकुलनरेशाची स्तुति ते करु लागले ।

सोमसूर्यौ च काकुत्स्थ शिववैश्रवणावपि ॥21॥

वरुणश्चाग्निरिन्द्रस्य विजयं प्रदिशन्त ते ।

चन्द्रमा, कुबेर,अग्नि,इन्द्र शिव वरुण तसे ॥21॥

विजय प्रदान करोत हे ककुत्स्थनन्दना ।

गता भगवती रात्रिरह: शिवमुपस्थितम् ॥22॥

बुध्यस्य राजाशार्दूल कुरु कार्यमनन्तरम् ।

रात्र संपून दिन येत राजसिंहा व्हा जागृत ॥22॥

कार्य जे करणे आहे त्यासाठी तयार व्हा ।

ब्राह्मणा बलमुख्याश्च नैगमाश्चागतास्त्विह ॥23॥

दर्शनं तेऽभिकांखन्ते प्रतिबुध्यस्व राघव ।

सेनापति ब्राह्मण सर्व साहुकारहि येउनी ॥23॥

दर्शना उत्सुक ते व्हा रघुनन्दन जागृत ।

स्तुवन्तं तं तदा सूतं सुमन्त्रं मन्त्रकोविदम् ॥23॥

प्रतिबुध्य ततो राजा इदंवचनमब्रवीत् ।

आर्जव कुशल सूत सुमन्त्र करता स्तुती ॥24॥

होउनी जागृत राजा त्याला ऐसे म्हणतसे ।

राममानेय सूतेति यदस्यभिहितो मया ॥25॥

किमिदं कारणं येन ममाज्ञा प्रतिवाह्यते ।

न चैव सम्प्रसुप्तोऽहमानयेहाशु राघवम् ॥26॥

रामा घेउनि ये ऐसे आज्ञापिले असता तुज ॥25॥

काय कारण आज्ञेचे मम पालन होत ना ।

नसे मी सुप्त रामाला त्वरित येथे आणवा ॥26॥

इति राजा दशरथः सूतं तत्रान्वशात् पुनः।

स राजवचनं श्रुत्वा शिरसा प्रतिपूज्य तम् ॥27॥

निर्जगाम नृपावासान्मन्यमानः प्रियं महत् ।

प्रयत्नो राजमार्गं च पताकाध्वजशोभितम् ॥28॥

ऐसे दशरथ राजा पुन्हा बोलता सुता ।
ऐकुनी नृपवचना शिरसावंद्य करोनिया ॥27॥
राजभवन सोडून निघे मनी तुष्ट होउनी ।
येतसे राजमार्गात पताकांनी सुशोभित ॥28॥

हृष्ट; प्रमुदित: सूतो जगामाशु विलोकयन् ।
स सूतस्तत्र शुश्राव रामाधिकरणा: कथा:॥29॥
अभिषेचनसंयुक्ता: सर्वलोकस्य हृष्टवत् ।

सुत हर्षोल्हासे युक्त निघे सुमन्त्र तेथुनी ।
पथातुनि जाता ऐके आनंदे जन बोलता ॥29॥
राज्याभिषेक रामास वार्ता सर्वांच्या मुखी ।
ततो ददर्श रुचिरं कैलाससदृशप्रभम् ॥30॥
रामवेश्य सुमन्त्रस्तु शक्रवेश्मसमप्रभम् ।
महाकपाटपिहितं वितर्दिशतशोभितम् ॥31॥
श्रीरामाचे तदा पाही कैलाससदृश स्थल ॥30॥
असे दीप्तिमान जैसे इन्द्राचेच असे गृह ।

विशाल प्रवेशद्वार वेदिकांनी सुशोभित ॥31॥

काञ्चनप्रतिमैकाग्रं मणिविद्रुनतोरनम् ।

शारदाघनप्रख्यं दीप्तं मेरुगुहासमम् ॥32॥

अग्रभागी देवदेवता सुवर्ण प्रतिमा बाह्याद्वारी मणि तोरणे ।

भित्ति सुशोभित मुक्तामणिनी चन्दन अगर सुगन्धित ते ॥32॥

मणिभिर्वरमाल्यानां सुमहद्भिरलंकृतम् ।

मुक्तामणिभिराकीर्णं चन्दनागुरुभूषितम् ॥33॥

भवन अलंकृत सुवर्णपुष्प मालांनी मणियुक्त ।

भिन्तीवरती मुक्तामणि चमकुनी दीप्तित होत ॥33॥

गन्धान् मनोज्ञान् विसृजद् दार्दुरं शिखरं यथा ।

सारसैश्च मयूरैश्च विनदद्भिर्विराजितम् ॥34॥

सुगन्ध पसरे जैसा दार्दुर शिखरी मनोहर ।

सारस मयूर शोभा वाढवीति कलरवे ॥34॥

सुकृतेहामृगाकीर्णमुत्कीर्ण भक्तिभिस्तथा ।

मनश्चक्षुश्च भूतानामाददत तिग्मतेजसा ॥35॥

सुवर्णाकृति प्राण्यांच्या भिंतीवरति रेखुनी ।

कलाकार कलेने मन नेत्रांस टाकती मोहुनी ॥36॥

चन्द्रभास्करसंकाशं कुबेरभवनोपमम् ।

महेन्द्रधामप्रतिमं नानापक्षिसमाकुलम् ॥37॥

चन्द्रसूर्यापरि तेजस्वी कुबेर भवनासम ।

इन्द्रधामसम भवनी नाना पक्षि विहरती ॥37॥

मेरुश्रुङ्गसमंसूतो रामवेश्म ददर्श ह ।

उपस्थितै: समाकीर्ण जनैरञ्जलिकारिभि:॥37॥

मेरुशिखरासम पाही रामभवना सुत ।

वन्दाया रामचंद्रास असंख्य जमती जन ॥37॥

उपादाय समाक्रान्तैस्तदा जानपदैर्जनै: ।

रामाभिषेकसुमुखैरुन्मुखै: समलंकृतम् ॥38॥

उपहार घेउनी विविध प्रसन्न जनपद गण ।

उपस्थित उत्कंठेने शोभा भवना आणिती ॥38॥

महामेघसमप्रख्यमुदग्रं सुविराजितम् ।

नानारत्नसमाकीर्णं कुब्जकैरपि चावृतम् ॥39॥

राजभवन विशाल महामेघखंडापरी ।

भिंती रत्नजडित सेवकांनी भरे तसा ॥39॥

ततः समसाद्य महाधनं महत प्रहृष्टरोमा स बभूव सारथिः।

मृगैर्मयूरैश्च समाकुलोल्बणंगृहं वराहस्य शचीपतेरिव ॥41॥

शचिपति इन्द्रभवनापरि श्रीराम भवन विशाल समृद्ध सुशोभित।

मृगे मयूरे फिरती वाढविति शोभा पाहुनि विस्मित सूत सुमन्त्र ॥41॥

स तत्र कैलासनिभाः स्वलंकृताः प्रविश्य कक्ष्यास्त्रिदशालयोपमाः।

प्रियान् वरान् राममते स्थितान् बहून् व्यपोह्य शुद्धान्तमुपस्थितो रथी

॥42॥

कैलास की स्वर्ग अशी शोभा पहात पायऱ्या सोडुनी रथे जात ।
ओलांडुनि जना श्रीराम आज्ञांकित सुमन्त्र अन्त:पुर द्वार उपस्थित ॥42

स तत्र शुस्राव च हर्षयुक्ता रामाभिषेकार्तकृतां जनानाम् ।
नरेन्द्रसूनोरभिमङ्गलार्था: सर्वस्य लोकस्य गिर: प्रहृष्टा: ॥43॥

ऐकू तया येतसे तेथ हर्षयुक्त रामराज्याभिषेक संबंधि बोल ।
रामाप्रति मङ्गलकामना सुचविती करी श्रवण आनंदित होउन ॥43

महेन्द्रसद्मप्रतिमं च वेष्य रामस्य रम्यं मृगपक्षिजुष्टम् ।
ददर्श मेरोरिव श्रुङ्गमुच्चं विभ्राजमानं प्रभया सुमन्त्र: ॥44॥

लाजविणारे इन्द्रसदनाही भवन रामाचे हे रमणीय पाहतसे सुमन्त्र।
मृग तथा पक्षी सुशोभित प्रकाशित मेरुगिरि शिखरापरी ॥44॥

उपस्थितैरञ्जलिकारिभिश्च सोपायनैर्जानपदैर्जनश्च ।
कोट्या परार्धेश्च विमुक्तयानै: समाकुलं द्वारपदं ददर्श ॥45॥

तेथ अगणित जानपद पाही जमलेले वंदन करण्या रामास ।
गर्दी करती हाती भेटवस्तु घेऊनी उतरूनी आपुल्या वाहनातून ॥45॥

ततो महामेघमहीधराभं प्रभिन्नमत्यञ्कशमत्यसह्यम् ।
रामोपवाह्यं रुचिरं ददर्श शत्रुञ्जय मागमुदप्रकारम् ॥46॥

तिथे महामेघयुक्त पर्वतासम विशाल गजराज
रामाचे असे वाहन जो शत्रुञ्जय पाही त्या सुमन्त्र ॥46॥

स्वलंकृतान् साश्वरथान् सकुञ्जरानमात्यमुख्यांश्च ददर्श वल्लभान् ।
व्यपोह सूत: सहितान् समन्तत: समृद्धमन्त:पुरमाविवेश ह ॥47॥

आभूषित अनेक प्रमुख मन्त्री आरूढ रथ,अश्व तथा गजावरी ।
त्या सर्वां दूर सारूनी अन्त:पुरी समृद्धशाली रामाच्या प्रवेशी सुमन्त ॥47

ततोऽद्रिकूटाचलमेघसंनिभं महाविमानोपमवेश्मसंयुतम् ।
अवार्यमाण: प्रविवेश सारथि: प्रभूतरत्नं मकरो यथार्णवम् ॥48॥

प्रचुर रत्नभरित सागरात मगर जशी प्रवेश करीतसे अनायास ।
तसा सारथी सुमन्त्र अविचल मेघसमान रत्नजडित राम भुवनी प्रवेशत ॥48॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकांडे पञ्चदश: सर्ग: ॥15॥

अयोध्याकाण्ड सर्ग 16

स तदन्त:पुरद्वारं समतीत्य जनाकुलम् ।
प्रविविक्तां तत: कक्ष्यामाससाद पुराणवित् ॥1॥
जाणे जो पूर्व वृत्तास जनसमुदाया सोडुनी ।
जाई एकान्त कक्षात निर्मनुष्य अन्त:पुरी ॥1॥
प्रासकार्मुकबिभ्रद्भिर्युवभिमष्टकुण्डलै: ।
अप्रमादिभिरेकाग्रै: स्वानुरक्तैरधिष्ठिताम् ॥2॥

रामप्रेमी युवा तेथे सज्ज बाण धनुषासवे ।
सुवर्णकुण्डले कानी झळकत होति त्यांचिया ॥2॥

तत्र काषायिणो वृद्धान् वेत्रपाणीन् स्वलंकृतान् ।
ददर्श विष्ठितान् द्वारि स्त्र्यध्यक्षान् सुसमाहितान् ॥3॥

भगव्या वस्त्रात हाती दंड घेउनि अलंकृत ।
दिसती वृद्ध द्वारी संरक्षक स्त्रीजनांस्तव ॥3॥

ते समीक्ष्य समायान्तं रामप्रियचिकीर्षव:।
सहसोत्पतिता: सर्वे ह्यासनेभ्य: ससंभ्रमा: ॥4॥

प्रिय इच्छिति जे रामा सुमंत्र येता पाहुनी ।
आसनावरुनी उठती प्रेमाने पुरुष सर्व ते ॥4॥

तानुवाच विनीतात्मा सूतपुत्र प्रदक्षिण: ।
क्षिप्रमाख्यात रामाय सुमन्त्रो द्वारि तिष्ठति ॥5॥

सुत नम्र सुस्वभावी बोले त्यां "शीघ्र जाउनी ।
"श्रीरामास वदा द्वारी सुमन्त्र येउनी उभा" ॥5॥

ते राममुपसंगम्य भर्तु: प्रियचिकीर्षव:।
सहभार्याय रामाय क्षिप्रमेवाचचक्षिरे ॥6॥

स्वामी प्रिय करणारे सर्व जाउनि सांगती।
श्रीरामा सूतसंदेश भार्येसह जो बैसत ॥6॥

प्रतिवेदितमाज्ञाय सूतनभ्यंतरं पितु:।
तत्रैवानाययामास राघव: प्रियकाम्यया ॥7॥

ऐकुनी त्यांच्या वचना प्रसन्न करण्या पित्या ।
प्रिय सेवक त्यांचा जो अन्त:पुरि बोलवीत त्या ॥7॥

तं वैश्रवणसंकाशमुपविष्टं स्वलंकृतम ।
ददर्श सूत: पर्यंके सौवर्णे सोत्तरच्छदे ॥8॥

अलंकृत वस्त्राभरणे श्रीरामा कुबेरासम ।
पाही सुवर्णमंचावरि विराजित सुमन्त्र त्या ॥8॥

वराहरुधिराभेण शुचिना च सुगन्धैना ।
अनुलिप्तं परायेन चन्दनेन परंतपम् ॥9॥
स्थितया पार्श्वतश्चापि वालव्यजनहस्तया ।
उपेतं सीतया भूयश्चित्रया शशिनं यथा ॥10॥

सुगंधित पवित्र लाल वराहरुधिरापरी ।
लेप अंगास रामाच्या शत्रुनाशक त्या असे ॥9॥

मागे बसुनी चवरी सीतादेवि हलविती ।
त्यांच्या सवे श्रीराम चंद्रम्यासम शोभती ॥10॥

तं तपन्तमिवादित्यमुपपन्नं स्वतेजसा ।
ववन्दे वरदं वन्दी विनयज्ञो विनीतवत् ॥11॥

प्रणाम करि रामास विनयशील सुमन्त्र तो ।
सूर्यापरि स्वतेजाने तळपे वरदायि जो ॥11॥

प्राञ्जलिः सुमुखं दृष्ट्वा विहारशयनासने ।
राजपुत्रमुवावेदं सुमन्त्रो राजसत्कृत: ॥12॥

शयनासनि आरूढ श्रीरामा प्रसन्नमुखी ।
सुमन्त्र जोडुनि हात राजसन्मानित वदे ॥12॥

कौसल्या सुप्रजा राम पिता त्वां द्रष्टुमिच्छति ।
महिष्यापि च कैकेय्या गम्यतां तत्र मा चिरम् ॥13॥

कौसल्यानन्दन रामा कैकेयीसह पिता तव ।
इच्छिती भेटण्या तुम्हा विलम्ब न करा चला ॥13॥

एवमुक्तस्तु संहृष्टो नरसिंहो महाद्युति:।
तत: सम्मानयामास सीतामिदमुवाच ह ॥14॥

वचना ऐकुनी त्याच्या नरश्रेष्ठ महाद्युति ।
सीतादेविस सन्माने प्रसन्न वदने वदे ॥14॥
देवि देवश्च देवी च समागम्य मदन्तरे ।
मन्त्रयेते ध्रुवं किंचिदभिषेचनसंहितम् ॥15॥
वाटते मजला देवी पिता कैकेयि मातेसह ।
मम अभिषेकाविषयी विचार करती जणु ॥15॥
लक्षयित्वा ह्यभिप्रायं प्रियकामा सुदक्षिणा ।
संचोदयति राजानं मदर्थमसितेक्षणा ॥16॥

अभिषेकविषयी माता सुनेत्रा परमोदारही ।
नृपा विषयावरि या करत असेल प्रेरित ॥16॥

सा प्रहृष्टा महाराजं हितकामानुवर्तिनी।
जननी चार्थकामा केकयाधिपते: सुता॥17॥

आनंदित ती असेल दक्ष महाराज हिता ।
जागृत मम हितासाठी कैकेयाधिपती सुता ॥17॥

दिष्ट्या खलु महाराजो महिष्या प्रियया सह ।
सुमन्त्रं प्राहिणोद् दूतमर्थकामकरं मम ॥18॥

प्रिय पत्निसवे बसुनी अभीष्ट मम चिन्तित ।
सुमन्त्रा पाठविती ते करण्या साध्य अर्थ तो ॥18॥

यादृशी परिषद् तत्र तादृशो दूत आगतः।
ध्रुवमद्यैव मां राजा यौवराज्येऽभिषेकश्यति ॥19॥

सभा जशि बसे आज दूत पाठवीती तसे ।
अभिषेक निश्चित आज युवराज म्हणुनी मम ॥19॥

हन्त शीघ्रमितो गत्वा द्रक्ष्यामि च महीपतिम् ।
सह त्वं परिवारेण सुखमास्स्व रमस्व च ॥20॥

त्वरित म्हणुनी जातो महाराजदर्शनास मी ।
रमुनी परिवारात सुखे राही आनंदित ॥20॥
पतिसम्मानिता सीता भर्तारमसितेक्षणा ।
आ द्वारमनुवव्राज मङ्गलान्यभिदध्युषी ॥21॥
पतिकडुनी आज्ञांकित तया इच्छित मङगल ।
सुनयना सीता जाई द्वारापर्यंत त्यासवे ॥21॥
राज्यं द्विजातिभिर्जुष्टं राजसूयाभिषेचनम् ।
कर्तुमर्हति ते राजा वासवस्येव लोककृत ॥22॥

ब्राह्मणांकडुनि करुनी नंतर राजसूय यज्ञा करुनी ।
सम्राटपदी तुम्हा बसवण्या महाराज करती योग्य ।
जैसे ब्रह्मा सृष्टीकर्ता देवराज इंद्रा करती
दीक्षितं व्रतसंपन्नं वराजिनधरं शुचिम् ।
कुरङ्गशृङ्गपाणिं च पश्यन्ती त्वां भजाम्यहम् ॥23॥
राजसूय यज्ञे दीक्षित तुम्हि व्रतपालनतत्पर श्रेष्ठ ।
पवित्र हाती धरुनि मृगशृंग मृगचर्मधारी आपणास ।
पाहुनि सेवा करणे आपुली शुभकामना ही मनी असे ॥23॥

पूर्वां दिशं वज्रधरो दक्षिणां पातु ते यम:।
वरुण: पश्चिमामाशां धनेशस्टूत्तरां दिशम् ॥24॥

पूर्वेस आपणा इंद्र यम रक्षो दक्षिणेकडे।
वरुण पश्चिमेस तसा कुबेर उत्तरेकडे ॥24॥

अथ सीतामनुज्ञाप्य कृतकौतुकमङ्गलम् ।
निश्चक्राम सुमन्त्रेण सह रामो निवेशनात् ॥25॥

अनुमति घेउनी ऐसी करोनी कृत्य मङ्गल ।
सुमन्त्रासह निघती श्रीराम भवनातुनी ॥25॥

पर्वतादिव निष्क्रम्य सिंहो गिरिगुहाशय:।

लक्ष्मणं द्वरि सोऽपश्यत प्रवाञ्जलिपुटं स्थितम ॥26॥

गुहेत निद्रित सिंह पर्वताच्या उठुनी जसा ।

निघे त्या लक्ष्मण द्वारी दिसे नम्र कृताञ्जलि ॥26॥

अथ मध्यमकक्षायां समागच्छत सुहृज्जनै:।

स सर्वानर्थिनो दृष्ट्वा समेत्य प्रतिनन्द्य च ॥27॥

तत: पावकसंकाशमारुरोह रथोत्तमम ।

वैयाग्रं पुरुषव्याघ्रो राजितं राजनन्दन ॥28॥

मध्यकक्षात येऊनी मित्रवर्गास भेटुनी ।
उपस्थित जनसमुदाया संतोषवित बोलुनी ॥27॥
श्रीराम पुरुषसिंह व्याघ्रचर्मावृत उत्तम ।
अग्नीसम तेजस्वी रथी सुन्दर बैसला ॥28॥
मेघनादमसम्बाधं मणिहेमविभूषितम् ।
मुष्णंतमिव चढूंषि प्रभया मेरुवर्चसम् ॥29॥
मेघासम रथनाद मणिहेम विभूषित ।
सुवर्णमेरूसम तो दिपवी जनदृष्टिस ॥29॥

करेणुशिशुकल्पैश्च युक्तं परमवाजिभि:।

हरियुक्तं सहस्राक्षो रथमिन्द्रं इवाशुगम् ॥30॥

गजबालक जणु ऐसे पुष्ट अश्व ओढति ज्या ।

इंद्रापरि सहस्राक्ष बैसे श्रीराम रथात त्या ॥30॥

प्रययौ तूर्णमास्थाय राघवो ज्वलित: श्रिया ।

स पर्जन्य इवाकाशे स्वनवानभिनादयन् ॥31॥

निकेतान्निर्ययो श्रीमान् महाभ्रादिव चंद्रमा: ।

प्रकाशित स्वतेजाने श्रीराम बसुनी रथी ।

निघती घरघर ज्याची मेघाच्या गर्जनेपरी ॥31॥

चन्द्रमा जणु मेघातुनि बाहेर भुवनातुनी ।

चित्रचामरपाणिस्तु लक्ष्मणो राघवानुज:॥32॥

जुगोष भ्रातरं भ्राता रथमास्थाय पृष्ठत:।

चवरी विचित्र हाती लक्ष्मण घेउनी रथी ॥32॥

ज्येष्ठ भ्राता रामाचे रक्षण करण्या बसे ।

ततो हलहलाशब्द्स्तुमुल: समजायत ॥33॥

तस्य निष्क्रममाणस्य जनौघस्य समन्तत:।

तेव्हां चहुकडे गर्दी जनांची फार होतसे ॥33॥

समवेत चालता ते कोलाहल फार होतसे ।

ततो हयवरा मुख्या नागाश्च गिरिसंन्निभा:॥34॥

अनुजग्मुस्तथा रामं शतशोऽथ सहस्रश:।

त्यांच्यासह उमदे अश्व पर्वताकार हस्तिही ॥34॥

शत सहस्र संख्येने रामामागुनि चालती ।

अग्रतश्चास्य संनद्धाश्चन्दनागुरुभूषिता: ॥35॥

खड्गचापधरा: शूरा जग्मुराशंसवो जना:।

चालती पुढती त्यांच्या योद्धे चन्दन भूषित ॥35॥

सज्ज खड्गधनुष्ये ते तसे मंगल गायक ।

ततो वादित्रशब्दाश्च स्तुतिशब्दाश्च वन्दिनाम् ॥36॥

सिहनादाश्च शूराणां तत: शुश्रुविरे पथि ।

हर्म्यवातायनस्थाभिभूषिताभि: समन्तत:॥37॥

कीर्यमाण: सुपुष्पौधैर्ययौ स्त्रीभिररिंदम:।

ध्वनि तेव्हां वाद्यांचे वन्दीजन स्तुतिपाठ ॥36॥

तसे सिंहनाद वीरांचे पथी ऐकाया येति ते ।

गवाक्षामधुनी ललना अलंकार विभूषित ॥37॥
पुष्पवृष्टि करती ऐसे श्रीराम निघती पुढे ।
रामं सर्वानवद्याङ्ग्यो रामपिप्रीषया तत:॥38॥
वचोभिरग्र्यैर्हर्म्यस्था: क्षितिस्थाश्च ववन्दिरे ।
गवाक्षे भूमीवरती श्रीरामप्रिय वांछिती ॥38॥
युवती सुन्दर नारी गाति स्तुतिपाठ तेथुनी ।
नूनं नन्दति ते माता कौसल्या मातृनन्दन ॥39॥
पश्यन्ती सिद्धयात्रं त्वां पित्र्यं राज्यमुपस्थितम् ।

कौसल्यानन्दन श्रीरामा यात्रा सफल आपुली ॥39॥

व्हावी पाहुनि कौसल्या आनंदित स्थिति आपुली ।

सर्वसीमन्तिनीभ्यश्च सीतां सीमन्तिनीं वराम् ॥40॥

अमन्यन्त हि ता नार्यो रामस्य हृदयप्रियाम् ।

तया सुचरितं देव्या पुरा नूनं महत् तपः॥41॥

रोहिणीव शशाङ्केन रामसंयोगमाप या ।

मानती सर्व नारी त्या सीता सीमन्तिनी तिला॥40॥

सर्व सौभाग्यवति मध्ये श्रेष्ठ आणी बोलती ।

तिने केले तप श्रेष्ठ त्यामुळे राम पती मिळे ॥41॥

असे शोभत ती जैसी रोहिणी चंद्रम्यासवे ।

इति प्रासादशृंगेषु प्रमदाभिर्नरोत्तम:।

शुश्राव राजमार्गस्थ: प्रिया वाच उदाहृता:॥42॥

प्रासादशिखरी वार्ता नारी प्रिय ज्या बोलती ।

राजमार्गी रथातून जाता श्रीराम ऐकती ॥42॥

स राघवस्तत्र तदा प्रलापान् सुश्राव लोकस्य समागतस्य ।

आत्माधिकारा विविधाश्च वाच: प्रहृष्टरूपस्य पुरे जनस्य ॥43॥

दूरस्थ येती जन जे अयोध्या हर्षे करीति श्रीरामाविषयीच वार्ता ।
ऐकीत त्यांच्या वचनास आपुल्या संबंधि श्रीरघुनाथ जाती ॥43॥

एष श्रियं गच्छति राघवोऽद्य राजप्रसादाद् विपुलां गमिष्यन ।
एते वयं सर्वसमृद्धकामा येषामयं नो भविता प्रशास्ता॥44॥

वदती असे की श्रीराम आता होतील अधिकारी दशरथ कृपेने ।
होतील इच्छा आमुच्याच पूर्ण श्रीराम शासक झाल्यामुळेचि ॥44॥

लाभो जनस्यास्य यदेष सर्वं प्रपत्स्यते राष्ट्रमिदं चिराय ।
न ह्यप्रियं किंचन जातु कश्चित पश्येन्न दु:खं मनुजाधिपेस्मिन ॥45॥

चिरकाल लाभे जर राज्य त्यांस होईल लाभ सगळ्या जनतेस येथ ।
राज्यावरी राम असेतो कोणी न दु:खी न अप्रिय हो कुणाचे ॥45॥

स घोषवद्भिश्च हयै: सनागै: पुर:सरै: स्वस्तिकसूतमागधै:।
महीयमान: प्रवरैश्च वादकैरभिष्टुतो वैश्रवणो यथा ययौ ॥46॥

गज अश्व चित्कार तशात वन्दी करीति जयघोष स्तुतिपाठ सूत ।
वंशस्तुती गुणगान सर्व ऐकूनी जाती कुबेरासमान श्रीराम ॥46॥

करेणुमातङ्गरथाश्वसंकुलं महाजनौघै: परिपूर्णचत्वरम् ।
प्रभूतरत्नं बहुपण्यसंचयं ददर्श रामो विमलं महापथम् ॥47॥

पथी पहाती हय हस्ती हस्तिनी श्रीराम जनसंमर्द विक्रयस्थले तशीच ।
प्रचूर रत्ने विकण्यास तैशा राशी धनाच्या अतिस्वच्छ पथावरी ॥47॥

इति श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षोडश: सर्ग: ॥16॥

अयोध्याकाण्ड सर्ग 17

स रामो रथमास्थाय सम्प्रहृष्टसुहृज्जनः।
पताकाध्वजसम्पन्नं महागुरुधूपितम् ॥1॥
अपश्यन्नगरं श्रीमान् नानाजनसमन्वितम् ।
स गृहैरभ्रसंकाशैः पाण्डुरैरूपशोभितम् ॥2॥
राजमार्गं ययौ रामो मध्येनागुरुधूपितम् ।
सुहृदां संतोषवित श्रीराम रथि बैसुनी ।

सुशोभित ध्वज पताकांनी राजमार्गी जातसे ॥1॥
सुगंधित धूपे मार्ग जनसंमर्द दाटला ।
श्वेत मेघापरी भव्य भवनांनी सुशोभित ॥2॥
तसा अगुरु धूपाने सुगन्ध भरुनी उरे ।
चन्दनानां च मुख्यानामगुरुणां च संचयै:॥3॥
उत्तमानां च गन्धानां क्षोमकौशाम्बरस्य च ॥
अविद्धाभिश्च मुक्ताभिरुत्तमै: स्फटिकैरपि ॥4॥
शोभमानमसंबाधं तं राजपथमुत्तमम् ।

संवृतं विविधै: पुष्पैर्भक्ष्यैरुच्चावचैरपि ॥5॥

ददर्श तं राजपथं दिवि देवपतिर्यथा ।

दध्यक्षतहविर्लाजैंबूपैरगुरुचन्दनै:॥6॥

नानामाल्योपगन्धैश्च सदाभ्यर्चितचत्वरम् ।

चन्दन तसे अगुरु नामक धूप उत्तम ॥3॥

सुगन्धी द्रव्ये तसे ढीग वस्त्रांचे रेशमी ।

अखंड मणि रत्नेही स्फटिके पथ शोभित ॥4॥

सुशोभित असे केला नानापुष्पे योजुनी ।

राजमार्ग भरे तैसा भक्ष्य पदार्थे रुचिर ॥5॥

चौकात चन्दन धूप पुष्पहार दही अक्षत ।

योजुनी पूजा होत पाहतो राजमार्गि तो ॥6॥

स्वर्गलोकी जणु इन्द्र भासे श्रीराम रथी तसा ।

आशीर्वादान् बहून् श्रुण्वन् सुहृद्भिः समुदीरितान् ॥7॥

यथार्हं चापि सम्पूज्य सर्वानेव नरान् ययौ ।

सुहृदांचे आशीर्वाद ऐकून करुनी तसे ॥7॥

सन्मान योग्य व्यक्तींचे श्रीराम चालती पुढे ।

पितामहैराचरितं तथैव प्रपितामहै:॥8॥

अद्योपादाय तं मार्गमभिषिक्तोऽनुपालय:।

(सुहृद सांगति रामास)पितामह प्रपितामह ॥8॥

आचरती मार्गा त्या अनुसरुनी आज तू।

ग्रहण करुनी अभिषेक आम्हा पाळ निरंतर।

यथा स्म पोषिता: पित्रा यथा सर्वै: पितामहै:॥

तत: सुखतरं सर्वे रामे वत्स्याम राजनि ॥9॥

(परस्पर वदती ऐसे) पिता आणि पितामहे।

पालन केले आपुले त्याहून सुखकर होइल ॥9॥

अलमद्यहि भुक्तेन परमार्थैरलं च नः ।

यदि पश्याम निर्यान्तं रामं राज्ये प्रतिष्ठितम् ॥10॥

पित्याकडुन येताना प्रतिष्ठित रामा पाहता ।

भोगा इहलोकाच्या मोक्षाचीहि नसे तमा ॥10॥

ततो हि नः प्रियतरं नान्यत् किंचिद् भविष्यति ।

यथाभिषेको रामस्य राज्येनामिततेजसः ॥11॥

त्याहून प्रियतर काही कार्य आम्हा नसे दुजे ।

राज्यावरि अभिषेक होता रामा प्रतिष्ठित ॥11॥

एताश्चान्याश्च सुहृदामुदासीन: शुभा: कथा:।

आत्मसंपूजनी: श्रुण्वन् ययौ रामो महापथम् ॥12॥

सुहृदांचे असे बोल प्रशंसा वचने शुभ ।

श्रीराम ऐकत जाती राजमार्गावरी पुढे ॥12॥

न हि तस्मान्मन: कश्चिच्चक्षुषी वा नरोत्तमात ।

नर: शक्नोत्यपाक्रष्टमतिक्रान्तेऽपि राघवे ॥13॥

इतुका श्रीराम बैसे मनि जाता दूर तो जरी ।

मनातुनि त्याला दूर करणे शक्य ना कुणा ॥13॥

यश्च रामं न पश्येत्तु यं च रामो न पश्यति ।

निन्दिदित: सर्वलोकेष स्वात्माप्येन विगर्हते ॥14॥

जो न पाह्तसे रामा राम ज्या न पहातसे ।

निन्दती त्यास लोक स्वत;स तोही धि:कारी ॥14॥

सर्वेषु स हि धर्मात्मा वर्णानां कुरुते दयाम् ।

चतुर्णाहि वय:स्थानां तेन ते तमनुव्रता:॥15॥

सर्व वर्णांस श्रीराम दया अनुरूप दाखवी ।

तयाचे भक्त झालेले सर्वही जन त्यामुळे ॥15॥

चतुष्पथान् देवपथांश्चैत्यांश्चायतनानि च ।

प्रदक्षिणं परिहरज्जगाम नृपते: सुत:॥16॥

चौकात देवमार्गात चैत्यवृक्षांस मन्दिरे ।

उजवीकडे राखुनि त्यांना जात राम पुढे पुढे ॥16॥

स राजकुलमासाद्य मेघसङ्घोपमै: शुभै:।

प्रासादशृङ्गैर्विविधै: कैलासशिखरोपमै:॥17॥।

आवारयद्भिर्गगनं विमानैरिव पाण्डुरै:।

वर्धमानगृहैश्चापि रत्नजालपरिष्कृतै:॥18॥

तत पृथिव्यां गृहवरं महेन्द्रसदनोपमम ।

राजपुत्र: पितुर्वेश्म प्रविवेश श्रिया ज्वलन ॥19॥

भवन दशरथाचे शोभे मेघसमुहापरी।

प्रासाद कैलासशिखरांजैसे शोभवीति तयासही ॥17॥

क्रीडागृह विमानाकार रत्ब जाले विभूषित ।

जणु भिडती आकाशा श्वेत आभा प्रकाशित ॥18॥

जणु भूवरि इन्द्राचे शोभे सदन उत्तम ।

स्वयंप्रकाशी राम पितृभवनी प्रवेशती ॥19॥

स कक्ष्या धन्विभिर्गुप्तास्तिस्रोऽतिक्रम्य वाजिभि:।

पदातिरपरे कक्ष्ये द्वे जगाम नरोत्तम:॥20॥

तीन पहिले कक्ष ओलांडुनि रथातुनी ।

खाली उतरून चाले पुढचे दोन नरोत्तम ॥20॥

स सर्वा: समतिक्रम्य कक्ष्या दशरथात्मज:।

संनिवर्त्य जनं सर्वं शुद्धान्त:पुरमत्यगात ॥21॥

ओलांडुनि सगळे कक्ष जनां मागे परतवी ।

दशरथपुत्र श्रीराम प्रवेश करि अन्त:पुरी ॥21॥

तस्मिन् प्रविष्टे पितुरन्तिकं तदा जन: स सर्वो मुदितो नृपात्मजे ।
प्रतीक्षते तस्य पुन: स्म निर्गमं यथोदयं चन्द्रमस:सरित्पति:॥22॥

जेव्हां प्रवेशति श्रीराम पित्याच्या अन्त:पुरी जन आनंदित जे त्यासवे।
पहाती वाट परत येण्याचि त्याच्या समुद्र जैसा चंद्रमा उगवि केव्हां ॥22॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तदश: सर्ग:॥17॥

अयोध्याकाण्ड सर्ग 18

स ददर्शासने रामो विषण्णं पितरं शुभे ।
कैकेय्यासहितं दीनं मुखेन परिशुष्यता ॥1॥
आसनावरी रामास कैकेयिसह सुन्दर ।
पिता विषण्ण मुखे शुष्क दयनीय स्थितीत जो ॥1॥
स पितुश्चरणौ पूर्वमभिवाद्य विनीतवत ।
ततो ववन्दे चरणौ कैकेय्या: सुसमाहित:॥2॥

त्याने प्रथम आदराने पित्याचे पाय वन्दिले ।
नन्तर मस्तका ठेवी कैकेयी चरणावरी ॥2॥

रामेत्युक्त्वा तु वचनं बाष्पपर्याकुलेक्षणम् ।
शशाक नृपतिर्दीनो नेक्षितुं नाभिभाषितुम् ॥3॥

“रामा” वचन बोलून लोचनी अश्रु येउनी ।
न पाहु शके रामा नृपती बोलु ना शके ॥3॥

तदपूर्वं नरपतेर्दृष्ट्वा रूपं भयावहम् ।
रामोऽपि भयमापन्नः पदा स्पृष्ट्वेव पन्नगम् ॥4॥

पित्याचे भयावह रूप पाहुनी रामही जसा ।
डसावा सर्प पायास तसा भयभीत जाहला ॥4॥

इन्द्रियैरप्रहृष्टैस्तं शोकसंतापकर्शितम्।
नि:श्वसन्तं महाराजं व्यथिताकुलचेतसम् ॥5॥
ऊर्मिमालिनक्षोभ्यं क्षुभ्यन्तमिव सागरम् ।
उपप्लुतमिवादित्यमुक्तामृषिं यथा ॥6॥

राजाची इंद्रिये पाही नि:शक्त अस्वस्थ मन ।
घेई दीर्घश्वास संतापे शोके मन दु:खित ॥5॥

जणु समुद्र लाटांनी क्षुब्ध नेहमि शान्त जो ।
राहूने गिळला सूर्य महर्षि असत्य बोलला ॥6॥

अचिन्त्यकल्पं नृपतेस्तं शोकमुपधारयन् ।
बभूव संरब्धतर: समुद्र इव पर्वणि ॥7॥

त्या नृपशोका अचिन्त्य पाहुनी काय कारण ।
विचारे श्रीराम क्षुब्ध पौर्णिम सागरापरी ॥7॥

चिन्तयामास चतुरो राम: पितृहिते रत:।
किंस्विदद्यैव नृपतिर्न मा प्रत्यभिनन्दति ॥8॥

पितृहितदक्ष चतुर राम विचारी काय कारणे ।
प्रसन्न होत महाराज मजसी नसति बोलत ॥8॥

अन्यदा मां पिता दृष्ट्वा कुपितोऽपि प्रसीदति ।
तस्य मामद्य सन्प्रेक्ष्य किमायास: प्रवर्तते ॥9॥

जरी असता जे क्रुद्ध प्रसन्न मज पाहता ।
ते आज मज पाहूनी करिती मनि क्लेश का ॥9॥

स दीन इव शोका विषण्णवदनद्युति:।
कैकेयीमभिवाद्यैव रामो वचनमब्रवीत ॥10॥

विचारे दीन शोकाने विषण्णमुख होउनी ।
वन्दुनी कैकेयीस श्रीराम पुसती तिला ॥10॥

कचिन्मया नापराद्धमज्ञानाद् येन मे पिता।
कुपितस्तन्ममाचक्ष्व त्वमेवैनं प्रसादय ॥11॥

अपराध असा काय होत मजकडुनी पिता।
नाराज मजवरि सांगा वळवा मन त्यांचे तुम्ही ॥11॥

अप्रसन्नमना: किं नु सदा मां प्रति वत्सल:।
विषण्णवदनो दीन: नहि मां प्रतिभाषते ॥12॥

नेहमी प्रेम करणारे आज मजसि न बोलती ।
अप्रसन्न मने दु:खी विषाद त्यांच्या मुखावरी ॥12॥

शारीरो मानसो वापि कच्चिदेनं न बाधते ।
संतापो वाभितापो वा दुर्लभं हि सदा सुखम् ॥13॥

पीडा मानसि वा देही असे का त्यास कारण ।
सदैव सुखप्राप्ती ही मिळणे अतिदुर्लभ ॥13॥

कच्चिन्न किञ्चित भरते कुमारे प्रियदर्शने ।
शत्रुघ्ने वा महासत्त्वे मातृणां वा ममाशुभम् ॥14॥

भरत प्रियदर्शन वा शत्रुघ्न महाबली ।
अमंङ्गल घडे काही मातांचेहि तसे मम ॥14॥

अतोषयन् महाराजमकुर्वन् वा पितुर्वचः।
मुहर्तमपि नेच्छेयं जीवितं कुपिते नृपे ॥15॥

असंतुष्ट करुनि त्यांना अवज्ञा करुनी त्यांचि मी ।
पळभर न इच्छितो मी जीविता रक्षण्या मम ॥15॥

यतोमूलं नरः पश्येत प्रादुर्भावमिहात्मनः।
कथं तस्मिन् न वर्तेत प्रत्यक्षे सति दैवते ॥16॥

जन्मतो कृपेने ज्यांच्या देवतासम पित्यास त्या ।
अनुकूल वर्तन करण्या का न उद्युक्त व्हायचे ॥16॥

कच्चिते परुषं किंचिदभिमानात पिता मम ।
उक्तो भवत्या रोषेण येनास्य लुलितं मन:॥17॥

अभिमाने अथवा रोषे कठोर वच आपण ।
बोलता का मन दु:खी तयांचे होत हे असे ॥17॥

एतदाचक्ष्व मे देवि तत्त्वेन परिपृच्छत:।
किनिमित्तमपूर्वोऽयं विकारो मनुजाधिपे ॥18॥

सत्य काय पुसतो देवी कोणत्या कारणामुळे ।
संतप्त आज महाराज पूर्वी कधि न पाहिले ॥18॥

एवमुक्ता तु कैकेयी राघवेण महात्मना ।
उवाचेदं सुनिर्लज्जा धृष्टमात्महितं वचः॥19॥

पुसता श्रीराम ऐसे वदे निर्लज्ज कैकेयी ।
मनोगत आपुले ज्यात स्वार्थ भरलेला असे॥19॥

न राजा कुपितो राम व्यसनं नास्य किंचन ।
किंचिन्मनोगतं त्वस्य त्वद्ध्यान्नानुभाषते ॥20॥

नसती कृद्ध महाराज न काही कष्ट त्यांजला ।
मनात त्यांच्या काही सांगण्या भय वाटते ॥20॥
प्रियं त्वामप्रियं वक्तुं वाणी नास्य प्रवर्तते ।
तदवश्यं त्वया कार्यं वदनेनाश्रुतं मम ॥21॥
प्रिय असता तू त्यांना गोष्ट अप्रिय जी तुज ।
धजती न सांगण्या जे वचन मजला दिले ।
परि अवश्य तुजला ते पाळाया पाहिजे असे ॥21॥
एष मह्यं वरं दत्त्वा पुरा मामभिपूज्य च ।

स पश्चात तप्यते राजा यथान्य: प्राकृतस्तथा ॥22॥

वर त्यानी दिला पूर्वी सन्मान करुनी मला ।

सामान्य जनासम ते करती पश्चाताप आता ॥22॥

अतिसृज्या ददानीति वरं मम विशाम्पति:।

स निरर्थं गतजले सेत्यं बन्धितुमिच्छति ॥23॥

"देईन" प्रतिज्ञा ऐसी करुनी दिधलेल्या वरा ।

निवारण्यास्तव आता प्रयत्न करती व्यर्थ ते ।

पाणी वाहुनि जाता बांध बांधण्या झटती जणु ॥23॥

धर्ममूलमिदं रामं विदितं च सतामपि।

तत सत्यं न त्यजेत राजा कुपितस्त्वत्कृते यथा॥24॥

धर्ममूल असे सत्य ते सत्पुरुष सांगती ।

तुझ्यास्तव न सोडावे त्यांनी कोपुनि मजवरी ॥24॥

(सत्य पालन व्हावे ऐसे पहावेस तू ।

यदि तद्वक्ष्यते राजा शुभं वा यदि वाशुभम् ।

करिष्यसि ततः सर्वमाख्यास्यामि पुनस्त्वहम् ॥25॥

सांगतील महाराज शुभ वा अशुभ ते जरी ।

सर्वथा पालन करसी तरी सर्व सांगेन मी ॥25॥

यदि त्वभिहितं राज्ञा त्वयि तन्न विपत्स्यते।

ततोऽहमभिदास्यामि न ह्येष त्वयि वक्ष्यति ॥26॥

जर म्हणणे राजाचे काना आड न करिसि तू ।

सर्व सांगेन मी ते न ते शकतिल सांगण्या ॥26॥

एतत् तु वचनं श्रुत्वा कैकेय्या समुदाहृतम् ।

उवाच व्यथितो रामस्तां देवीं नृपसंनिधौ ॥27॥

कैकेयी वचन ऐकून व्यथित राम मनामध्ये ।
राजाजवळ जाऊनी कैकेयीस वदे असे ॥27॥

अहो धिङ्ग नार्हसे देवी वक्तुं मामीदृशं वचः।
अहं हि वचनाद् राज्ञः पतेयमपि पावके ॥28॥
भक्षयेयं विषं तीक्ष्णं पतेयमपि चार्णवे ।
नियुक्तो गुरुणा पित्रा नृपेण च हितेन च ॥29॥
तद् ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकांक्षितम् ।
करिष्ये प्रतिजाने च रामो दिर्नाभिभाषते ॥30॥

धिक्कार हे तव देवी बोलण्या मजविषयी असे ।
राजांच्या आज्ञेने मी अग्नीतहि प्रवेशिन ॥28॥
विष जहाल भक्षीन सागरात पडेनही ।
गुरु आणि पिता वदती हितास्तव ते असे मम ॥29॥
तेव्हां सांग आता देवी राजाचे काय ईप्सित ।
निश्चये करिन राम शब्द आपला पाळतो ॥30॥

तमार्जवसमायुक्तमनार्या सत्यवादिनम् ।
उवाच रामं कैकेयी वचनं भृशदारुणम् ॥31॥

आर्जवी बोल ऐकुनी रामाचे सत्यवादि जो ।
अनार्या कैकयी आरम्भे कथण्या वच दारुण ॥31॥

पुरा देवासुरे युद्धे पित्रा ते मम राघव ।
रक्षितेन वरौ दत्तौ सशल्येन महारणे ॥32॥

देवासुर युद्धे पूर्वी पिता तव शरजर्जर ।
रक्षिले मी तदा त्यानी वर दोन मला दिले ॥32॥

तत्र मे याचितो राजा भरतस्याभिषेचनम् ।
गमनं दण्डकारण्ये तव चाद्यैव राघव ॥33॥

मागितले मी भरता राज्याभिषेक आणिक ।
आजची दण्डकारण्ये तुझे गमन राघव ॥33॥

यदि सत्यप्रतिज्ञं त्वं पितरं कर्तुमिच्छसि ।
आत्मानं च नरश्रेष्ठ मम वाक्यमिदं श्रुणु ॥34॥

स्वत:स आणि पित्यास सत्यवादी ठरविण्या ।
इच्छिसी तर नरश्रेष्ठा माझे वचन ऐक हे ॥34॥

संनिदेशे पितुस्तिष्ठ यथातेन प्रतिश्रुतम् ।
त्वयारण्यं प्रवेष्टव्यं नव वर्षाणि पञ्च च ॥35॥

पाळ आज्ञा पित्याची तू प्रतिज्ञा करिती जी ते ।
चतुर्दश वर्षे जासी वनात वचनापरी ॥35॥

भरतश्चाभिषिच्येत यदेतदभिषेचनम् ।
त्वदर्थे विहितं राज्ञा तेन सर्वेण राघव ॥36॥

तव अभिषेकासाठी सामग्री आणली असे ।
भरतास अभिषेक करण्या तीच योजित ॥36॥

सप्त सप्त च वर्षाणि दण्डकारण्यमाश्रित:।
अभिषेकमिदं त्यक्त्वा जटाचीरधरो भव ॥37॥

अभिषेका त्यागुनि तू दण्डकारण्यी जाउनी ।
जटा चीर करि धारण चौदा वर्षासाठि तू ॥37॥

भरत: कोसलपते: प्रशास्तु वसुधामिमाम् ।
नानारत्नसमाकीर्णां सवाजिरथसंकुलम् ॥38॥

करील तो वसुधेचे शासन कोसलपति जिचा।
परिपूर्ण असे नाना रत्ने गज अश्व यांसह ॥38॥

एतेन त्वां नरेंद्राऽयं कारुण्येन समाप्लुत:।
शोकै: संक्लिष्टवदनो न शक्नोति निरीक्षितुम् ॥39॥

यामुळे वियोगे तव कल्पनेने दु:खित ।
तुज शोके मुखे शुष्क पाहण्या धजती न ते ॥39॥

एतत कुरु नरेंद्रस्य वचनं रघुनन्दन ।
सत्येन महता राम तारयस्व नरेश्वरम ॥40॥

नरेशवचनासाठी एवढे कर राघव ।
सत्या रक्षुनि त्याना संकटातुनि सोडव ॥40॥

इतीव तस्यां परुषं वदन्त्या न चैव राम: प्रविवेश शोकम ।
प्रतिव्यये चापि महानुभावो राजा च पुत्रव्यसनाभितप्त: ॥41॥

कठोर वचना तिच्या ऐकूनीया नसे शोक झाला श्रीरामा तया ।
परंतु राजा दशरथ महानुभाव पुत्रवियोग कल्पनेने होई व्यथित ॥42॥

इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टादश: सर्ग: ॥18॥

अयोध्याकाण्ड सर्ग 19

तदप्रियमित्रघ्नो वचनं मरणोपम ।
श्रुत्वा न विव्यथे राम: कैकेयीं चेदमब्रवीत ॥1॥
अप्रिय मृत्युसमान वच ऐकुनि श्रीराम ।
अविचलित शत्रुघ्न बोले कैकेयीस असे ॥1॥
एवमस्तु गमिष्यामि वनं वस्तुमहं त्वित:।
जटाचीरधरो राज्ञ: प्रतिज्ञामनुपालयन् ॥2॥

जाईन धारण करुनी जटा चीर वनात मी ।
होण्या प्रतिज्ञापालन महाराजांचे अवश्य मी ॥2॥

इदं तु ज्ञातुमिच्छामि किमर्थं मां महीपतिः।
नाभिनन्दति दर्धर्षो यथापूर्वमरिंदमः॥3॥

परि हे जाणु मी इच्छी शत्रुदमन महाराज ।
का न बोलति मजसी प्रसन्नतापूर्वक जे सदा ॥3॥

मन्युर्न च त्वया कार्यो देवि ब्रूमि तवाग्रतः।
यास्यामि भय सुप्रीता वनं चीरजटाधरः॥4॥

विचारी हे मी तुम्हा देवी कृपया क्रोध ना करी ।
जाईन चीर जटाधारी वनी तुम्हि प्रसन्न व्हा ॥4॥

हितेन गुरुणा पित्रा कृतज्ञेन नृपेण च ।
नियुज्यमानो विस्रब्धः किं न कुर्यामहं प्रियम् ॥5॥

राजा मम हितैषी ते पिता गुरु कृतज्ञही ।
आज्ञेवरुनी निश्चिन्त कार्य त्यांचे करीन मी ॥5॥

अलीकं मानसं त्वेकं हृदयं दहते मम ।
स्वयं यन्नह मां राजा भरतस्याभिषेचनम् ॥6॥

जळे काळिज दु:खाने की स्वयं महाराज का ।
राज्याभिषेक भरतास हे मज सांगती नच ॥6॥

अहं हि सीतां राज्यं च प्राणनिष्ठान् धनानि च ।
हृष्टो भ्रात्रे स्वयं दद्यां भरतायाप्रचोदित:॥7॥

सांगता केवळ तुम्ही भरतास्तव राज्य हे।
सीता प्रिय प्राण सम्पत्ति असते दिले ॥7॥

किम् पुनर्मनुजेन्द्रेण स्वयं पित्रा प्रचोदित:।
तव च प्रियकामार्थ प्रतिज्ञामनुपालयन् ॥8॥

जरि स्वत: महाराज तुझ्या प्रिया कार्यास्तव।
सांगती तरी प्रतिज्ञा पाळण्यास्तव का न करीन मी ॥8॥

तथाश्वासय ह्रीमन्तं किं त्विदं यन्महीपति:।
वसुधासक्तनयनी मन्दमश्रूणि मुञ्चति ॥9॥

आश्वासन महाराजा देई विश्वास मम देउनी ।
पृथ्वीनाथ ढाळति का मंद अश्रू पृथ्वीवरी ॥9॥

गच्छन्तु चैवानयित्युं दूता शीघ्रजयैर्हयै :।
भरतं मातुलकुलादद्यैव नृपशासनात ॥10॥

आज्ञेने महाराजांच्या भरता आणण्यास्तव
शीघ्र घोड्यांवरुनी दूत मातुलगृहि जातिल ॥10॥

दण्डकारण्यमेषोऽहं गच्छाम्येव हि सत्वर:।
अविचार्य पितुर्वाक्यं समा सप्तुं चतुर्दश ॥11॥

पित्याच्या वचनावरती विचार न करूनि मी ।
दण्डकारण्यात चौदा वर्षांसाठि शीघ्र जात मी ॥11॥

सा हृष्टा तस्य तद् वाक्यं श्रुत्वा रामस्य कैकयी ।
प्रस्थानं श्रद्दधाना सा त्वरयामास राघवम् ॥12॥

ऐकुनी वाक्या त्याच्या होत प्रसन्न कैकयी ।
जाणार तो खात्री पटुनी त्वरा करण्या वदे अशी ॥12॥

एवं भवतु यास्यन्ति दूत: शीघ्रजवैर्हयै:।
भरतं मातुलकुलादिहावर्तयितुं नरा:॥13॥

योग्य बोलसि त्यासाठी दूत शीघ्र अश्वावरी ।
मातुलगृहातूनि भरता आणण्या जातिल निश्चित ॥13॥

तव त्वहं क्षमं मन्ये नोत्सुकस्य विलम्बनम् ।
राम तस्मादित: शीघ्रं वनं त्वं गन्तुमर्हसि ॥14॥

तूच उत्सुक जाण्यास वनी विलम्ब ना करी ।
रामा जितुके शक्य शीघ्र जाइ वनास तू ॥14॥

व्रीडान्वित स्वयं यच्च नृपस्त्वां नाभिभाषते ।
नैतत किंचिन्नरश्रेष्ठ मन्युरेषोऽपनीयताम ॥15॥

लज्जेने स्वयं राजा न सांगति विचार न करी ।
त्याविषयीचे दु:ख मनातुन काढुनी टाक तू ॥15॥

यावत्त्वं न वनं यात: पुरादस्मादतित्वरम ।
पिता तावन्न ते राम स्नास्यते भोक्ष्यतेऽपि वा ॥16॥

जोवरी तू न जाशील वनी शीघ्र पुरातुनी ।
स्नान वा भोजन नाही करणार तव पिता ॥16॥

धिक्कष्टमिति नि:श्वस्य राजा शोकपरिप्लुत:।
मूर्च्छितो न्यपतत तस्मिन् पर्यङ्के हेमभूषिते ॥17॥

ऐकुनी हे राजा बोले दीर्घ श्वास घेऊनिया ।
“धिक्कार कष्ट हे ”आणि सुवर्णमंची मूर्च्छित ॥17॥

रामोऽप्युत्थाप्य राजानं कैकेय्याभिप्रचोदित:।
कशयेव हतो वाजी वनं गन्तु कृतत्वर:॥18॥

उठवुनी बैसवी राम वचने कैकेयीच्या परी।
जखमी अश्वापरी तो वनी जाण्या उताविळ ॥18॥

तदप्रियमनार्याया वचनं दारुणोदयम् ।
श्रुत्वा गतव्यथो राम: कैकेयीं वाक्यमब्रवीत् ॥19॥

अनार्या कैकेयीच्या अप्रिय दारुण वचा ।
ऐकोनी दु:ख न राम बोलती कैकयीस ते ॥19॥

नाहमर्थपरो देवि लोकमावस्तुमुत्सहे ।
विद्धि मामृषिभिस्तुल्यं विमलं धर्ममास्थितम् ॥20॥

ऐहिक वैभवास्तव देवी ठेवी विश्वास मजवरी॥
मी न राही ऋषितुल्य निर्मल जीवन वांछितो ॥20॥

यत् तत्रभवत: किंचिच्छक्यं कर्तुं प्रियं मम ।
प्राणानपि परित्यज्य सर्वथा कृतमेव तत् ॥21॥

पित्यास्तव प्रिय जे शक्य करेन देउनि प्राणही ।
माझ्याकडुनि होणार निश्चिन्त याविषयी रहा ॥21॥

न ह्यतो धर्मचरणं किंचिदस्ति महत्तरम् ।
यथा पितरि शुषृषा तस्य वा वचनक्रिया ॥22॥

पित्याची सेवा अथवा आज्ञा पालन याहुनी ।
धर्माचरण जगी श्रेष्ठ दुसरे कोणते नसे ॥22॥

अनुक्तोऽप्यत्रभवता भवत्या वचनादहम् ।
वने वत्स्यामि विजने वर्षाणीव चतुर्दश ॥23॥

पित्याने म्हटले नाही तरी वचने आपल्या ।
वनी निर्जन वास चौदा वर्षे करेन मी ॥23॥

न नूनं मयि कैकेयि किंचिदाशंस्ससे गुणान् ।
यद् राजानमवोचस्त्वं ममेश्वरतरा सती ॥24॥

स्वत: न सांगता त्यासाठी महाराजा कष्टवी ।
दिसते यावरुनी तुझा विश्वास न मजवरी ॥24॥

यावन्मातरमापृच्छे सीतां चानुनयाम्यहम् ।
ततोऽद्यैव गमिष्यामि दण्डकानां महद् वनम् ॥25॥

आज्ञा घेउनि मातेची सीतेस समजावुनी ।
जाईन दण्डकारण्ये मी आजच महावनी ॥25॥

भरत: पालयेद् राज्यं शुश्रूषेच्च पितुर्यथा ।
तथा भवत्या कर्तव्यं स हि धर्म: सनातन:॥26॥

पाळो भरत राज्यास करो सेवा पित्याचिही।
यावरी लक्ष तू देसी हाच धर्म सनातन ॥26॥

रामस्य तु वचः श्रुत्वा भृशं दुःखगतः पिता ।
शोकादशक्नुवन् वक्तुं प्ररुरोद महास्वनम् ॥27॥

ऐकुनि रामाच्या वचना अतिदुःखी दशरथ ।
बोलति न शोकग्रस्त आवेगे रदति केवळ ॥27॥

वन्दित्वा चरणौ राज्ञो विसंज्ञस्य पितुस्तदा ।
कैकेय्याश्चाप्यनार्याया निष्पपात महाद्युतिः॥28॥

बेशुद्ध पित्या तैसे अनार्या कैकेयीसही ।
वन्दुनी चरणी राम निघे भवनातुनी ॥28॥

स राम: पितरं कृत्वा कैकेयीं च प्रदक्षिणम् ।
निष्क्राम्यान्त:पुरात तस्मात स्वं ददर्श सुहृज्जनम॥29॥

पित्यास कैकेयीस घालूनिया प्रदक्षिणा ।
येत अन्त:पुरा बाहेर राम सुहृदां भेटती ॥29॥

तं बाष्पपरिपूर्णाक्ष: पृष्ठतोऽनुजगाम ह ।
लक्ष्मण:परमकृद्ध: सुमित्रानन्दनवर्धन: ॥30॥

लक्ष्मण सुमित्रानन्द अन्याये कृद्ध होउनी ।
परि अश्रूपूर्ण नेत्रे चाले श्रीरामामागुती ॥30॥

आभिषेचनिकं भाण्डं कृत्वा राम: प्रदक्षिणम् ।
शनैर्जगाम सापेक्षो दृष्टिं तत्राविचालयन् ॥31॥

अभिषेकसामग्रीस करुनी राम प्रदक्षिणा ।
(वनात जाणे म्हणुनी)न पाहे चालती पुढे ॥31॥

न चास्य महतीं लक्ष्मीं राज्यनाशोऽपकर्षति ।
लोककान्तस्य कान्तत्वाच्छीतरश्मेरिव क्षय:॥32॥

अविनाशी तेज रामाचे नसता राज्य नसे उणे ।
चंद्रमा क्षीण झाल्याने शोभा नष्ट न होतसे ॥32॥

न वनं गन्तुकामस्य त्यजतस्य वसुंधराम् ।
सर्वलोकातिगस्येव लक्ष्यते चित्तविक्रिया ॥33॥

तयार वनी जाण्यास राज्य सोडुनि पृथ्विचे ।
न जीवन्मुक्त महात्मा विकारग्रस्त होतसे ॥33॥

प्रतिषिध्य शुभं छत्रं व्यजने च स्वलंकृते ।
विसर्जयित्वा स्वजनं रथं पौरांस्तथा जनान् ॥34॥

धारयन् मनसा दु:खमिन्द्रियाणि निगृह्य च ।
प्रविवेशात्मवाम् वेश्म मातुरप्रियशंसिवान् ॥35॥

छत्र सुन्दर चवऱ्याही ढाळण्या राम थाम्बवी ।
रथसुद्धा न घेऊन स्वजना.पौरजनांसही ॥34॥
निरोप देउन दु:ख मनी दाबुन अप्रिय ।
देण्या स्वस्थ मने वार्ता मातेस जाति तिजकडे ॥35॥

सर्वोऽप्यभिजन: श्रीमान् श्रीमत: सत्यवादिन:।
नाललक्षयत रामस्य कंचिदाकारमानने ॥36॥

अभिजन रामाजवळी असती सदैव ते ।
रामाच्या मुखावरती विकार नच पाहती ॥36॥

उचितं च महाबाहुर्न जहौ हर्षमात्मवान् ।
शारद: समुदीर्णांशुश्चन्द्रस्तेज इवात्मजम् ॥37॥

आनंद मुखावरचा सोडि ना चंद्रमा जसा ।
शरदातिल स्वतेजा महाबाहूस योग्य ते ॥37॥

वाचा मधुरया राम: सर्वं सम्मानयञ्जनम् ।
मातु: समीपं धर्मात्मा प्रविवेश महायशा: ॥38॥

सम्मान सर्वजनांचा करुनि मधुर भाषणे ।
मातेजवळी जाई धर्मात्मा तो महायश ॥38॥

तं गुणै: समतां प्राप्तो भ्राता विपुलविक्रम:।
सौमित्रिरनुवव्राज धारयन् दु:मात्मजम् ॥39॥

रामासम गुणे युक्त लक्ष्मण सुमित्रानदन ।
मानसी दु:ख राखून श्रीरामासह जाइ तो ॥39॥

प्रविश्य वेश्मातिभृशं मुदा युतं समीक्ष्य तां चार्थविपत्तिमागताम् ।
न चैव रामोऽत्र जगाम विक्रियां सुहृज्जनस्यात्मविपत्तिशङ्कया ॥40॥

प्रवेश भवनी करि आनंदित मुखे जरी दिसे अभेष्ट विनाश त्या ।
सुहृदजनावरि संकट शंका मनी परी विकार मुखावरी प्रकट ना करी ॥40॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे आदिकाव्ये वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकोनविंशं सर्ग:॥19॥

अयोध्याकाण्ड सर्ग 20

तस्मिंस्तु पुरुषव्याघ्र निष्क्रामति कृताञ्जलौ ।
आर्तशब्दो महान् जज्ञे स्त्रीणामन्तः पुरे तदा ॥1॥
श्रीराम पुरुषसिंह निघती हात जोडुनि ।
शोक आर्तस्वरे करती अन्त:पुरि राजस्त्रिया ॥1॥
कृतेष्वचोदितः पित्रा सर्वस्यास्तःन्तपुरस्य च ।
गतिश्च शरणं चासीत स रामोऽय प्रवत्स्यति ॥2॥

अन्त:पुरे लक्ष देई सर्वत्र पित्राज्ञेविना ।
आम्हा रक्षक आधार श्रीराम जाति निघोनिया ॥2॥

कौसल्यायां यथा युक्तो जनन्यां वरतते सदा ।
तथैव वर्ततेऽस्मासु जन्मप्रभृति राघव: ॥3॥

जन्मापासुनि श्रीराम कौसल्येप्रति ज्यापरी ।
तैसेचि आम्हाशीहि करती वर्तन नेहमी ॥3॥

न क्रुध्यत्वभिशप्तोऽपि क्रोधनीयानि वर्जयन् ।
कृद्धान् प्रसादयन् सर्वान् स हतोऽथ प्रवत्स्यति ॥4॥

करती न कधी कोप कठोर वचन बोलता।
समजावति कृद्धांना त्यजिती आम्हा आज ते ॥4॥

अबुद्धिर्बत नो राजा जीवलोकं चरत्ययम् ।
यो गतिं सर्वभूतानांपरित्यजति राघवम् ॥5॥

बुद्धिभ्रष्ट महाराज जीवलोका विनाशण्या ।
जणु निघती श्रीरामा परित्यागति त्यामुळे ॥5॥

इति सर्वां महिष्यस्ता विवत्सा इव धेनव।
पतिमाचुक्रुशुश्चापि सस्वनं चापि चुक्रुशु: ॥6॥

दोष देती सर्व राण्या पतीस वत्स हरपल्या ।
गाईंसम उच्च रवे क्रंदना करु लागल्या ॥6॥

स हि चान्त:पुरे घोरमार्तशब्दं महिपति:।
पुत्रशोकाभिसंतप्त: श्रुत्वा व्यालीयतासने ॥7॥

अन्त:पुरी आर्त शब्द घोर ऐकुनि दशरथ ।
पुत्रशोकित लज्जेने लपवी आसनी मुख ॥7॥

रामस्तु भृशमायस्तो नि:श्वसन्निव कुञ्जर:।
जगाम सहितो भ्राता मातुरन्त:पुरं वशी ॥8॥

खिन्न राम त्यांच्या दु:खे श्वास दीर्घ घेउनीया ।
लक्ष्मणासह मातेच्या अन्त:पुरी प्रवेशती॥8॥

सोऽपश्यत पुरुषं तत्र वृद्धं परमपूजितम् ।
उपविष्ट गृहद्वारि तिष्ठतश्चापरान् बहून् ॥9॥

पाही तो परमपूज्य वृद्ध एक द्वारि बैसला ।
तसेच आणखी काही पाही बरेच बैसले ॥9॥

दृष्ट्वैव तु तदा रामं ते सर्वे समुपस्थिता:।
जयेन जयता श्रेष्ठं वर्धयन्ति स्म राघवम् ॥10॥

विजयी वीरात श्रेष्ठ श्रीरामास ते पाहुनी ।
करती जयजयकार अभिनन्दति ते तया ॥10॥

प्रविश्य प्रथमां कक्ष्यां द्वितीयायां ददर्श सः।
ब्राह्मणान् वेदसंपन्नान् वृद्धान् राज्ञाभिसत्कृतान् ॥11॥

पहिल्या कक्षी प्रवेशून दुसऱ्यात दिसे तया ।
सम्मानित राजाकडुनी वेदसंपन्न ब्राह्मण ॥11॥

प्रणम्य रामस्तान् वृद्धांस्तृतीयायां ददर्श सः।
स्त्रियो बालाश्च वृद्धाश्च द्वाररक्षणतत्पर ॥12॥

वृद्धांस वंदुनि राम तृतीय कक्ष्यात पाहि तो ।
बाला वृद्ध स्त्रिया पाही द्वाररक्षणि तत्पर ॥12॥

वर्धयित्वा प्रहृष्टास्ता: प्रविश्य च गृहं स्त्रिय:।
न्यवेदयत त्वरितं राममातु: प्रियं तदा ॥13॥

पाहूनी होत आनन्दी कक्षात प्रवेशती ।
मातेस श्रीरामाच्या प्रिय हे वृत्त सांगती ॥13॥

कौसल्यापि तदा देवी रात्रिं स्थित्वा समाहिता।
प्रभाते चाकरोत पूजा विष्णो: पुत्रहितैषिणी ॥14॥

कौसल्याहि जागुनी रात्री पुत्रमंगल इच्छित ।
भगवान विष्णुपूजा ती एकाग्रचित्ते करी ॥14॥

सा क्षौमवसना हृष्टा नित्यं व्रतपरायणा ।
अग्निं जुहोति स्म तदा मन्त्रवत् कृतमङ्गला ॥15॥

व्रतपरायण नित्य आनंदे वस्त्रात रेशमी ।
मङ्गलकृत्यान्ती देत समन्त्र अग्नीस आहुती ॥15॥

प्रविश्य तु तदा रामो मातुरन्तःपुरं शुभम् ।
ददर्श मातरं तत्र हावयन्तीं हुताशनम् ॥16॥

शुभ अन्त:पुरी राम मातेच्या प्रवेशूनी ।
पाहि मातेस देताना आहुति अग्निला तदा ॥16॥

देवकार्यनिमित्तं च तत्रापश्यत समुद्यतम् ।
दध्यक्षतघृतं चैव मोदकान् हविषस्तथा ॥17॥
लाजान् माल्यानि शुक्लानि पायसं कृसरं तथा ।
समिध:पूर्णकुंभांश्च ददर्श रघुनन्दन:॥18॥

सामग्रि देवकार्याची पाही जमविली असे ।
दधि अक्षता मोदक तूप लाह्या हविष्यही ॥17॥

शुभ्र मालासवे खिचडी समिधा पायसही तसे ।
कलश पूर्ण भरलेले रघुनन्दन पाहती ॥18॥

तां शुक्लक्षौमसंवीतां व्रतयोगेन कर्शिताम् ।
तर्पयन्तीं ददर्शाद्भिर्देवतां वरवर्णिनीम् ॥19॥

ती शूभ्रसाडी आवृत्त व्रतयोगे हो दुर्बल ।
इष्टदेवता तर्पण करताना पाही श्रीराम तिज ॥19॥

सा चिरस्यात्मजं दृष्ट्वा मातृनन्दनमागतम् ।
अभिचक्राम संहृष्टा किशोरं वडवा यथा ॥20॥

बहु कालाने पाहुनी स्वपुत्रा मातृनन्दना ।
कौसल्यादेवी आनंदे येत त्याच्याजवळी ।
बछड्यास पाहुनी घोडी जशी जवळ येतसे ॥20॥

स मातरमुपक्रान्तामुपसंगृह्य राघव:।
परिष्वक्तश्च बाहुभ्यामवघ्रातश्च मूर्धनि ॥21॥

येता जवळ मातेस प्रणाम करती राघव ।
हृदयासि लावून त्यास अवघ्राण माता करी ॥21॥

तमुवाच दुराघर्षं राघवं सुतमात्मन:।

कौसल्या पुत्रवात्सल्यादिदं प्रियहितं वचः॥22॥

अजिंक्य पुत्रा आपुल्या कौसल्या राघवा वदे।
पुत्रवात्सल्ये वच त्यासी प्रेमाने हितकर असे ॥22॥

वृद्धानां धर्मशीलानां राजर्षीणां महात्मनाम् ।
प्राप्नुह्यायुश्च कीर्तिं च धर्मं चाप्युचितं कुलं ॥23॥

धर्मशील महात्मा वृद्ध राजर्षींसम कुलोचित ।
कीर्ती धर्म आयुष्य प्राप्त होवो तुला सुत ॥23॥

सत्यप्रतिज्ञं पितरं राजानं पश्य राघव ।

अद्यैव त्वां स धर्मात्मा यौवराज्येऽभिषेक्ष्यति ॥24॥

सत्यवचनी धर्मात्मा पित्यास भेट राघवा ।

करणार तुला आज यौवराज्याभिषेक ते ॥24॥

दत्तआसनमालभ्य भोजनेन निमन्त्रित:।

मातरं राघव: किंचित प्रसार्याञ्जलिमब्रवीत ॥25॥

आसन देउनि माता भोजना बसवी तया ।

करुनी आसना स्पर्श हात जोडुनि तो म्हणे ॥25॥

स स्वभावविनीतश्च गौरवाच्च तथानत:।

प्रस्थितो दण्डकारण्यमाप्रष्टमुपचक्रमे ॥26॥

स्वभावे विनयी राम मातेशी नतमस्तक ।

होउनी दंडकारण्यी जायचे उद्युक्त सांगण्या ॥26॥

देवि नूनं न जानीषे महद् भयमुपस्थितम् ।

इदं तव च दु:खाय वैदेह्या लक्ष्मणस्य च ॥27॥

देवी न जाणसि निश्चित वृत्त भयकारी तुला ।

वैदेही लक्ष्मणालाही दु:ख होईल ऐकुनी ॥27॥

गमिष्ये दण्डकारण्यं किमनेनासनेन मे ।

विष्टरासनयोग्यो हि कालोऽयं मामुपस्थित:॥28॥

जात मी दण्डकारण्यी कशाला आसन असे ।

दर्भासन बसण्यास उचित हेच आता मज ॥28॥

चतर्दश हि वर्षाणि वत्स्याम विजने जने ।

कन्दमूलफलैर्जीवन् हित्वा मुनिवदामिषम् ॥29॥

कन्दमूळफळे भक्षी चौदा वर्षे वनात मी ।

त्यजुनी राजभोगास मुनिवत राहीन मी ॥29॥

भरताय महाराजो यौवराज्यं प्रयच्छति ।

मां पुनर्दंडकारण्यं विवासयति तापसम् ॥30॥

भरतास महाराज यौवराज्यपद देतिल ।

मजला दण्डकारण्यी तपस्वी बनुनी धाडती ॥30॥

स षट् चाष्टौ च वर्षाणि वत्स्यामि विजने वने ।

आसेवमानो वन्यानि फलमूलैश्च वर्तयन् ॥31॥

राहीन चौदा वर्षे वनी निर्जन खाउनी ।

फळमुळे तशी वस्त्रे वल्कले करुनि धारण ॥31॥

सा निकृत्तेव सालस्य यष्टिः परशुना वने ।

पपात सहसा देवी दैवतेव दिवश्च्युता ॥32॥

ऐकुनी शालवृक्षाच्या उन्मळून शाखेपरि ।

पडे भूवरि कौसल्या जणु देवता स्वर्गातुनी ॥32॥

तामदु:खोचितां दृष्ट्वा पतितां कदलीमिव ।

रामस्तूत्थापयामास मातरं गतचेतसम् ॥33॥

कधी न जी दु:खी माता कौसल्या कदलीपरी ।

अचेत भूवरि पडता राम उठवीतसे तिला ॥33॥

उपावृत्योत्थितां दीनां वडवामिव वाहितम् ।

पांसगण्ठित्सर्वाङ्गी विममर्श च पाणिनां ॥34॥

अतिभारे पडलेल्या भूमिवरि घोडीपरी ।

अङ्गावरिल तिच्या धूळ श्रीराम पुसती स्वत:॥34॥

सा राघवमुपासीनमसुखार्ता सुखोचिता ।

उवाच पुरुषव्याघ्रमुपशृण्वन्ति लक्ष्मणे ॥35॥

सदा सुखि रहिलेली योग्य जे तिज कातर ।

स्वरे आज लक्ष्मणासंगे बसलेल्या पुत्रा म्हणे ॥35॥

यदि पुत्र न जायेथा मम शोकाय राघव ।

न स्म दु:खमती भूय: पश्येयमह्मप्रजा:॥36।

न पुत्र मजला होता शोक एकच राघव ।

लागले नसते दु:ख सोसाया आज एवढे ॥36॥

एक एव हि वन्ध्याया: शोको भवति मानस:।

अप्रजास्माति संतापो न ह्यन्य: पुत्र विद्यते ॥37॥

एकच दु;ख वन्ध्येस संतान मज नाहि हे ।

संतापाविण तिज दु:ख आणखी कोणते नसे ॥37॥

न दृष्टपूर्वं कल्याणं सुखं वा पतिपौरुषे ।

अपि पुत्रे विपश्येयमिति रामास्थितं मया ॥38॥

ज्येष्ठ पत्नीचे मजला मिळाले न बघण्या सुख ।

परि रामात पाहीन आशेवर जगले असे ॥38॥

सा बहून्यमनोज्ञानि वाक्यानि हृदयच्छिद्राम् ।

अहं श्रोष्ये सपत्नीनामवराणां परा सती ॥39॥

ज्येष्ठ राज्ञी असूनीही सवतींचे धाकट्या परी ।

काळजा घरे पाडणारे बोल ऐकुनि घेतले ॥39॥

अतो दु:खतरं किं नु प्रमदानां भविष्यति ।

मम शोको विलाप्यश्च यादृशोऽयमनन्तक:॥40॥

याहुनी कोणते मोठे दु:ख स्त्रियांसाठि असे ।
माझा विलाप अन शोक यांचा अन्त कधी नसे ॥40॥

त्वयि संनिहितेऽप्येवमहमासं निराकृता ।
किं पुन: प्रोषिते तात ध्रुवं मरणमेव हि ॥41॥

तुझ्यासमीप असुनी सवतींकडुनि तिरस्कृत ।
तू जाता तर त्याहुनी मरण श्रेयस्कर मला ॥41॥

अत्यन्तं निगृहीतास्मि भर्तुर्नित्यमसम्मता ।

परिवारेण कैकेय्या: समा वाप्यथवावरा ॥42॥

तिरस्कृत पतिद्वारे प्रेम सन्मान ना मिळे।
दासीं जणु किंवा त्याहुनिही नीच कैकेयीस मी ॥42॥

यो हि मां सेवते कश्चिदपि वाप्यनुवर्तते ।
कैकेय्या पुत्रमन्वीक्ष्य स जनो नाभिभाषते ॥43॥

सेवा करति जे माझी अथवा अनुसरती मला ।
पुत्रा कैकेयिच्या तेही पाहुनी स्तब्ध राहती ॥43॥

नित्यक्रोधतया तस्या: कथं नु खरवादि तत।

कैकेय्या वदनं द्रष्टं पुत्र शक्ष्यामि दुर्गता ॥44॥

सदा कटु बोलणाऱ्या क्रोधी कैकेयीच्या मुखा ।

कशी करू सहन मी या पडता दुर्गतीमध्ये ॥44॥

दश सप्त च वर्षाणि जातस्य तव राघव ।

अतीतानि प्रकांक्षन्त्या मया दु:खपरिक्षयम् ॥45॥

उपनयनान्तरे सत्रा वर्षे लोटलि राघवा ।

मला आशा अशी होती की दुर्दैव संपले मम ॥45॥

तदक्षयं महदु:खं नोत्सहे सहियुं चिरात ।

विप्रकार< सपत्नीनामेवं जीर्णानि राघव ॥46॥

सवतींचा तिरस्कार त्यामुळे दु:ख होइ जे ।

अधिक काळापर्यंत वृद्धत्वी न सहू शके ॥46॥

अपश्यन्ती तव मुखं परिपूर्णशशिप्रभ ।

कृपणा वर्तयिष्यामि कथं कृपणजीविका ॥47॥

पूर्ण चंद्रासम मुखा तुझिया ना मी पाहता।

दु:खिता कशी कंठू जीवना दयनीय मी ॥47॥

उपवासैश्च योगैश्च बहभिश्च परिश्रमै:।

दु:ख संवर्धितो मोघं त्वं हि दुर्गतया मया ॥48॥

उपवास देवताध्यान परिश्रम करोनिया ।

पालन मी तुझे केले व्यर्थ सर्व झाले जणु ॥48॥

स्थिरं नु हृदयं मन्ये ममेदं यन्न दीर्यते ।

प्रावृषीय महानद्या: स्पृष्टं कूलं नवाम्भसा ॥49॥

किति कठोर हृदय माझे की ऐकूनी वृत्त हे ।

की वर्षाकाळि नदीकाठ फुटावा तैसे न फुटे ॥49॥

ममैव नूनं मरणं न विद्यते न चायकाशोऽस्ति यमक्षये मम ।

यदन्तकोऽद्यैव न मां जिहीर्षति प्रसह्य सिहो रुदती मृगीमिव ॥50॥

माझ्यास्तव नसे मरण जणु नसे यमाच्याहि घरी थारा मला ।

रडणाऱ्या हरिणीस सिंह तसा यमराज मज का न जाइ घेउनि ॥50॥

स्थिरं हि नूनं हृदयं ममायसं न विद्यते यद् भुवि नो विदीर्यते ।

अनेन दु:खेन च देहमर्पितं ध्रुव ह्यकाले मरणं न विद्यते ॥51॥

लोहापरी जणु हृदय कठोर माझे जे पडूनि धरेवरि न फुटे ।

दु:खाने या न शरीर भंगते न मृत्युकाल आल्याविना मृत्यु येतसे ॥51॥

इदंतु दु:खं यदनर्थकानि मे व्रतानि दानानि च संयमाश्च हि ।

तपश्च तप्तं यदपत्यकाम्यया सुनिष्फलं बीजमिवोप्तमूषरे ॥52॥

वाटे दु:ख की पुत्रप्राप्तिसाठी केले जे दान,व्रत संयम व्यर्थ गेले ।
संतानप्राप्तीस्तव तप जे केले बीजासम नापीक भूमीत निष्फल ॥52॥

यदि ह्यकाले मरणं यदृच्छया लभेत कश्चिद् गुरुदु:खकर्शित:।
गताहमयैव परेतसंसदं विना त्वया धेनुरिवात्मजेन वै ॥53॥

मनुष्या पीडित अतीव दु;खे अकाल मृत्यु जर येतसे मागता।
तर वासरा पासुनि दूर होत्या धेनूपरी जाईन मी यमाकडे आज ॥53॥

अथापि किं जीवितमद्य मे वृथा त्वया विना चन्द्रनिभाननप्रभ ।

अनुव्रजिष्यामि वनं त्वयैव गौ: सदुर्बला वत्समिवाभिकांक्षया ॥54॥

चन्द्रासम मनोहर रूपि रामा तुझ्या विना कुत्सित जीवन जगू कसे ।
गाय दुर्बल जशी जाइ वासरासवे तशी वनी तुझासवे येईन मीहि ॥54॥

भृशमसुखम्मर्षिता तदा बहु विललाप समीक्ष्य राघवम् ।
व्यसनमुपनिशाम्य सा महत् सुतमिव बद्धमवेक्ष्य किंनरी ॥55॥

दु:ख सहण्यास असमर्थ जी असे करी रूदन अति राघवा समीप ।
जशी पाहुनि बन्धनि पुत्रास विलाप करी किन्नरी अतिदु:खित ॥55॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे विंश: सर्ग: ॥20॥

अयोध्याकाण्ड सर्ग 21

तथा त विलपन्तीं तां कौसल्यां राममातरम् ।
उवाच लक्ष्मणौ दीनस्तत्कालस्दृषं वच:॥1॥
विलाप करणाऱ्या त्या राममाता कौसल्येस ।
लक्ष्मण अत्यन्त दु:खी समयोचित वच बोलला ॥1॥
न रोचते ममाप्येतदार्ये यद् राघवो वनम् ।
त्यक्त्वा राज्यश्रियं गच्छेत स्त्रिया वाक्यवशंगत: ॥2॥

विपरीतश्च वृद्धश्च विषयैश्च प्रभर्षित:।

नृप: किमिव न ब्रूयाच्चोद्यमान: समन्वथ: ॥3॥

मजही न योग्य वाटे जाणे राम वनामध्ये ।

राजलक्ष्मीस सोडून स्त्रीवाक्य प्रभावामुळे॥2॥

वृद्ध ते असती त्यात कामदेवे वशीभूत ।

कैकेयीच्या प्रभावाने महाराज न बोलती ॥3॥

नास्यापराधं पश्यामि नापि दोषं तथाविधम् ।

येन निर्वास्यते राष्ट्राद् वनवासाय राघव: ॥4॥

अपराध राघवाचा अथवा दोष ना दिसे ।
ज्यामुळे राज्य सोडूनी वनी पाठवती तया ॥4॥

न तं पश्यामहं लोके परोक्षमपि यो नर:।
स्वमित्रोऽपि निरस्तोऽपि योऽस्य दोषमुदाहरेत ॥5॥

जगी न पाहतो मी जो शत्रु वा रामे तिरस्कृत ।
परोक्षहि दोष त्याला रामात येइ न काढता ॥5॥

देवकल्पमृगं दान्तं रिपूणामपि वत्सलम् ।
अवेक्षमाण:को धर्म त्यजेत पुत्रकारणात ॥6॥

त्यागेल कोणता राजा पुत्रास देवासम जो
शुद्ध,शत्रूंसही स्नेह दाखवी जो जितेंद्रिय ॥6॥

तदिदं वचनं राज्ञ: पुनर्बाल्यमुपेयुष: ।
पुत्र: को हृदये कुर्यात राजावृत्तमनुस्मरन् ॥7॥

विवेकशून्य झालेल्या राजास पुत्र कोणता
राजनीतिज्ञ हृदयी स्थान देइल आपुल्या ॥7॥

यावदेव न जानाति कश्चिदर्थमिमं नर:।
तावदेव मया सार्थमात्मस्थं कुरु शासनम् ॥8॥

जोवरी जाणी न कोणी वनवासाविषयि आपुल्या ।
तोवरी मम सहाय्ये घ्या राज्य ताब्यात आपुल्या ॥8॥

मया पार्श्वे सधनुषा तव गुप्तस्य राघव ।
कः समर्थोऽधिकं कर्तुं कृतान्तस्येव तिष्ठतः॥9॥

मी पाठीशी धनुष्यासह कृतान्तासम आपणा ।
पौरुषा दाखवायाला कोण समर्थ धजेलही ॥9॥

निर्मनुष्यामिमां सर्वामयोध्यां मनुजर्षभ ।
करिष्यामि शरैस्तीक्ष्णैर्यदि स्थास्यति विप्रिये ॥10॥

करतील नगरवासी विरोध जर करीन मी ।
अयोध्या निर्मनुष्य तीव्र शर वापरून मी ॥10॥

भरतस्याय पक्ष्यो वा यो वास्य हितमिच्छति ।
सर्वास्तांश्च वधिष्यामि मृदुर्हि परिभूयते ॥11॥

भरताचा पक्ष घेती वा हित त्याचे पाहती ।
वधीन सर्वा कारण तिरस्कृत दुर्बळ सदा ॥11॥

प्रोत्साहितोऽयं कैकेय्या संतुष्टो यदि नः पिता।
अमित्रभूतो निःसंगं वध्यतां वध्यतामपि ॥12॥

प्रोत्साहने कैकयीच्या पिता हो शत्रु जर आम्हा ।
तया बंदी करणे वा मारणे इष्ट निर्मम ॥12॥

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानत:।
उत्पथं प्रतिपन्नस्य कार्यं भवति शासनम् ॥13॥

गुरुही कर्तव्यच्युत होत कुमार्ग अवलंबती ।
शासन तया करणे होत आवश्यक तदा ॥13॥

बलमेष किमाश्रित्य हेतुं वा पुरुषोत्तम ।
दातुमिच्छति कैकेयी उपस्थितमिदं तव ॥14॥

विसंबून बळावरि कोणाच्या वा अन्य कारणे ।
कैकेयीस आपला हक्क का आपण देऊ इच्छिता ?॥14॥

त्वया चैव मया चैव कृत्वा वैरमनुत्तमम् ।
कास्य शक्तिः श्रियं दातुं भरतायारिशासन ॥15॥

आपल्या दोघांशी वैर करुनी शक्ति कोणती ।
ज्यामुळे भरता राज्य देण्या शक्य तयां असे ॥15॥

अनुरक्तोऽस्मि भावेन भ्रातरं देवि तत्त्वतः।
सत्येन धनुषा चैवं दत्तेनेष्टेन ते शपे ॥16॥

(कौसल्या) देवी घेउन धनु दान यज्ञ यांची ।
शपथ सांगतो सत्य बंधु राम मला प्रिय ॥16॥

दीप्तमग्निमरण्यं वा यदि राम: प्रविष्यति ।
प्रविष्टं तत्र मां देवि त्वं पूर्वमवधारय ॥17॥

ज्वलंत अग्नित वा घोर वनात श्रीराम शिरे ।
विश्वास मजवर ठेवा त्या आधी मी प्रवेशिन ॥17॥

हरामि वीर्याद् दु:खं ते तम: सूर्य इवोदित:।
देवी पश्यतु मे वीर्यं राघवश्चैव पश्यतु ॥18॥

तेव्हां शौर्य पहा माझे राघवासहि पाहु दे ।
शौर्ये आपले दु:ख हरीन सूर्य जसा तमा ॥18॥

हनिष्ये पितरं वृद्धं कैकेय्यासक्तमानसम् ।
कृपणं च स्थितं बाल्ये वृद्धभावेन गर्हितम् ॥19॥

वार्धक्ये विवेकहीन कैकेय्यासक्तिने दीन ।
वधीन पित्यास त्याच्या निंद्य वर्तनामुळे ॥19॥

एतत् तु वचनं श्रुत्वा लक्ष्मणस्य महात्मन:।
उवाच रामं कौसल्या रुदती शोकलालसा ॥20॥

महात्मा लक्ष्मणाचे उग्र उद्गार ऐकुनी ।
शोकमग्न कौसल्या रडत रामास वदे ॥21॥

भ्रातुस्ते वदतः पुत्र लक्ष्मणस्य श्रुतं त्वया ।
यदत्रानंतरं तत्त्वं कुरुष्य यदि रोचते ॥22॥

ऐकुनी लक्ष्मणाचे तू बोल जर योग्य वाटले ।
करी नंतर तू जैसे तुजला योग्य वाटते ॥22॥

न चाधर्म्यं वचः श्रुत्वा सपत्न्या मम भाषितम् ।
विहाय शोकसंतप्ता गन्तुमर्हसि मामितः॥23॥

सवतीचे अधर्म्य बोल ऐकुनी शोकविव्हल ।
मातेस सोडुनि तू जाणे मज योग्य न वाटते ॥23॥

धर्मज्ञ इति धर्मिष्ठ धर्मं चरिमिच्छसि ।
शुश्रूष मामिहस्थस्त्वं चर धर्ममनुत्तमम् ॥24॥

धर्मिष्ठ जाणसी धर्म पालण्या धर्म तेधवा ।
करी सेवा माझी राहुनी येथ धर्म पाळण्या ॥24॥

यथैव राजा पूज्यस्ते गौरवेण तथा ह्यहम् ।
त्वां साहं नानुजानामि न गन्तव्यमितो वनम् ॥25॥

जसे पूज्य महाराज तशी मीहि तुला असे ।
तर न वनी जाई माझी आज्ञा का न पाळसी ॥25॥
(म्हणजे महाराजांची जशी वनात जाण्याची तशी वनात न जाण्याची माझी आज्ञा तेव्हां माझी आज्ञाही तेवढीच पूज्य आहे असे तुला वाटत असेल तर तू वनात जाणे योग्य नाही असा अर्थ)

त्वद्वियोगान्न मे कार्यं जीवितेन सुखेन च ।
त्वया सह मम श्रेयस्तृणानामपि भक्षणम् ॥26॥

वियोगे तव जगण्याचे सुखाचेहि निधान ना।

तुझ्यासह खाऊनिया तृण जगणे श्रेयस्कर ॥26॥

यदि त्वं यास्यसि वनं त्यक्त्वा मां शोकलालसाम् ।

अहं प्रायमिहासिष्ये न च शक्ष्यामी जीवितुम् ॥27॥

शोकग्रस्त मज टाकून जर जाशील वनात तू।

उपोषण करुनि प्राण देईन न जगेन मी ॥27॥

ततस्त्वं प्राप्स्यसे पुत्र निरयं लोकविश्रुतम् ।

ब्रह्महत्यामिवाधर्मात समुद्र: सरितां पति:॥28॥

त्यामुळे तुज लाभेल लोके विख्यात पाप जे।

ब्रह्महत्येसम लाभे जे सरितापति सागरा ॥28॥

(समुद्राने मातेस दु:ख दिले असता पिप्पलाद ऋषींनी त्याला शासन केले ज्यामुळे त्याला नरकतुल्य दु:ख भोगावे लागले अशि पुराणकथा तिचा संदर्भ)

विलपन्तीं तथा दीनां कौसल्यां जननीं तत:।

उवाच रामो धर्मात्मा वचनं धर्मसंहितम् ॥29॥

जननीस रूदन करता पाहुनी दीन धर्मात्मा ।

वचन वदे श्रीराम धर्मसंहित जे असे ॥29॥

नास्ति शक्ति: पितुर्वाक्यं समतिक्रमितुं मम ।

प्रसादये त्वां शिरसा गन्तुमिच्छाम्यहं वनम् ॥30॥

मस्तक ठेवुनि तुझ्या चरणी प्रसाद मागतो ।

पितराज्ञा अनुल्लंघ्य वनी मी जाउ इच्छितो ॥30॥

ऋषिणा च पितुर्वाक्यं कुर्वता वनचारिणा ।

गौर्हता जानताधर्मं कण्डुना च विपश्चिता ॥31॥

पितुराज्ञेने गोहत्या अधर्म असता जरी ।

करी कण्डु मुनी विद्वान वनवासात राहता ॥31॥

अस्माकं तु कुले पूर्वं सगरस्याज्ञया पितुः।

खनद्भिः सागरैर्भूमिमवाप्तः सुमहान् वधः॥32॥

कुळात आपुल्या पूर्वी सगराचे पुत्र जाहले ।
पृथ्वीस खोदता मरती पितराज्ञेस पाळता ॥32॥

जामदग्न्येन रामेण रेणुका जननीं स्वयम् ।
कृता परशुनारण्ये पितुर्वचनकारणम् ॥33॥

परशुरामहि मातेस रेणुकेस परशुने ।
कण्ठ कापून करी ठार पित्राज्ञा पाळण्यास्तव ॥33॥

एतैरनैश्च बहुभिर्देवि देवसमैः कृतम् ।

पितर्वचनमक्लीबं करिष्यामि पितुर्हितम् ॥34॥

देवतुल्य जने ऐश्या पितराज्ञाच पाळली ।
तसे दौर्बल्य सोडून पित्याचे हित करीन मी॥34॥

नाहं धर्ममपूर्वं ते प्रतिकूलं प्रवर्तते ।
पूर्वैरयभिप्रेतो गतो मार्गोऽनुगम्यते ॥35॥

अपूर्व असे काही न करी तुजविरुद्ध मी ।
धर्मात्मे पाळती पूर्वी मार्ग अनुसरि तोच मी ॥36॥

तदेतत् तु मया कार्यं क्रियते भुवि नान्यथा ।

पितुर्हि वचनं कुर्वन् न कश्चिन्नाम हीयते ॥37॥

करतो त्यामुळे कार्य योग्य सर्वांस जे असे ।

पाळुनी पितराज्ञेस धर्म भ्रष्ट न होतसे ॥37॥

तामेवमुक्त्वा जननीं लक्ष्मणं पुनरब्रवीत्।

वाक्यं वाक्यविदां श्रेष्ठः श्रेष्ठः सर्वधनुष्मताम् ॥38॥

जननीस न्हणुनी ऐसे लक्ष्मणा तो पुन्हा वदे ।

श्रेष्ठ वाक्यवेत्त्यांत धनुर्धरातहि श्रेष्ठ जो ॥38॥

तव लक्ष्मण जानापि मयि स्नेहमनुत्तमम् ।

विक्रमं चैव सत्त्वं च तेजस्य सुदुरासदम् ॥39॥

लक्ष्मणा मज ज्ञात परमस्नेह मजवरी ।

पराक्रम तुझे सत्त्व तेज दुर्धर जाणतो ॥39॥

मम मातुर्महद् दु:खमतुलं शुभलक्ष्मण ।

अभिप्रायं न विज्ञाय सत्यस्य च शमस्य च ॥40॥

मातेस जे महद्दुख त्यामुळे असमर्थ ती ।

शम दु:ख अभिप्राय कळण्या मी जे बोलतो॥40॥

धर्मो हि परमो लोके धर्मे सत्यं प्रतिष्ठितम् ।

धर्मसंश्रितमप्येतत पितुर्वचनमुत्तमम् ॥41॥

धर्मच श्रेष्ठ या लोकी धर्मे सत्यप्रतिष्ठित।

पितृवचना धर्माधार यास्तव तेच उत्तम ॥41॥

संश्रुत्य च पितुर्वाक्यं मातुर्या ब्राह्मणस्य वा ।

न कर्तव्यं वृथा वीर धर्ममाश्रित्य तिष्ठता ॥42॥

धर्म पाळण्या वीरास माता पिता व ब्राह्मण ।

यांच्या वचनास वृथा करणे कर्तव्यच्च्युति ही असे ॥42॥

सोऽहं न शक्ष्यामि पुनर्नियोगमतिवर्तितुम् ।

पितुर्हि वचनाद् वीर कैकेय्याह प्रचोदित: ॥43॥

उल्लङ्घी न पितराज्ञा वनी जाण्यास सांगता ।

कैकेयीने सांगितले पित्याच्या वचनामुळे ॥43॥

तदेतां विसृजानार्यां क्षत्रधर्माश्रितां मतिम् ।

धर्ममाश्रय मा तैक्ष्ण्यं मबुद्धिरनुगम्यताम् ॥44॥

अनार्य क्षात्रबुद्धि ही सोड धर्मा आश्रय ।

कठोर बुद्धि सोडून विचार मम आचरी ॥44॥

तमेवमुक्त्वा सौहार्दाद् भ्रातरं लक्ष्मणाग्रज: ।

उवाच भूय: कौसल्यां प्राञ्जलि: शिरसा नत: ॥45॥

लक्ष्मणा प्रेमभरे ऐसे बोलुनी हात जोडुनी ।
नत मस्तक श्रीराम कौसल्येस वदति असे ॥45॥

अनुमन्यस्व मां देवि गमिष्यन्तमितो वनम् ।
शापितासि मम प्राणै: कुरु स्वस्त्ययनानि मे ॥46॥

वनी जात मी देवी स्वस्तिवाचन करूनि घे ।
आज्ञा दे मज प्राणांची शपथ घेऊन सांगतो ॥46॥

तीर्णप्रतिज्ञश्च वनात् पुनरेष्याम्यहं पुरीम् ।

ययातेरिव राजर्षि:पुरा हित्वा पुनर्दिवम् ॥47॥

पूर्वी ययाति राजर्षि स्वर्गलोकातुनी भूवरी ।

उतरले तैसा येईन अयोध्येस वनातुनी ॥47॥

शोक: संधार्यतां मातर्हृदये साधु मा शुच:।

वनवासादिहैष्यामि पुन: कृत्वा पितुर्वच: ॥48॥

शोक हृदयी राहूदे पितराज्ञा मी पाळुनी ।

परतेन वनातुनि माते शोक न तू करी ॥48॥

त्वया मया च वैदेह्या लक्ष्मणेन सुमित्रया ।

पितर्नियोगे स्थातव्यमेष धर्म: सनातन:॥49॥

तुम्हा,मला सीतेला सुमित्रेसह लक्ष्मणा ।
पित्याच्या आज्ञेत रहाणे हाच धर्म सनातन ॥49॥

अम्ब सम्भृत्य सम्भारान् दु:खं हृदि निगृह्य च ।
वनवासकृता बुद्धिर्मम धानुवर्त्यताम् ॥50॥

माते अभिषेकसामग्री ठेव मनी दु:ख दाबुनी ।
धर्मानुकूल विचार माझा पाळ दे आज्ञा मज ॥5॥

एतद् वचस्तस्य निशम्य माता सुधर्म्यमव्यग्रमविक्लवं च ।

मृतेव संज्ञां प्रतिलभ्य देवी समीक्ष्य रामं पुनरित्युवाच ॥51॥

धर्मानूकूल त्याचे व्यग्रता व्याकुळतेसह बोल ऐकुनि जणू ।
मृतात यावा प्राण तशी कौसल्या शुद्धीत येऊनि वदे श्रीरामा ॥51॥

यथैव ते पुत्र पिता तथाहं गुरु: स्वधर्मेण सुहृतया च ।
न त्वानुजानामि न मां विहाय सुदु:खितामर्हसि पुत्र गन्तुम् ॥52॥

जसे धर्म सौहार्द नात्याने पिता आदरणीय गुरू तशीच मी ।
आज्ञा न मी देता मज सोडूनि दु:खी जाणे नसे योग्य तुला ॥52॥

किं जीवितेनेह विनात्वया मे लोकेन वा किं स्वधयामृतेन ।

श्रेयो मुहर्तं तव संनिधानं ममैव कृत्स्नादपि जीवलोकात ॥53॥

जगण्यात काय लाभ तुझ्याविना देवा पितरा पूजा वा अमृत असे जरि ।
सहवास तुझा दोन घडीचा पृथ्वीच्या सर्व राज्याहुनी सुखदायक ॥53॥

नरैरिवोल्काभिरपोह्यमानो महागजो ध्यान्तमभिप्रविष्ट: ।
भूय: प्रजज्वाल विलापमेवं निशम्य राम: करुणं जनन्या: ॥54॥

जसा विशाल गजराज अन्धकूपे पतित लोकपीडित क्रुद्ध होत ।
तसेच श्रीराम ऐकूनि पुन:पुन्हा विलाप मातेचा होती क्रुद्ध ॥54॥

स मातरं चैव विसंज्ञकल्पामार्तं च सौमित्रिमभिप्रतप्तम् ।

धर्मे स्थितो धर्म्यमुवाच वाक्यं यथा स एवार्हति तत्र वक्तुम् ॥55॥

राहूनि धर्मावर स्थित बोल ऐसे असंज्ञ मातेस लक्ष्मणास क्रुद्ध ।
श्रीराम वदती तयां धर्मानुकूल अश्या अवस्थेत जे योग्य सर्व॥55॥

अहंहि ते लक्ष्मण नित्यमेव जानामि भक्तिं च पराक्रमं च ।
मम त्वभिप्रायमसंनिरीक्ष्य मात्रा सहाभ्यर्दसि मा सुदु:खम् ॥56॥

मी जाणतो लक्ष्मणा तव भक्ति मजवरी तसा पराक्रमही तुझा ।
परी अभिप्राय न जाणता मम मातेसवे दु:ख एसी तू मला ॥56॥

धर्मार्थकामा: खलु जीवलोके समीक्षिता धर्मफलोदयेषु ।

ये तत्र सर्वे स्युरसंशयं मे भार्येव वश्याभिमता सपुत्रा ॥57॥

धर्म अर्थ काम तीन्ही जीवलोके अवश्य प्राप्त नि:संशय हे ।

भार्या तशी साधन होत सर्व या पुरुषार्था पुत्रवती होउनी ॥57॥

(पत्नी अतिथिसत्कार करताना धर्माचा,प्रेअयसी म्हणून कामाचा आणि पुत्रवती हो ऊन अर्थाचा अश्या तिन्ही पुरुषार्थाची कारण बनते हा अर्थ)

यस्मिंस्तु सर्वे स्युरसंनिविष्टा धर्मो यत: स्यात तदुपक्रमेत ।

द्वेष्यो भवत्यर्थपरो हि लोके कामात्मता खल्वपि प्रशस्ता ॥58॥

धर्मात ज्या पुरुषार्थ सर्व समाविष्ट नसती तो पाळणे न योग्य ।

केवळ अर्थपरायण असे द्वेष्पात्र कामासक्ति न धर्मात योग्य ॥58॥

गुरुश्च राजा च पिता च वृद्धः क्रोधात प्रहर्षादथवापि कामात।
यद् व्यादिशेत कार्यमवेक्ष्य धर्मं कस्तं न कुर्यादनृषंसवृत्तिः॥59॥

गुरु,राजा पिता तैसे वृद्ध जरि क्रोधात ,हर्षात वा कामात वा ।
आज्ञा करती ती पाळणे हा धर्म पाळि जो नृशंसवृत्तिहीन ॥59॥

न तेन शक्नोमि पितुः प्रतिज्ञामिमां न कर्तुं सकलां यथावत ।
न ह्यावयोस्तात गुरुर्नियोगे देव्याश्च भर्ता स गतिश्च धर्मः॥60॥

त्यामुळे पित्याची संपूर्ण प्रतिज्ञा यथावत न पाळणे नसे शक्य मज ।

आदेश आम्हा दोघा देण्या ते समर्थ गुरु ,मातेस तर गति पति धर्म॥60॥

तस्मिन् पुनर्जीवति धर्मराजे विशेषत: स्वे पथि वर्तमाने ।

देवी मया सार्धमितोऽभिगच्छेत् कथंस्विदन्या विधवेव नारीं ॥61॥

पुन्हा त्यात महाराज जीवित स्थित मार्गी धर्ममय आपुल्या ।

माते तदा विधवा स्त्रीसम मजसवे वनि येउ कशी शकतीस तू ॥61॥

सा मानुमन्यस्व वनं व्रजन्तं कुरुष्व न: स्वस्त्ययनानि देवि ।

यथा समाप्ते पुनराव्रजेयं यथा हि सत्येन पुनर्ययाति: ॥62॥

तरी मला वनात जाण्या आज्ञा दे स्वस्तिवाचन करूनि देवि ।

येईन पुन्हा सेवेस संपता वनवास जसा ययाति पुन्हा येतसे ॥62॥

यशो ह्यहं केवलराज्यकारणान्न पृष्ठत: कर्तुमलं महोदयम् ।
अदीर्घकालेन तु देवि जीविते वृणेऽवरामद्य महीमधर्मत: ॥63॥

धर्महीन राज्यास्तव टाळणे धर्मपालन फलदायक नसे मज शक्य ।
जीवित नसे दीर्घ तरी अधर्मे राज्य पृथ्वीचे न घेऊ इच्छितो मी ॥63॥

प्रसादयन्नरवृषभ: स मातरं प्राक्रमाज्जिगमिषुरेव दण्डकान् ।
अथानुजं भृशमनुशास्य दर्शनं चकार तां इदि जननीं प्रदक्षिणम् ॥64॥

श्रीराम नरश्रेष्ठ प्रसन्न करती यापरी दंडकारण्यी जाण्यास्तव मातेस ।
लक्ष्मणा अनुजा समजावुनि धर्मरहस्य मातेस परिक्रमा मनोमनी करी ॥64॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकविंशं सर्ग: ॥21॥

अयोध्याकाण्ड सर्ग 22

अथ तं व्यथया दीनं सविशेषमर्षितम् ।
सरोषमिव नागेन्द्रं रोषविस्फारितेक्षणम् ॥1॥
आसाद्य रामः सौमित्रिं सुहृदं भ्रातरं प्रियम् ।
उवाचेदं स धैर्येण धारयन् सत्त्वमात्मवान् ॥2॥

मानसिक व्यथेने दीन क्रोधे गजराजासम ।
पाही जो सौमित्र नेत्रे विस्फारित अश्या तया ॥1॥

सुहृद हितैषी भ्राता लक्ष्मणाजवळ जाउनी ।
निर्विकारी स्वचित्ताने श्रीराम त्यास बोलती ॥2॥

निगृह्यं रोषं शोकं च धैर्यमाश्रित्य केवलम् ।
अयमानं निरस्यैन गृहीत्वा हर्षमुत्तमम् ॥3॥
उपक्लुप्तं यदैतन्मे अभिषेकार्थमुत्तमम् ।
सर्वं निवर्तय क्षिप्रं कुरु कार्यं निरव्ययम् ॥4॥

मनी धैर्या ठेऊन दूर क्रोध शोक करी ।
अपमानभावना दूर करुनी हर्षित मने ॥3॥

सामग्री अभिषेकाची करा दूर अतित्वरे ।
ज्यामुळे वनगमनी बाधा उपस्थित न हो ॥4॥

सौमित्र योऽभिषेकार्थे मम सम्भारसम्भ्रम: ।
अभिषेकनिवृत्यर्थे सोऽस्तु सम्भारसम्भ्रम:॥5॥

अभिषेकार्थ सामग्री मिळवाया उत्साह जो ।
रोकाया अभिषेक तसाच वापरशील तू ॥5॥

यस्या मदभिषेकार्थे मानसं परितप्यते ।
माता न: सा यथा न स्यात सविशङ्का तथा कुरु ॥6॥

अभिषेकामुळे माझ्या माता संतप्त जी तिला ।
शंका न उरे ऐसे काम तू कर आज तू ॥6॥

तस्या: शङ्कामयं दु:खं मुहूर्तमपि नोत्सहे ।
मनसि प्रतिसंजातं सौमित्रेऽहमुपेक्षितुम् ॥7॥

शंकेने तिच्या मनि दु:ख क्षणही न मज साहवे।
तशीच तिची उपेक्षा करणे ही मज नावडे ॥7॥

न बुद्धिपूर्वं नाबुद्धं स्मरामीह कदाचन ।
मातृणा वा पितुर्हि कृतमल्पं च विप्रियम् ॥8॥

बुध्या किंवा नकळत माता पित्यांचा अल्पही ।
अपराध केला मी असे मजला नच आठवे ॥8॥

सत्य: सत्याभिसंधश्च नित्यं सत्यपराक्रम:।
परलोकभयाद् भीतो निर्भयोऽस्तु पिता मम ॥9॥

सत्यवादी सदा सत्यपराक्रमी पिता मम ।
निर्भय ते परलोकी कृत्या ऐशा करेन मी ॥9॥

तस्यापि हि भवेदस्मिन् कर्मण्यप्रतिसंहृते ।
सत्यं नेति मनस्तापस्तस्य तापस्तपेच्च माम् ॥10॥

अभिषेकवच मी त्यांचे कर्मे मम न पाळले ।
मनस्ताप त्यामुळे त्यांचा संतप्त करील मज ॥10॥

अभिषेकविधानं तु तस्मात संहृत्य लक्ष्मण ।
अन्वगेवाहमिच्छामि वनं गन्तुमित: पुर: ॥11॥

अभिषेक समारंभ थांबवूनि मी लक्ष्मणा ।
वनात म्हणुनी शीघ्र जाण्यास उत्सुक असे ॥11॥

मम प्रव्राजनादद्य कृतकृत्या नृपात्मजा ।
सुतं भरतमव्यग्रमभिषेचयतां तत: ॥12॥

जाता मी राजकुमारी कैकेयी कृतकृत्य जी।
नि:शंक मने भरतास अभिषेक करेल ती ॥12॥

मयि चीराजिनधरे जटामण्डलधारिणि}
गतेऽरण्ये व कैकेय्या भविष्यति मन: सुखम् ॥13॥

वल्कले मृगचर्मे मी धारुनीया जटाजुट ।
वनी निघुनि मी जाता मनात कैकेयी सुखी ॥13॥

बुद्धि: प्रणीता येनेयं मनश्च सुसमाहितम् ।
तं नु नार्हामि संक्लेष्टुं प्रव्रजिष्यामि मा चिरम् ॥14॥

प्रेरणा जिची तीव्र वनात मज धाडण्या ।
विफल करुनी कष्ट देणे योग्य तिला नसे ॥14॥

कृतान्त एव सौमित्रे द्रष्टव्यो मत्प्रवासने ।
राज्यस्य च वितीर्णस्य पुनरेव निवर्तने ॥15॥

पित्याने राज्य दिलेले सोडावे मज लागणे ।
दैव कारण सौमित्रा प्रवासास असे मम ॥15॥

कैकेय्या: प्रतिपत्तिर्हि कथं स्यान्मम वेदने ।
यदि तया न भावोऽयं कृतान्तविहितो भवेत ॥16॥

कैकेयीस अशी बुद्धी होण्या दैवचि कारण ।
अथवा पीडा मजला का देई वनि धाडुनि ॥16॥

जानासि हि यथा सौम्य न मातृषु ममान्तरम् ।
भूतपूर्वं विशेषो वा तस्या मयि सुतेऽपि वा ॥17॥

तुज ज्ञात असे सौम्या न भेद मम अन्तरी ।
मातांप्रति कैकेयीसही माझ्यात पुत्रात तिच्या ॥17॥

सोऽभिषेकनिवृत्त्यर्थैः प्रवासायैश्च दुर्वचैः।
उग्रैर्वाक्यैरहं तस्या नान्यद् दैवात समर्थये ॥18॥

अभिषेक रोखुनी वनी धाडाया जे दुर्वच ।
असह्य बोलली माता दैव केवळ कारण ॥18॥

कथंप्रकृतिसंपन्ना राजपुत्री तथागुणा:।
ब्रूयात सा प्रकृतेव स्त्री मत्पीड्यं भर्तृसंनिधौ ॥19॥

उत्तम स्वभाव श्रेष्ठ राजपुत्री गुणे अशी ।
सामान्य स्त्रीसम बोले दु:खकर भर्त्यापुढे ॥19॥

यदचिन्त्यं तु तद् दैवं भूतेष्वपि न हन्यते ।
व्यक्तं मयि च तस्यां च पतितो हि विपर्यय:॥20॥

चिन्तिले तसे न घडणे दैव हे ज्या टाळणे।
भूतां नसे शक्य त्यामुळे कैकेयी मज बाधते ॥20॥

कश्च दैवेन सौमित्रे योद्धमुत्सहते पुमान्।
यस्य नु ग्रहणं किंचित् कर्मणोऽन्यन्न दृश्यते ॥21॥

दैवासवे सौमित्रा लढण्या कोण शके।
ज्यामुळे फळ कर्माचे अन्यत्र नच ते कळे ॥21॥

सुखदु:खे भयक्रोधौ लाभालाभौ भवाभवौ।
यस्य किंचित् तथाभूतं ननु दैवस्य कर्म यत् ॥22॥

सुख दु:ख भय क्रोध लाभ हानि प्रकार हे ।
न समजे कारण ज्याचे सर्वां दैवच कारण ॥22॥

ऋषयोऽप्युग्रतपसो दैवेनाभिप्रचोदिता:।
उत्सृज्य नियमांस्तीव्रान् भ्रश्यन्ते काममन्युभि:॥23॥

दैवे प्रेरित ऋषि मुनीही तीव्र नियमां सोडुनी ॥
काम क्रोधे विवश होउनि मर्यादाभ्रष्ट होत ते ॥23॥

असंकल्पितमेवेह यदकस्मात प्रवर्तते ।
निवारब्धमारम्भैर्ननु दैवस्य कर्म तत ॥24॥

अकल्पित असे काही कार्यसिद्धीस थांबवे ।
आरम्भ केल्या कार्यास असे हीच दैवगति ॥24॥

एतया तत्वया बुद्ध्या संस्तभ्यात्मानमात्मना ।
व्याहतेऽप्यभिषेके मे परितापो न विद्यते ॥25॥

तात्विक बुद्धीने या मना स्थिर केल्यामुळे।
अभिषेक टळला याचे न वाटे सु:ख संताप ॥25॥

तस्मादपरितापः संस्त्वमप्यनविधाय माम् ।
प्रतिसंहारय क्षिप्रमाभिषेचनिकी क्रियाम् ॥26॥

अनुसरुनि मजला संतापाविन थांबव ।
अभिषेक आयोजन जैसे वदल्यापरी ॥26॥

एभिरेव घटैः सर्वैरभिषेचनसंभृतैः ।
मम लक्ष्मण तापस्य व्रतस्नानं भविष्यति ॥27॥

लक्ष्मणा राज्याभिषेका सजबुनी घटाद्वारे ।
राज्याभिषेकास्तव माझे तापसस्नान होइल ॥27॥

अथवा किं मयैतेन राज्यद्रव्यनयेम तु।
उद्धृतं मे स्वयं तोयं व्रतादेहं करिष्यति ॥28॥

आता मंगलद्रव्य घट आवश्यक कश्यास्तव ।
जल स्वत: काढलेले ब्रतसाधक होइल ॥28॥

मा च लक्ष्मण संतापं कार्षीर्लक्ष्या विपर्यये ।
राज्यं वा वनवासो वा वनवासो महोदय ॥29॥

लक्ष्मी सोडुनी गेल्यावा करी न संताप लक्ष्मणा ।
माझ्यास्तव वमवास राज्य दोन्ही समान चि ॥29॥

न लक्ष्मणास्मिम् मम राज्यविघ्ने माता यवीयस्यभिशंकितव्या ।
दैवानिपन्ना न पिता कथंचिज्जानसि दैवं हि तथाप्रभावम् ॥30॥

विघ्नास राज्याभिषेकास माझ्या कैकेयी कारण असे न मनी बाळगी ।
दैवाअधीन ती असे तैसे पिताही देव अद्भुत प्रभाव त्यास कारण ॥30॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वालीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे द्वाविंशः सर्गः ॥22॥

अयोध्याकाण्ड सर्ग 23

इति ब्रुयति रामे तु लक्ष्मणोऽवाक् शिरा इव ।
ध्यात्वा मध्यं जगामाशु सहसा दैन्यहर्षयो:॥1॥
श्रीराम वदती ऐसे विचारी लक्ष्मण मनी।
घटनेने दु:ख वाटे परि वच ऐकुनि हर्षित ॥1॥
तदा तु बद्ध्वा भ्रुकुटी ध्रुवोर्मध्ये नरर्षभ:॥
निशश्वास महासर्पो बिलस्थ इव रोषित ॥2॥

चढवूनि भिवया श्वास दीर्घ जोरात घेइ तो।
बिळामध्ये जणु नाग त्वेषाने फुसकारतो ॥2॥

तस्य सुष्प्रतिवीक्ष्य तद् भृकुटीसहितं तदा ।
बभौ क्रुद्धस्य सिंहस्य मुखस्य सदृशं मुखम् ॥3॥

भिवया चढविलेले भासे कृद्ध सिंहापरी ।
मुख त्याचे पहाण्यास अतिभयंकर वाटते ॥3॥

अग्रहस्तं विधुन्वंस्तु हस्ती हस्तमिवात्मन:।
तिर्यगूर्ध्वं शरीरे च पातयित्वा शिरोधरम् ॥4॥

अग्राक्ष्णा वीक्षमाणस्तु तिर्यग्भ्रातरमब्रवीत ।

हलवी दक्षिण हात शुंडेपरि हत्तीच्या जणु ।

वरखाली दोन्हीकडे अंग हलवुनी पाहुनी ॥4॥

दृष्टी रोखुन पाहूनी श्रीरामास बोलतो असे ।

अस्थाने सम्भ्रमो यस्य जातो वै सुमहानयम् ॥5॥

धर्मदोषप्रसङ्गेन लोकस्यानतिशङ्कया ।

कथं ह्येतदसम्भ्रान्तस्त्वद्विधो वक्तुमर्हति ॥6॥

यथा ह्येवमशौण्डीरं शौण्डीरः क्षत्रियर्षभ ।

किं नाम कृपणं दैवमशक्तमभिशंससि ॥7॥

अयोग्य स्थानी संभ्रम महात्म्या आपणास हा ॥5॥
धर्माचा दोष लागेल किंवा लोक शंकित होतिल ।
भ्रान्तिपूर्ण द्विधा बोल बोलु तू शकतो कसे ॥6॥
क्षत्रियशिरोमणि तू भ्रमात पडल्यामुळे ।
साधारण नरापरि दैवा मानसी या कारण ॥7॥

पापयेस्तो कथं नाम तयो: शङ्का न विद्यते ।
सन्ति धर्मोपधासक्ता धर्मात्मन् किं न बुध्यसे ॥8॥

त्या दोघा पाप्यांचा का नसे संदेह आपणा ।
धर्माचे करुनी ढोंग इतरां फसवीत जे ॥8॥

तयोः सुचरितं स्वार्थं शाठ्यात परिजिहीर्षतो ।
यदि नैवं व्यवसितं स्याद्धि प्रागेव राघव ।
तयोः प्रागेव दत्तश्च स्याद् वरः प्रकृतश्च सः ॥9॥

स्वार्थास्तव धर्माच्या नावे परित्यजति तुम्हा ।
असे नसते तर हे यापूर्वीच घडले असते ।
ठरण्यापूर्वीच अभिषेक दिधले असते वर ॥9॥

लोकविदिष्टमारब्धं त्वदन्यस्याभिषेचनम् ।

नोत्सहे सहितुं वीर तत्र मे क्षन्तुमर्हसि ॥10॥

लोकविरुद्ध प्रथेचा घडे आरम्भ आजच ।

गुणवान् ज्येष्ठ पुत्र असताना कनिष्ठ पुत्रास अभिषेक हे लोकविरुद्ध कार्य

आपणाविन अन्या मी अभिषेक न साहतो ॥10॥

येनैवमागता द्वैधं तव बुद्धिर्महामते ।

सोऽपि धर्मो मम द्वेष्यो यत्प्रसंगात् विमुह्यसि ॥11॥

पितुर्वचने तुमची बुद्धी होत द्विधा अशी ।

धर्मास न मानतो मी मोह ज्याचा तुम्हा पडे ॥11॥

कथं त्वं कर्मणा शक्त: कैकेयीवशवर्तिन:।

करिष्यसि पितर्वाक्यमधर्मिष्ठं विगर्हितम् ॥12॥

समर्थ असता आपण पराक्रमे करण्यास जे।

कैकेयीवश पित्याचे का अधर्मवच पाळसी ॥12॥

यदयं किल्विषाद् भेद: कृतोऽप्येवं न गृह्यते ।

जायते तत्र मे दु:खं धर्मसङ्गश्च गर्हित: ॥13॥

वर कल्पना खोटी अभिषेका आड आपण ।

स्वीकारता न पटते धर्मस्वीकार अयोग्य हा ॥13॥

तवायं धर्मसंयोगो लोकस्यास्य विगर्हित:।

मनसापि कथं कामं कुर्यात त्वां कामवृत्तयो:।

तयोस्त्वहितयोर्नित्यं शञ्चो: पित्रभिधानयो: ॥14॥

धर्मपालन हे आपले लोकाकडुनि निन्दित ।

करी अहित पुत्राचे अश्या कामवृत्ति पित्या ।

मनोरथ मातेचेहि पूर्ण लैसे करीसि तू ॥14॥

यद्यपि प्रतिपत्तिस्ते दैवी चापि तयोर्मतम ।

तथाप्युपेक्षणीय ते न मे तदपि रोचते ॥15॥

मत प्रेरित असे त्यांचे दैवे हेहि न पटे मज ।

जरी आपणा असे वाटे उपेक्षणीय ते असे ॥15॥

विक्लवो वीर्यहीनो य: स दैवमनुवर्तते ।

वीरा: सम्भावितात्मानो न दैवं पर्युपासते ॥16॥

पराक्रमी जे नसती भित्रे दैवी विसंबती ।

वीर शक्तिशाली जे दैवास नच मानती ॥16॥

दैवं पुरुषकारेण य: समर्थ: प्रबाधितुम् ।

न दैवेन विपन्नर्थ: पुरुष: सोऽयसीदति ॥17॥

पुरुषार्थे बदलाया दैव समर्थ जो असे ।

कार्यात दैवे विघ्न येता शान्त न राहतो ॥17॥

द्रक्ष्यन्ति त्वद्य दैवस्य पौरुषं पुरुषस्य च ।

दैवमानुषयोरद्य व्यक्ता व्यक्तिर्भविष्यति ॥18॥

पाहतील आज सर्व दैव पुरुषार्थ यातुनी ।

श्रेष्ठ कोण, समजेल दैव की मनुष्य हे ॥18॥

अद्य मे पौरुषहतं दैवं द्रक्ष्यन्ति वै जना:।

यैर्दैवादाहतं तेऽद्य दृष्टं राज्याभिषेचनम् ॥19॥

पाहती राज्याभिषेका दैवे नष्ट होता जन ।

तेच पाहतील दैवाचा विनाश पुरुषार्थे मम ॥19॥

अत्यंकशमिवोद्दामं गजं मद जलोद्धतम् ।

प्रधावितमहं दैवं पौरुषेण निवर्तये ॥20॥

मानी न अंकुशा तोडी शृंखला मदमत्त जो ।

गजासम त्या दैवा हटवीन पुरुषार्थे मम ॥20॥

लोकपाला: समस्तास्ते नाद्य रामाभिषेचनम् ।

न च कृत्स्नास्त्रयो लोका विहन्यु: किं पुन: पिता ॥21॥

रोखण्या रामाभिषेका जन तिन्ही लोकांतले ।

लोकपालहि असमर्थ पित्याची काय शक्यता ॥21॥

यैर्विवासस्तवारण्ये मिथो राजन् समर्थित:।

अरण्ये ते विवत्स्यन्ति चतुर्दश समास्तथा॥22॥

समर्थन करती जे आपणा वनि धाडण्या ।

लपतील चौदा वर्षे अरण्यी तेच जाउनी ॥22॥

अह तदाशां भक्ष्यामि पितुस्तस्याश्च या तव ॥

अभिषेकविधातेन पुत्रराज्याय वर्तते ॥23॥

पित्याची तशि मातेची अभिषेक भरतासचि ।

करण्याची आशाही भस्म मी करुन टाकिन ॥23॥

मबलेन विरुद्धाय न स्याद् दैवबलं तथा ।

प्रभविष्यति दु:खाय यथोग्रं पौरुषं मम ॥24॥

माझ्याविरुद्ध उभा जो दु:ख माझ्या बले तया ।

होईल तेवढे दैवे सुख त्या लाभेल ना ॥24॥

ऊर्ध्वं वर्षसहस्रान्ते प्रजापाल्यमनन्तरम् ।

आर्यपुत्राः करिष्यन्ति वनवासं गते त्वयि ॥25॥

सहस्र वर्षे करुनी प्रजापालन वनी जाता ।

आपला पुत्र करील नंतर काम आपुले ॥25॥

पूर्वराजर्षिवृत्या हि वनवासोऽभिधीयते ।

प्रजा निक्षिप्य पुत्रेषु पुत्रवत परिपालने ॥26॥

वनात पूर्वी राजर्षि सोपवूनि पुत्रा हाती ।

पुत्रवत प्रजा पालन करण्या उचित ते असे ॥26॥

स चेद् राजन्यनेकाग्रे राज्यविभ्रमशंकया ।

नैवमिच्छसि धर्मात्मन् राज्यं राम त्वमात्मनि ॥27॥

तसे न करती पिता म्हणुनी शंकित मनी ।
न घेता राज्य वनि जासी तरी शंका न ती धरी ॥27॥

प्रतिजाने च ते वीर मा भूवं वीरलोकभाक् ।
राज्यं च तव रक्षेयमहं वेलेव सागरम् ॥28॥

प्रतिज्ञा करतो रक्षा आपली राज्यासवे ।
न करीन जर मी तैसे वीरलोका न जाइन॥28॥

मङ्गलैरभिषिंचस्व तत्र तं व्याप्तो भव ।

अहमेको महीपालानलं वारयितुं बलात ॥29॥

म्हणुनी करा अभिषेक सामग्री मंगल योजुनी ।

विरोध करी सर्वांना एकटा मी रोखतो ॥29॥

न शोभार्थाविमौ बाहू न धनुर्भूषणाय मे ।

नासिराबन्धनार्थाय न शरा: स्तम्भहेतव:॥30॥

शोभेस्तव न हे बाहू धनुष्य भूषणापरी ।

खड्ग ना बांधण्यासाठी स्तंभ ना बाण हे मम ॥30॥

अमित्रमथनार्थाय सर्वमेतच्चतुष्टयम् ।

न चाहं कामयेऽत्यर्थं यः स्याच्छत्रुर्मतो मम ॥31॥

दमनास्तव शत्रूच्या असती चार हे मम ।

शत्रू मी मानतो त्याला जिवंत नच ठेवतो ॥31॥

असिना तीक्ष्णधारेण विद्युच्चलितवर्चसा ।

प्रगृहीतेन वै शत्रु वज्रिणं वा न कल्पये ॥32॥

तीक्ष्ण या तलवारीने तळपणाऱ्या विजेसम ।

इन्द्र जरी असेल शत्रु न टिके पुढती मम ॥32॥

खड्ग्निष्पेषनिष्पिष्टैर्गहना दुश्चरा च मे ।

हस्त्यश्वरथिहस्तोरुशिरोभिर्भविता मही ॥33॥

रथी अश्व गज यांचे तुटोनि अवयव सडा ।

पडुनी मत्खड्गप्रहारे भूमी चालण्या ना उरे ॥33॥

खड्गधाराहता मेऽथ दीप्यमाना इवाग्नय:।

पतिष्यन्ति द्विषों भूमौ मेघा इव सविद्युत:॥34॥

खड्गे घायाळ शत्रु जळत्या अग्निपरी भासुनी ।

विजेसह मेघांसम पृथ्वीवरि पडती दिसे ॥34॥

बद्धगोधाङ्गलित्राणे प्रगृहीतशरासने ।

कथं पुरुषमानी स्यात् पुरुषाणां मयि स्थिते ॥35॥

गोचर्मावरणवेष्टित हस्ते धरता धनुष्य मी ।

मजपुढे अश्या कोणी पौरुष अभिमानी नुरे ॥35॥

बहुभिश्चैकमत्यस्यन्नेकेन च बहून्जनान् ।

वियोक्ष्याम्यहं बानान्नृवाजिगजमर्मसु ॥36॥

अनेक बाणे एका किंवा एका बाणे अनेका ।

करेन धराशायी मी गजा अश्वा तथा नरां ॥36॥

अथ मेऽस्त्रप्रभावस्य प्रभाव: प्रभविष्यति।

राज्ञश्चाप्रभुतां कर्तुं प्रभुत्वं च तव प्रभो ॥37॥

प्रभुत्वा करण्या नष्ट पित्याचे तव स्थापण्या ।

प्रभाव मम अस्त्राचा प्रकट होइल आज हा ॥37॥

अद्य चन्दनसारस्य केयूरामोक्षणस्य च ।

वसूनां च विमोक्षाय सुहृदां पालनस्य च ॥38॥

अनुरूपाविमौ बाहू राम कर्मं करिष्यत:।

अभिषेचन विघ्नघ्नस्य कर्तृणां ते निवारणे ॥39॥

भुजा चन्दनलिप्त केयूर धारण्यास वा ।

दान करण्यास धन सुहृदा पालनास्तव ॥38॥

पराक्रम अनुरूप दाखवुनी टाळतील ।

अभिषेकात जे विघ्न आणती त्यां रोखुनी ॥39॥

ब्रवीहि कोऽद्यैव मया वियुज्यतां तया सुहृत प्राणयश: सुहृज्जनै:।

यथा तवेवं वसुधा वशा भवेत तथैव मां शाधि तवास्मि किंकर: ॥40॥

सांगा मला आपल्या कोणत्या शत्रुला करू दूर प्राण,यश स्वजनांपासुनी ।

उपाय पृथ्वीस अधिकारात आपुल्या सांगा कराया मी दास आपुला ॥40॥

विमृज्य बाष्पं परिसान्त्व्य चासकृत स लक्ष्मण राघववंशवर्धनं ।

उवाच पित्रोर्वचने व्यवस्थितं निबोध मामेष हि सौम्य सत्पथ ॥41॥

करूनि सान्त्वन पुसूनि डोळे रघुवंशवर्धन लक्ष्मणास राम ।
माता पित्याची आज्ञाच पाळणे कर्तव्य हे सत्पुरुष म्हणूनि मम ॥41॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्रयोविंश: सर्ग: ॥23॥

अयोध्याकाण्ड सर्ग 24

तं समीक्ष्य व्यवसितं पितुर्निर्देशपालने ।
कौसल्या बाष्पसंरुद्धा वचो धर्मिष्ठमब्रवीत ॥1॥

पाहुनी दृढनिश्चयी त्या पितुराज्ञा पाळण्या ।
कौसल्या धर्मात्मा रामा गद्गद वाणीने वदे ॥1॥

अदृष्टदु:खो धर्मात्मा सर्वभूतप्रियंवद ।
मयि जातो दशरथात कथमुञ्छेन वर्तयेत ॥2॥

सर्वभूतांस प्रिय जो झाला दशरथापासुन ।
दु:ख न कधी पाहिले तो कसा वनात राहिल ॥2॥

यस्य भृत्याश्च दासाश्च मृष्टान्यन्नानि भुञ्जते ।
कथं स भोक्ष्यते रामो वने मूलफलान्ययम् ॥3॥

दास भृत्यहि मिष्टान्न खाति ज्याचे श्रीराम तो ।
वनात कसा राहील कंदमूळा भक्षुनी ॥3॥

क एतच्छ्रद्दधेच्छ्रुत्वा कस्य वा न भवेद् भयम् ।
गुणवान् दयितो राज्ञ: काकुत्स्थो यद् विवास्यते ॥4॥

कोण विश्वास ठेवेल ऐकून भय ना कुणा ।
गुणवान प्रिय राजांच्या काकुत्स्था वनि धाडले ॥4॥

नूनंतु बलवांल्लोके कृतान्त: सर्वमादिशन ।
लोके रामाभिरामस्त्वं वनं यत्र गमिष्यति ॥5॥

निश्चित बलवान दैव आज्ञा सर्वां करीतसे ।
तुझ्यासम लोकप्रियही वनी जाण्या उद्यत ॥5॥

अयं तु मामात्मभवस्तवादर्शनमारुत:।
विलापदु:खसमिधो रुदिताश्रुहुताहुति:॥6॥

चिन्ताबाष्पमहाधूमस्तवागमनचिन्तज:।
कर्शयित्वाधिकं पुत्र नि:श्वासायाससम्भव: ॥7॥
त्वया विहीनामिहं मां शोकाग्निरतुलो महान्।
प्रधक्ष्यति यथा कक्ष्यं चित्रभानुर्हिमात्वये ॥8॥

तव सोडुनि जाण्याने शोकाची आग जी मज ।
भस्म करुनि टाकेल ग्रीष्मात दावानल जसा ॥6॥
दर्शन तव न झाल्याने भडकून आग ती मनी।
विलापे उद्भवे दु:ख जणु इंधन त्यावरी ॥7॥

अश्रुपात आहुतिसम उष्णोच्छवास जणु धूपचि ।
विझवण्या जल तूचि जाळेल तुजविण आग ही ॥8॥

कथं हि धेनु: स्वं वत्सं गच्छन्तमनुगच्छति।
अहं त्वानुगमिष्यामि यत्र वत्स गमिष्यसि ॥9॥

धेनु जशी वत्सामागे जातसे त्यापरीहि मी ।
जाशील जेथे तेथे तुझ्यामागुन येइन ॥9॥

यथा निगदितं मात्रा तद् वाक्यं पुरुषर्षभ: ।
श्रुत्वा रामोऽब्रवीद् वाक्यं मातरं भृशदु:खिताम् ॥10॥

ऐकुनी बोल मातेचे अतिदु:खे वदे अशी।
ऐकुनी पुन्हा श्रीराम कौसल्या माते वदे ॥10॥

कैकैय्या वञ्चितो राजा मयि चारण्यमाश्रिते ।
भवत्या च परित्यक्तो न वनं वर्तयिष्यति॥11॥

फसवुनि राजास कैकेयी वनी मजसि पाठवी ।
त्यात तू सोडता त्याना नच जीवित राहती ॥11॥

भर्त: किल परित्यागो नृशंस: केवलं स्त्रिया:।
स भवत्या न कर्तव्यो मनसापि विगर्हित:॥12॥

पतिपरित्याग कृत्य असे क्रूर स्त्रियांस्तव ।
निन्दित महाजने तैसे मनि आणि न तूही ॥12॥

यावज्जीवति काकुत्स्थ:पिता मे जगतीपति:।
शुश्रूषा क्रियतां तावत स हि धर्म: सनातन:॥13॥

जोवरी पिता काकुत्स्थ जगती जगतीपती ।
तयांची शुश्रुषा करणे समातन धर्म हा असे ॥13॥

एवमुक्त्वा तु रामेण कौसल्या शुभदर्शना ।
तथेत्युवाच सुप्रीता राममक्लिष्टकारिणम ॥14॥

ऐसे वदता रामाने कौसल्या शुभ दर्शना ।
बरे पुत्रा म्हणे त्याला महान कर्म जो करी ॥14॥

एवमुक्तस्तु वचनं रामो धर्मभृतां वर:।
भूयस्तामब्रवीद् वाक्यं मातरं भृशदु:खितम् ॥15॥

मातेची स्वीकृति ऐकून धर्मात्म्यांमध्ये श्रेष्ठ तो ।
दु:खी असणाऱ्या मातेस राम पुन्हा सांगतो ॥15॥

मया चैव भवत्या च कर्तव्यं वचनं पितु:।
राजा भर्ता गुरु: श्रेष्ठ: सर्वेषामीश्वर: प्रभु:॥16॥

माझे तुझेहि कर्तव्य असे पित्राज्ञा पाळणे ।
कारण राजा सर्वांचा गुरु श्रेष्ठ,ईश्वर असे ॥16॥

इमानि तु महारण्ये विहृत्य नव पंच च ।
वर्षाणि परमप्रीत्या स्थास्याम वचने तव ॥17॥

विशाल वनामध्ये चौदा वर्षे फिरेन मी ।
आज्ञापालन प्रेमाने तव तेथे करेन मी ॥17॥

एवमुक्ता प्रियं पुत्रं बाष्पपूर्णानना तदा ।
उवाच परमार्ता तु कौसल्या सुतवत्सला ॥18॥

ऐकुनी वचना त्याच्या अश्रुपूर्ण नेत्रे पुन्हा ।
पुत्रवत्सला कौसल्या पुत्रा आर्त स्वरे वदे ॥18॥

आसां राम सपत्नीनां वस्तुं मध्ये न मे क्षमम् ।
नय मामपि काकुत्स्थ वनं वन्यां मृगीमिव ॥19॥

यदि ते गमने बुद्धिः कृता पितरपेक्षया ।
रहाणे सवतींमध्ये अशक्य होतसे मज ।
निश्चय वनि जाण्याचा पितराज्ञेने करीसि तू ॥19॥
वनवासिनी हरिणीसम वनी घेउनि मज चल॥

तां तथा रुदतीं रामो रुदन् वचनमब्रवीत् ॥20॥

जीवन्त्या हिं स्त्रिया भर्ता दैवतं प्रभुरेव च ।

भवत्या मम चैवाद्य राजा प्रभवति प्रभु:॥21॥

रडणाऱ्या तिज पाहून रामही रडता वदे ॥20॥

पति हाच ईश्वर देव असता स्त्रीस जीवित ।

तुजला आणि मलाही दोघां महाराज प्रभू ॥21॥

न ह्यनाथा वयं राज्ञा लोकनाथेन धीमता ।

भरतस्यापि धर्मात्मा सर्वभूतप्रियंवद:॥22॥

भवतीमनुवर्तेत स हि धर्मरत: सदा ।

असता महाराज आम्हा अनाथ नच मानणे ।

भरतही असे धर्मात्मा प्रिय बोले सर्वांप्रति ॥22॥

अनुसरील तुज तोही करिल सेवाही तुझी ।

यथा मयि तु निष्क्रान्ते पुत्रशोकेन पार्थिव:॥23॥

श्रमं नावाप्नुयात किंचिदप्रमता तथा कुरु ।

जाता मी पुत्रशोकाने न व्हावे कष्ट महाराजा ॥23॥

ऐसा प्रयत्न हळुवार कराया तूच पाहिजे ।

दारुणश्चाप्ययं शोको यथैनं न विनाशयेत ॥24॥

राज्ञो वृद्धस्य सततं हितं चर समाहिता ।

समाप्त दारुण शोके न त्यांचे आयुष्य हो ॥24॥

तरी सावध राहूनी पाही वृद्ध त्यांचे हित ।

व्रतोपवासनिरता या नारी परमोत्तमा ॥25॥

भर्तारं नानुवर्तेत सा च पापगतिर्भवेत ।

उपवास व्रते नारी भर्त्यास्तव परमोत्तम ॥25॥

न करी सेवा तिजला पाप्याची गति लाभते ।

भर्तु: शुश्रूषया नारी लभते स्वर्गमुत्तमम् ॥26॥

अपि या निर्नमस्कारा निवृत्ता देवपूजनात ।

न पूजता अन्य देवांस पतीची जी सेवा करी ॥26॥

लाभे तया नारीस स्वर्ग उत्तम निश्चित ।

अग्निकार्येषु च सदा सुमनोभिश्च देवत:॥28॥

पूज्यास्ते मत्कृते देवि ब्राह्मणाश्चैव सत्कृता:।

मङ्गल मम इच्छिण्या देवी अग्निहोत्र कारणे ॥28॥

पुष्पांनी पूजिणे देवां ब्राह्मणांसही सत्कृता ।

एवं काल प्रतीक्षस्व ममागमनकांक्षिणी ॥29॥

नियता नियताहारा भर्तुशुश्रूषेण रता:।

करी नियमित आहार पतिची नियम पाळुनी ॥29॥

सेवा करत येण्याची प्रतीक्षा मम तू करी ।

प्राप्स्यसे परमं कामं मयि पर्यागते सति॥30॥

यदि धर्मभृतां श्रेष्ठो धारयिष्यति जीवितम् ।

धर्मात्मा महाराज जीवित तोवरि राहता ॥30॥

परत येता मङ्गल पूर्ण तव हो कामना ।

एवमुक्त्वा तु रामेण बाष्पपर्याकुलेक्षणा ॥31॥
कौसल्या पुत्रशोकार्ता रामंवचनमब्रवीत ।
रामाने असे वदता कौसल्या साश्रु लोचना ॥31॥
पुत्रशोके पीडित ती श्रीरामचंद्रा बोलली ।
गमने सुकृतां बुद्धिं न ते शक्नोमि पुत्रक ॥32॥
विनिवर्तयितुं वीर नूनं कालो दुरत्यय:।
विचार वनि जाण्याचा तव न शकते थांबवू ॥32॥
कठिण काल आज्ञेचे उल्लंघन वीर ते असे ।

गच्छ पुत्र त्वमेकाग्रो भद्रं तेऽस्तु सदा विभो ॥33॥

पुनस्त्वयि निवृत्ते तु भविष्यामि गतक्लमा ।

पुत्रा निश्चिन्त जा वनि इच्छिते कल्याण मी तुझे ॥33॥

येशील तू परत तेव्हां क्लेश मम दूर होइल ।

प्रत्यागते महाभागे कृतार्थे चरितव्रते ।

पितृरानृण्यतां प्राते स्वपिष्ये परमं सुखं ॥34॥

कृतार्थ होउनि येशील महाभाग पूर्णव्रत ।

पितृऋण मुक्त होता होईन निद्रित मी सुखे ॥34॥

कृतान्तस्य गति: पुत्र दुर्विभाव्या सदा भुवि ।
यस्त्वां संचोदयति मे वच आविध्य राघव ॥35॥
जाणणे गति दैवाची पुत्रा कठिण त्यामुळे ।
न ऐकता मम वचना वनी जाया तू प्रेरित ॥35॥
गच्छेदानीं महाबाहो क्षेमेण पुनरागत:।
नन्दयिष्यसि मां पुत्र साम्ना श्लक्ष्णेन चारुणा: ॥36॥
आज जा तू महाबाहो सुखरूप येउनि पुन्हा ।
कर आनन्दित मज बोले मधुर सान्त्वनयुक्त जे ॥36॥

अपीदानीं स काल: स्याद् वनात प्रत्यागतं पुन:।

यत त्वां पुत्रक पश्येयं जटावल्कलधारिणम ॥37॥

वत्सा समय येईल का जटावल्कलधारित ।

वनातुनि परतुनि येता तुज मी परत पाहिन ॥37॥

तथा हि रामं वनवासनिश्चितं ददर्श देवीं परमेण चेतसा ।

उवाच रामं शुभलक्षणं वचो बभूव च स्वस्त्ययनाभिकांक्षिणी ॥38॥

वनात जाण्या निश्चित त्यास पाही कौसल्या आदरयुक्त मने ।

देऊनि आशीर्वाद शुभसूचक करण्या स्वस्तिवाचन इच्छा करी ॥38॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुर्विंश: सर्ग:॥24॥

अयोध्याकाण्ड सर्ग 25

सा विनीय तमायासमुपस्पृश्य जलं शुचि।
चकार माता रामस्य मङ्गलानि मनस्विनी ॥1॥
मनातिल काढूनि शोक माता कौसल्या मनस्विनी।
आचमुनी पवित्र जला मङ्गलानुष्ठान करी ॥1॥
न शक्यसे वारयितुं गच्छेदानीं रघूत्तम।
शीघ्रं च विनिवर्तस्व वर्तस्व च सतां क्रमे ॥2॥

अशक्य तुज थांबवणे तरी जा तू रघूत्तम ।
सन्मार्गि सदा राही शीघ्र ये तू वनातुनी ॥2॥
यंपालयसि धर्मं त्वं प्रीत्याच नियमेन च ।
स वै राघवशार्दूल धर्मस्त्वामभिरक्षितु ॥3॥
नियमे प्रसन्नतेने पाळसी धर्म राघव ।
तोच तुज सर्वत्र करो रक्षण आशीर्वच ॥3॥
येभ्य: प्रणमसे पुत्र देवेष्वायतनेषु च ।
ते च त्वामभिरक्षन्तु वने सह महर्षिभि:॥4॥

मन्दिरे देवस्थाने प्रणाम करसी जया ।
देवता महर्षि ते वनी तव रक्षण करो ॥4॥

यानि दत्तानि तेऽस्त्राणि विश्वामित्रेण धीमता ।
तानि त्वामभिरक्षन्तु गुणै: समुदितं सदा ॥5॥

तुज अस्त्रे विश्वामित्रे बुद्धिमान दिलीत जी ।
करोत सदैव रक्षण तव गुणांनी प्रकाशित ॥5॥

पितृशुश्रूषया पुत्र मातृशुश्रूषया तथा ।
सत्येन च महाबाहो चिरं जीवाभिरक्षित:॥6॥

पित्याची तशि मातेची शुश्रूषा सत्यपालन ।
हे केल्याने चिरंजीव सुरक्षित होशील तू ॥6॥

समित्कुशपवित्राणि वेद्यश्चायतनानि च ।
स्थंडिलानि च विप्राणां शैला वृक्षा: क्षुपा ह्रदा:।
पतङ्गा: पन्नगा: सिंहास्त्वां रक्षन्तु नरोत्तम ॥7॥

पवित्री समिधा वेदी ब्राह्मणे देवपूजन ।
वेदी मन्दिर वृक्ष पर्वतासह जलाशय ।
पक्षी सर्प वनी सिंह रक्षोत तुज नरोत्तम ॥7॥

स्वस्ति साध्याश्च विश्वे च मरुतश्च महर्षिभ:।
स्वस्ति धाता विधाता च स्वस्ति पूषा भगोर्यमा ॥8॥
विश्वदेव महर्षी साध्य मरुद्गण विधाता तसे ।
धाता,पूषा,अर्यमा भग कल्याणप्रद हो तुज ॥8॥
लोकपालाश्च ते सर्वे वासवप्रमुखास्तथा।
ऋतव: षट् च ते सर्वे मासा: संवत्सरा: क्षपा:॥9॥
दिनानि च मुहूर्ताश्च स्वस्ति कुर्वन्तु ते सदा ।
श्रुति: स्मृतिश्च धर्मश्च पातु त्वां पुत्र सर्वथा ॥10॥

इन्द्रादि लोकपाल वसु प्रमुख ते तसे।
ऋतु सहा सर्व मास संवत्सर दिन रात्रही ॥9॥
दिवस मुहूर्त सर्व तुझे करोत मंगल ।
श्रुति स्मृति आणि धर्म रक्षोत तुज सर्वदा ॥10॥
स्कन्दश्च भगवान् देव: सोमश्च सबृहस्पति:।
सप्तर्षयो नारदश्च ते त्वां रक्षन्तु सर्वत:॥11॥
बृहस्पति भगवान स्कंद सोम सप्तर्षिगण ।
नारदांसह सर्व करोत रक्षण युझे ॥11॥

ते चापि सर्वत: सिद्धा दिशश्च सदिगीश्वरा:।

स्तुता मया वने तस्मिन् पान्तु त्वां पुत्र नित्यश: ॥12॥

सर्व प्रसिद्ध सिद्ध,दिक्पाल सर्व दिशा ।

स्तुतीने मम संतुष्ट करोत रक्षण तुझे ॥12॥

शैला: सर्वे समुद्राश्च राजा वरुण एव च ।

द्यौरन्तरिक्षं पृथिवी वायुश्च सचराचर:॥13॥

नक्षत्राणि च सर्वाणि ग्रहाश्च सह दैवतै:।

अहोरात्रे तथा संध्ये पान्तु त्वां वनमाश्रितम् ॥14॥

सर्व पर्वत सागरही राजा वरुण त्यापरी ।
द्युलोक,पृथिवी वायु अन्तरिक्ष चराचर ॥13॥
नक्षत्रे ग्रह ते सर्व रात्रंदिन संध्याद्वय ।
देवतांसह हे सर्व रक्षोत तुज असता वनी ॥14॥
ऋतवश्चापि षट् चान्ये मासा: संवत्सरास्तथा ।
कलाश्च काष्ठाश्च तथा तव शर्म दिशन्तु ते ॥15॥
सहा ऋतु तैसे मास संवत्सर कला काष्ठ तसे ।
सर्व हे प्रदान तुला कल्याण तुझे करतील ॥15॥

महावनेऽपि चरतोमुनिवेषस्य धीमत:।

तथा देवाश्च दैत्याश्च भवन्तु सुखदा: सदा ॥16॥

मुनिवेष धारण करुनी फिरता विशाल वनामध्ये ।

तुज बुद्धिमान पुत्रा देवता दैत्य करो सुखी ॥16॥

राक्षसानां पिशाचानां रौद्राणां क्रूरकर्मणाम् ।

क्रव्यादानां च सर्वेषां मा भूत पुत्रक ते भयम् ॥17॥

राक्षसांचे भयंकर क्रूरकर्मा पिशाच्चांचे ।

तैसे मांसभक्षी प्राण्यांचे पुत्रा तुज भय नसो ॥17॥

प्लवगा वृश्चिका दंशा मशकाश्चैव कानने ।
सरीसृपाश्च कीटाश्च मा भूवन् गहने तव ॥18॥
वनातील वानर विंचू डास मच्छर कीटक ।
सर्पही तुमच्यासाठी हिंसक त्यानी बनू नये ॥18॥
महाद्विपाश्च सिंहाश्च व्याघ्रा ऋक्ष्याश्च दंष्ट्रिण:।
महिषा: श्रृङ्गिणो रौद्रा न ते द्रुह्यन्तु पुत्रक ॥19॥
पुत्रा मोठे गज व्याघ्र,सिंह,अस्वल ज्यां सुळे ।
तसे शिंगधारी भयंकर रेडे न चालुन येवोत ॥19॥

नृमांसभोजना रौद्रा ये चान्ये सर्वजातय:।
मा च त्वां हिंसिषु: पुत्र मया सम्पूजितास्त्विहं ॥20॥
नरमांसभक्षी प्राणी अन्य यांच्याशिवाय जे ।
मी पूजा इथे करिता इजा न तुजला करो ॥20॥
आगमास्ते शिवा: सन्तु सिध्यन्तु च पराक्रमा:।
सर्वसम्पतयो राम स्वस्तिमान् गच्छ पुत्रक ॥21॥
होवोत मार्ग मङ्गल सफल हो पराक्रम ।
प्राप्त हो सम्पदा पुत्र मार्ग निर्विघ्न आक्रम ॥21॥

स्वस्ति तेऽस्त्वान्तरिक्षेभ्य: पार्थिवेभ्य: पुन: पुन: ।
सर्वेभ्यश्चैव देवेभ्यो ये च ते परिपन्थिन:॥22॥

प्राणी आकाशचारी जीव भूतलि राहती ।
देवता,शत्रु पासून तुज कल्याण लाभुदे ॥22॥

शुक्र: सोमश्च सूर्यश्च धनदोऽथ यमस्तथा ।
पान्तु त्वामर्तिता राम दण्डकारण्यवासिनम् ॥23॥

श्रीरामा शुक्र कुबेर सोम सूर्य तथा यम ।
रक्षिती दण्डकारण्ये पूजिता मी इथे तयां ॥23॥

अग्निर्वायुस्तथा धूमो मन्त्राश्चर्षिमुखच्युता:।
उपस्पर्शन्काले तु पान्तु त्वां रघुनन्दन ॥24॥
अग्नि वायु तसा धूम मन्त्र म्हणती जे ऋषि ।
स्नान आचमनासमयी तुझे करोत रक्षण ॥24॥
सर्वलोकप्रभुर्ब्रह्मा भूतकर्तृ तथर्षय:।
ये च शेषा: सुरास्ते तु रक्षन्तु वनवासिनम् ॥25॥
सर्व जनांचे प्रभु ब्रह्मा परब्रह्म ऋषिगण ।
इतरहि तसे देव रक्षोत वनवासी तुला ॥25॥

इति माल्यै: सुरगणान गन्धैश्चापि यशस्विनी।
स्तुतिभिश्चानुरूपाभिरान यतलोचना ॥26॥
असे म्हणुनि कौसल्या देवतांचे पूजन करी ।
पुष्पमाला गन्धोपचारे अनुरूप स्तुति गाउनी ॥26॥
ज्वलनं समुपादाय ब्राह्मणेन महात्मना ।
हावयामास विधिना राममङ्गलकारणात ॥27॥
महात्मा ब्राहमणाद्वारे अग्नि निर्मुनिया तिने।
विधिपूर्वक केला होम श्रीरामा मङ्गल इच्छित ॥27॥

घृतं श्वेतानि माल्यानि समिधश्चैव सर्षपान् ।
उपसम्पादयामास कौसल्या परमाङ्गना ॥28॥

शूभ्र पुष्पे घृत माला समिधा सर्षप वसु या ।
कौसल्या महाराणीने ब्राह्मणासमीप ठेविले ॥28॥

उपाध्यायः स विधिना हुत्वा शान्तिमनामयम् ।
हतहव्यावशेषेण बाह्यं बलिमकल्पयत् ॥29॥

विधिपूर्वक अग्नीत होम करुनी पुरोहित ।
अर्पिती हवनानन्तर हविष्यद्वारा बलि ॥29॥

मधुदध्यक्षतघृतैः स्वस्तिवाच्यं द्विजांस्ततः।
वाचयामास रामस्य वने स्वस्त्ययनक्रियाम् ॥30॥

मध दधि घृत अक्षता ब्राह्मणा स्वस्तिवाचने ।
अर्पुनी स्वस्तिवाचन केले रामा मङ्गल इच्छुनी ॥30॥

तत्स्तस्मै द्विजेन्द्राय राममाता यशस्विनी ।
दक्षिणां प्रददौ काम्यां राघवं चेदमब्रवीत् ॥31॥

दक्षिणा विप्रवराला देउनी त्या इच्छित ।
यशस्विनि ति माता श्रीरामास वदे असे ॥31॥

यन्मङ्गलं सहस्राक्षे सर्वदेवनमस्कृते ।
वृत्रनाशे समभवत तत ते भवतु मङ्गलम ॥32॥
वृत्रनाश निमित्ताने सहस्राक्षा आशीर्वच ।
मङ्गल प्राप्त होती होवो मङ्गल तसे तुझे ॥32॥
यन्मङ्गलं सुपर्णस्य विनता कल्पयत पुरा ।
अमृतं प्रार्थयानस्य तत ते भवतु मङ्गलम ॥33॥
पूर्वकाली गरूडास जाता तो अमृत आणण्या ।
विनता मङ्गलकृत्य करी ते तुजहि प्राप्त हो ॥33॥

अमृतोत्पादने दैत्यान् हतो वज्रधरस्य यत् ।
अदितिर्मङ्गलं प्रादात् तत् ते भवतु मङ्गलम् ॥34॥

अमृतोत्पत्ती समयी इंद्रा दैत्यवधास्तव ।
आशीर्वाद मङ्गल दे अदिति तो तुज प्राप्त हो ॥34॥

त्रिविक्रमान् प्रक्रमतो विष्णोरतलतेजसः।
यदासीन्मङ्गलं राम तत् ते भवतु मङ्गलम् ॥35॥

टाकण्या पाउले तीन भगवान विष्णुसाठी जे।
मङ्गल इच्छिले गेले श्रीरामा तुज प्राप्त हो ॥35॥

ऋषय: सागरा दीपा वेदा लोका दिशश्च ते ।
मङ्गलानि महाबाहो दिशन्तु शुभम्ङ्गलम् ॥36॥
द्वीप,समुद्र समस्त लोक दिशा सर्व मङ्गल ।
करो प्रदान महाबाहो सदैव तव हो मङ्गल ॥36॥
इति पुत्राश्च शेषाश्च कृत्वा शिरसि भामिनी ।
गन्धैश्चापि समालभ्य राममायतलोचना ॥37॥
औषधी च सुसिद्धार्थां विशल्यकरणीं शुभाम् ।
चकार रक्षां कौसल्या मन्त्रैरभिजजाप च ॥38॥

आशीर्वाद असा पुत्रा देउनी कौसल्या भामिनी ।
मस्तकी अक्षता गन्ध विशालनयना लावुनी ॥37॥
औषधी विशल्यकरणी शुभ घेउनि रक्षण्या ।
जप करुनी मन्त्राचा उत्कर्ष मङ्गलास्तव ॥38॥
उवाचापि प्रहृष्टेव सा दु;खवशवर्तिनी ।
वामात्रेण न भावेन वाचा संसज्जमानया ॥39॥
वरकरणी मुखातूनि स्पष्ट जे मत्रोच्चारण ।
परि हृदयापासून नसे ते वाणि सद्गद कंपित ॥39॥

आनम्य मूर्ध्निचाघ्नाय परिष्वज्य यशस्विनी।
अवदत पुत्रमिष्टार्थो गच्छ राम यथासुखम् ॥40॥
अरोगं सर्वसिद्धार्थमयोध्यां पुनरागतम् ।
पश्यामि त्वां सुखं वत्स संधितं राजवर्त्मसु ॥41॥

मस्तका झुकवुन माता अवघ्राण यशस्विनी ।
करुनि हृदया लावून बोले जा रामा सुखे ॥40॥
कार्य करुनि निरोगी अयोध्येत येशिल पुन्हा ।
राजमार्गि स्थित तुला पाहून मी होइन सुखी ॥41॥

प्रणष्टदु:खसंकल्पा हर्षविद्योतिताननाः ।
द्रक्ष्यामि त्वां वनात् प्राप्तं पूर्णचंद्रमिवोदितम् ॥42॥

दु:खपूर्ण दिन जातील आनंद मुखावरी ।
पूर्णचंद्र उगवता पौर्णिमेस दिसे जसा ॥42॥

भद्रासनगतं राम वनवासादिहागतम् ।
द्रक्ष्यामि च पुनस्त्वां तु तीर्णवन्तं पितुर्वचः॥43॥

पितुर्वचन पाळूनी संपवूनि वनवास ।
सिंहासनाधिष्ठित तुला प्रसन्न चित्ते पाहिन ॥43॥

मङ्गलैरुपसम्पन्नो वनवासादिहागत:।

वध्वाश्च मम नित्यं त्वं कामान् संवर्ध याहि भो: ॥44॥

जा आता परत येऊन मङ्गलवस्त्राभूषणे ।

विभूषित मम स्नुषा सीता तिच्या इच्छा पुऱ्या करी॥44॥

मयार्चिता देवगणा: शिवोदयो महर्षयो भूतगणा: सुरोरगा:।

अभिप्रयातस्य वनं चिराय ते हितानि कांक्षन्तु दिशश्च राघव ॥45॥॥

सम्मान पूजन कृत मी जयांचे शिवादि देव महर्षि भूतगण नागदेव ।

जाता वनात तू सर्व कामना हिताची चिरकाल करतील दिशाहि सर्व ॥45॥

अतीव चाश्रुप्रतिपूर्णलोचना समाप्य च स्वस्त्ययनं यथाविधि ।
प्रदक्षिणं चापि चकार राघवं पुन:पुनश्चापि निरीक्ष्य सस्वजे ॥46

अतिव अश्रुपूर्ण नेत्रानी विधिपूर्वक करुनिया स्वस्तिवाचन पूर्ण ।
प्रदक्षिणा घालुनि त्याजला छातीस वारंवार त्यास लाविले तिने ॥46॥

तया हि देव्या च कृतप्रदक्षिणो निपीड्य मातुश्चरणौ पुन:पुन:।
जगाम सीतानिलयं महायशा: स राघव: प्रज्वलितस्तया श्रिया ॥47॥

प्रदक्षिणा देवी कौसल्या घालता तया पुन्हापुन्हा मातृचरणा स्पर्शित ।

मांगल्यपूर्ण होऊन राघव महायशस्वी सीताभवनाकडे जात निघोनिया ॥47॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोद्ध्याकाण्डे पंचविंश: सर्ग: ॥25॥

अयोध्याकाण्ड सर्ग 26

अभिवाद्य तु कौसल्यां राम: सम्प्रस्थितो वनम् ।
कृतस्वस्त्ययनो मात्रा धर्मिष्ठे वर्त्मनि स्थित:॥1॥

मातेस वन्दुनि होता सम्पन्न स्वस्तिवाचन ।
धर्मे इष्ट मार्ग धरुनी वनात जाण्या प्रस्थित॥1॥

विराजयन् राजसुतो राजमार्ग नरैवृतम् ।
हृदयान्यानमन्थेव जनस्य गुअनवत्तया ॥2॥

राजमार्ग जनेपूर्ण प्रकाशित करीत राम।
सद्गुणे जनमनाचे जणु मन्थन करी ॥2॥

वैदेही वापि तत् सर्वं न शुश्राव तपस्विनी ।
तदेव हृदि तस्यास्य यौवराज्याभिषेवनम् ॥3॥

वैदेहीला समाचार हा ज्ञात नसल्यामुळे ।
मनि तिच्या असे रामास यौवराज्याभिषेक हे ॥3॥

देवकार्य स्म सा कृत्वा कृतज्ञा हृष्टचेतना ।
अभिज्ञा राजधर्माणां राजपुत्रो प्रतीक्षति ॥4॥

देवकार्य करूनिय़ा राजधर्मानुसारेण ती।
प्रसन्नचिते कृतज्ञा रामाची वाटा पाहि ती ॥4॥

प्रविवेशाय रामस्तु स्ववेश्म सुविभूषितम् ।
प्रहृषतजनसंपूर्ण हइया किंचिदवाङ्ग्मख:॥5॥

श्रृंगारित स्वमहाली श्रीराम प्रवेश करी ।
प्रसन्न जन जमलेले रामाचे मुख लज्जित ॥5॥

अथ सीता समुत्पत्य वैपमाना च तं पतिम् ।
अपश्यच्छोकसंतप्तं चिन्ताव्याकुलितेन्द्रियम् ॥6॥

पाहुनी शोकसंतप्त व्याकुळ इंद्रियांसह
सीता न्यहाळी पतीस कंपित होउनी चिंतित॥6॥

तां दृष्ट्वा स हि धर्मात्मा न शशाक मनोगतम् ।
तं शोकं राघव: सोढुं ततो विवृततां गत: ॥7॥

तिज पाहुनि धर्मात्मा मना न आवरू शके ।
प्रकट होई शोक त्याचा आवरू न शके तया ॥7॥

विवर्णवदनं दृष्ट्वा तं प्रस्विन्नममर्षणम् ।
आह दु:खाभिसंतप्ता किमिदानीमिदं प्रभो ॥8॥

विवर्ण मुख घामाने भिजलेले अंग पाहून ।
संतप्त होउनि सीता विचारी काय हे प्रभू ॥8॥

अद्य बार्हस्पत: श्रीमान् युक्त: पुष्येण राघव ।
प्रोच्यते ब्राह्मणै: प्राज्ञै: केन त्वमसि दुर्मन:॥9॥

आज मङ्गलमय पुष्य नक्षत्र बृहस्पति देवता ।
वदति ब्राह्मण ऐसे असता आपण खिन्न का ॥9॥

न ते शतशलाकेन जलफेननिमेन च ।
आवृत्तं वदनं वल्गु च्छत्रेणाभिविराजते ॥10॥

जलफेनापरि श्वेत छत्रे शतशलाकायुत ।
आच्छादित नसे मुख दिसे न प्रमुदित त्यामुळे॥10॥

व्यजनाभ्यां च मुख्याभ्यां शतपत्रनिभेक्षणम् ।
चंद्रहंसप्रकाशाभ्यां वीज्यते न तवाननम् ॥11॥

मुखावरी कमलनेत्र शूभ्र चंद्रहंसापरि ।
चवऱ्या हलवित वात नसती जात ढाळल्या ॥11॥

वाग्मिनो वन्दिनश्चापि प्रहृष्टास्त्वां नरर्षभ ।
स्तुवन्तो नाद्य दृश्यन्ते मङ्गलै: सूतमागधा:॥12॥

सूत मागधजन जे मंगल वचने स्तुति ।
करती तेही न दिसती आज आपुल्यासवे ॥12॥

न ते क्षौद्रं च दधि च ब्राह्मणा वेदपारगा:।
मूर्ध्नि मूर्धाभिषिक्तस्य ददति स्म विधानत:॥13॥

तीर्थोदकयुक्त मध दही यांचा विधियुक्त अभिषेक आपल्या ।
मस्तकी नसे केला मूर्धाभिषिक्त वेदपारङ्गत ब्राह्मणांनी ॥13॥

न त्वां प्रकृतय: सर्वा: श्रेणीमुख्याश्च भूषिता:।
अनुव्रजितुमिच्छन्ति पौरजानपदास्तथा ॥14॥

मन्त्री सेनापति असे दरबारी नगरातील मुख्य जन ।
आपुल्या मागुनी जनपद नगरातील लोक नसति का ॥14॥

चतुर्भिर्वेगसम्पन्नैर्हयै: काञ्चनभूषणै:।
मुख्य: पुष्परथो युक्त: किं न गच्छति तेऽग्रत:॥15॥

पुष्परथ अश्वांसह काञ्चनभूषित चार ।
श्रेष्ठ आपल्यापुढे जो का नसे आज तो दिसे ॥15॥

न हस्ती चाग्रत: श्रीमान् सर्वलक्षणपूजित:।
प्रयाणे लक्ष्यते वीर कृष्णमेघगिरिप्रभ: ॥16॥

कृष्णवर्ण मेघे आच्छादित विशाल गज पर्वतासम।
शुभलक्षणि यात्रेत आपुल्या नित्य असे तो का न दिसे ॥16॥

नच काञ्चनचित्रं ते पश्यामि प्रियदर्शन ।
भद्रासनं पुरस्कृत्य यान्तं वीर पुर:सरम् ॥17॥

सुवर्णमंडित घेउनि हाती भद्रासन सादर ।
अग्रगामी का सेवक आज दिसत नसे मज ॥17॥

अभिषेको यदा सज्ज किमिदानीमिदं तव ।
अपूर्वो मुखवर्णश्च न प्रहर्षश्च लक्ष्यते ॥18॥

अभिषेक असता आज दशा ही काय आपली ।
अप्रसन्न वदने कान्ती मुखावरि का नसे ॥18॥

इतीव विलपन्ती तां प्रोवाच रघुनन्दन:।
सीते तत्रभवांस्तात: प्रव्राजयति मां वनम् ॥19॥

बोले रुदन करणाऱ्या सीतेस रघुनन्दन ।
सीते आज मला पूज्य तात वनात धाडती ॥19॥

कुले महति सम्भूते धर्मज्ञे धर्मचारिणि ।
श्रुणु जानकि येनेदं क्रमेणाद्यागतं मम ॥20॥

महत्कुले उत्पन्न धर्मज्ञ धर्मपरायण ।
ऐक मज क्रमे कैसा प्राप्त वनवास जानकी ॥20॥

राज्ञा सत्यप्रतिज्ञेन पित्रा दशरथेन वै ।
कैकेय्यै मम मात्रे तु पुरा दत्तौ महावरौ ॥21॥

पित्याने सत्यवचनी दिधले असती पूर्वी।
कैकेयिमातेस दोन दशरथांनी महावर ॥21॥

तयाद्य मम सज्जेऽस्मिन्नभिषेके नृपोद्यते ।
प्रचोदित:स समयो धर्मेण प्रतिनिर्जित:॥22॥

तयारी करिती पिता अभिषेक करण्या मज ।
तेव्हा आठवण देत पित्या धर्मे करे वश ॥22॥

चतुर्दश हि वर्षाणि वस्तव्यं दण्डके मया ।
पित्रा मे भरतश्चापि यौवराज्ये नियोजित: ॥23॥

त्यामुळे दण्डकारण्ये चतुर्दश वर्षे मला ।
पाठवुनी भरतास युवराज पदी नियोजित ॥23॥

सोऽहं त्वामागतो द्रष्टुं प्रस्थितो विजनं वनम् ।
भरतस्य समीपे ते नाहं कथ्य: कदाचन ॥24॥

ऋद्धियुक्ता हि पुरुषा न सहन्ते परस्तवम् ।

तस्मान्न ते गुणाः कथ्या भरतस्याग्रतो मम॥25॥

निघता वनि जाण्यास आलो तुजला भेटण्या ।

सांगतो तुजला शक्य भरतासमोर जे नसे ॥24॥

प्रशंसा मम गुणांची त्याच्यासमोर न करी ।

पुरुष समृद्धिशाली परस्तुति न साहती ॥25॥

अहं ते नानुवक्तव्यो विशेषेण कदाचन ।

अनुकूल तया शक्यं समीपे तस्य वर्तितुम् ॥26॥

मजविषयी करि ना चर्चा सख्यांशी त्याच्यापुढे ।
अबुकूल वर्तन त्यास त्याच्या समिप राहता ॥26॥

तस्मै दत्तं नृपतिना यौवराज्यं सनातनम् ।
न प्रसाद्यस्त्वया सीते नृपतिश्च विशेषत:॥27॥

नेहमीकरता दिधले नृपे यौवराज्यपद ।
ठेवी प्रसन्न त्याला राजा तो असल्यामुळे ॥27॥

अहं चापि प्रतिज्ञां तां गुरो: समनुपालयन् ।
वनमद्यैव यास्यामि स्थिरीभव मनस्विनि ॥28॥

पाळण्या पितृप्रतिज्ञा मीहि आजच वनी ।
जाण्यास निघतो धैर्ये राहसी तू मनस्विनी ॥28॥
याते च मयि कल्याणि वनं मुनिनिवेषितम् ।
वब्दितव्यो दशरथ: पिता मम जनेश्वर: ॥29॥
मुनिजनां सेवित जाता कल्याणि वनात मी ।
नित्य व्रत उपवासा पाळुनी राहशील तू ॥29॥
कल्यमुत्थाय देवानां कृत्वा पूजां यथाविधि ।
वन्दितव्यो दशरथ: पिता मम जनेश्वर: ॥30॥

प्रतिदिनी प्रात:काली करोनी देवपूजन ।
वन्दन करी मम पित्या महाराज दशरथा ॥30॥
माता च मम कौसल्या वृद्धा संतापकर्षिता ।
धर्ममेवाग्रत: कृत्वा त्वत्त: सम्मानमर्हति ॥31॥
माता कौसल्या वृद्धा दु:खे दुर्बल होतसे ।
राखी योग्य सन्मान धर्मानुसारेण तिचा ॥31॥
वन्दितव्याश्च ते नित्यं या: शेषा: मम मातर:।
स्नेहप्रनयसम्भोगै: समा हि मम मातर: ॥32॥

प्रणाम प्रतिदिनी करणे मातांस इतरां मम ।
स्नेह प्रेम पालन या दृष्टीने सर्व सारख्या ॥32॥

भ्रातृपुत्रसमौ चापि द्रष्टव्यौ च विशेषत:।
त्वया भरतशत्रुघ्नौ प्राणै: प्रियतरो मम ॥33॥

भरत शत्रुघ्न प्रिय प्राणाहुनि मज तयां।
बन्धु पुत्रासम त्याना मानुनी वागवी तसे ॥33॥

विप्रियं च न कर्तव्यं भरतस्य कदाचन ।
स हि राजा च वैदेहि देशस्य च कुलस्य च ॥34॥

भरताविरुद्ध काही कृत्य करणे न तू ।
वैदेही तो असे राजा देशाचाहि कुळासही ॥34॥

आराधिता हि शीलेन प्रयत्नैश्चोपसेविता:।
राजान: सम्प्रसीदन्ति प्रकुप्यन्ति विपर्यये ॥35॥

योग्य आचरणे तैसे प्रयत्ने प्रसन्न नृप ।
विपरीत आचरणे तैसे ते होति क्रोधित ॥35॥

औरस्यानपि पुत्रान् हि त्यजन्त्यहितकारिण:।
समर्थान् सम्प्रगृह्णन्ति जनानपि नराधिप: ॥36॥

औरस पुत्रहि करिता अहित त्यागिती तया ।
सामर्थ्यवान् जरी न आत्मीय नृप मानी आपुले ॥36॥

सा त्वं वसेह कल्याणि राज्ञ: समनुवर्तिनी ।
भरतस्य रता धर्मे सत्यव्रतपरायणा॥37॥

कल्याणि म्हणुनी राजा भरतास अनुकूल।
वागुनी धर्मे तत्पर सत्यव्रत परायण ॥37॥

अहं गमिष्यामि महावनं प्रिये त्वया हि वस्तव्यमिहैव भामिनि।
यथा व्यलीकं कुरुषे न कस्यचित तथा त्वया कार्यमिदं वचो मम ॥38॥

प्रिये महावनात जाईन मी तुला इथेच निवास करणे सखी ।
कुणा न कष्टप्रद करि वर्तन आज्ञेस माझ्या राखून मनि असे ॥38॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षड्विंश: सर्ग:॥26॥

अयोध्याकाण्ड सर्ग 27

एवमुक्ता तु वैदेही प्रियाय प्रियवादिनी ।
प्रणायादेव संक्रुद्धा भर्तारं इदमब्रवीत ॥1॥

प्रियवादिनि वैदेही ऐसे वचन ऐकुनी ।
प्रेमाचे जरि असती ते क्रुद्ध होउनि बोलली ॥1॥

किमिदं भाषसे राम वाक्यं लघुतया ध्रुवम् ।
त्वया यदपहास्यं मे श्रुत्वा नरवरोत्तम ॥2॥

श्रीराम हे नरश्रेष्ठ बालिका समजुनि मज ।
बोलता वच ऐकूनी हास्यदायक भासते ॥2॥
वीराणां राजपुत्राणां शस्त्रास्त्रविदुषां नृप ।
अनर्हमयशस्यंच न श्रोतव्यं त्वयेरितम् ॥3॥
शस्त्रविशारद वीर राजपुत्रा न शोभते ।
अपयशचिन्हे युक्त ऐकण्यालायक नसे ॥3॥
आर्यपुत्र पितामाता भ्राता पुत्रस्तथा स्नुषा ।
स्वानि पुण्यानि भुञ्जाना: स्वं स्वं भाग्यमुपासते ॥4॥

आर्यपुत्र पिता माता बन्धु पुत्र तशी स्नुषा।
स्वकर्मपुण्यानुसार भाग्य घेउनि चालती ॥4॥

भर्तुभाग्यं तु नार्येका प्राप्नोति पुरुषर्षभ ।
अत्श्चैवावाहमादिष्टा वने वस्तव्यमित्यपि ॥5॥

पत्नी भाग्यास पतीच्या अनुसरे पुरुषर्षभ ।
त्यामुळे आपणासंगे वनी राह्ले मज असे ॥5॥

न पिता नात्मजो वात्मा न माता न सखीजन:।
इह प्रेत्य च नारीणां पतिरेको गति: सदा ॥6॥

पति एकच नारीस आश्रय इह परलोकि वा ।
पिता.पुत्र,सखी माता शरीरहि न सहाय्यक ॥6॥

यदि त्वं प्रस्थितं दुर्गं वनमद्यैव राघव ।
अग्रतस्ते गमिष्यामि मृदुनन्ती कुशकण्टकान ॥7॥

दुर्गम वनी जाता आपण जाउन मी पुढे ।
कुश कांटे पथी येता काढून टाकिन तया ॥7॥

ईर्ष्या रोषं बहुष्कृत्य भुक्तशेषमिवोदकम ।
नय मां वीर विस्रब्ध: पापं मयि न विद्यते ॥8॥

ठेवता न ईर्षा रोष उर्वरित जलापरि ।

माझ्यात नसे पाप नि:शंक होउनि न्या मज ॥8॥

स्त्री होऊन येण्याचे धाडस करते म्हणून ईर्षा ,पत्नी असून अवज्ञा करते म्हणून रोष हे दोन्ही ठेवावयास नको.उजाड रानात मिळालेले पाणी जपून वापरतो,पिऊन उरलेले फेकून न देता बरोबर घेतो तसे मला न्या हा अर्थ

प्रासादाग्रे विमानैर्वा वैहायसगतेन वा ।

सर्वावस्थागता भर्तुं पादच्छाया विशिष्यते ॥9॥

प्रासादी वा विमानात आकाशी सिद्धिच्या बले ।

राहण्यापेक्षा पतिच्या चरणी उचित राहणे ॥9॥

अनुशिष्टास्मि मात्रा च पित्रा च विविधाश्रयम् ।

नास्मि सम्प्रति वक्तव्या वर्तितव्यं यथा मया ॥10॥

कुणाशी वागावे कैसे मातापितरे दीक्षित ।

म्हणुनी यासमयी ना सांगावे वागणे कसे ॥10॥

अहं दुर्गं गमिष्यामि वनं पुरुषवर्जितम् ।

नानामृगगनाकीर्णं शार्दूलगणसेवितम् ॥11॥

वन्य पशु व्याघ्रसिंह व्याप्त निर्जन दुर्गम ।

अरण्यात निश्चित मी ऐश्या अवश्य येइन ॥11॥

सुखं वने निवत्स्यामि यथैव भवने पितुः।

अचिन्तयन्ती त्रील्लोकांश्चिन्तयन्ती पतिव्रतम् ॥12॥

वनी सुखे राहीन पित्याघरि जणु राहते।

विनात्रैलोक्य ऐश्वर्या सेवेत पतिच्या सदा ॥12॥

शुश्रूषमाणा ते नित्यं नियता ब्रह्मचारिणी।

सह रंस्ये त्वया वीर वनेषु मधुगन्धिषु ॥13॥

आपुल्या रत सेवेत राहुनी ब्रह्मचारिणि ।

आपणासह हिंडेन सुगंधित वनामध्ये ॥13॥

त्वं हि कर्तुं वने शक्तो राम सम्परिपालनम् ।

अन्यस्यापि जनस्येह किं पुनर्मम मानद ॥14॥

वनी इतरांचेही करता रक्षण आपण ।

मम रक्षण करण्यास आपणा काय दुष्कर ॥14॥

साहं त्वया गमिष्यामि वनमद्य न संशय:।

नाहं शक्या महाभाग निवर्तयितुमुद्यता ॥15॥

येणार आपणासंगे वनी यात न संशय ।

निश्चयी निवृत्त करणे मज शक्य न आपणा ॥15॥

फलमूलाशना नित्यं भविष्यामि न संशय:।

न ते दु:खं करिष्यामि निवसन्ती त्वया सदा ॥16॥

दु:ख पोचवि न तुम्हा सदा साथीस आपुल्या ।

कंदमुळे खाउनि राहीन मुळी यात न संशय ॥16॥

अग्रतस्ते गमिष्यामि भोक्ष्ये मुक्तवति त्वयि।

इच्छामि परत: शैलान् पल्वलानि सरांसि च ॥17॥

द्रष्टुं सर्वत्र नित्मीता त्वया नाथेन धीमता ।

आपले भोजन होता खाईन अन्न उरेल जे ।
चालेन आपुल्यापुढती मम इच्छा असे अशी ॥17॥
आपल्यासह पाहीन फिरूनि सर्व वनामध्ये ।
हे बुद्धिमान् प्राणनाथ सरोवर तलाव गिरि॥17॥
हंसकारण्डवाकीर्णा पद्मिनी: साधुपुष्पिता ॥18॥
इच्छेयं सुखिनी द्रष्टुं त्वया वीरेण संगता
सरोवर ज्यात हंस कारण्ड कमलपुष्पित ॥18॥
वीरा आपणासंगे सुन्दर ते पाहु इच्छिते ।

अभिषेकं करिष्यामि तासु नित्यमनुव्रता ॥19॥

सह त्वया विशालाक्ष रंस्ये परमनन्दिनी ।

स्नान सरोवरी रोज करीन मी विशालाक्षा॥19॥

परमानन्द प्राप्त विहरून तुम्हासवे ।

एवं वर्षसहस्राणि शतं वापि त्वयासह ॥20॥

व्यतिक्रमं न वेत्स्यामि स्वर्गोऽपि हि न मे मत:।

शत वा सहस्र वर्षे यापरी आपणासवे॥20॥

घालवीन आनंदे मी स्वर्गही तुच्छ त्यापुढे ।

स्वर्गेऽपि च विना वासो भविता यदि राघव ॥21॥

त्वया विना नरव्याघ्र नाहं तदपि रोचये ॥

आपल्याविना मिळता जरि वास स्वर्गामध्ये ।

न आवडे मज तोही हे नरव्याघ्र राघवा ॥21॥

अहंगमिष्यामि वनं सदर्गमं मृगायुतं वानरवारणैश्च ।

वने निवत्स्यामि यथा पितुर्गृहे तवैव पादावुपगृह्य सम्मता ॥22॥

वनी जिथे मृग वानर सहस्रश: राहती दुर्गम मी जाईन तिथे ।

करीत सेवा आपली राहीन मी जशी पित्याच्या घरी रहात असे ॥22॥

अनन्यभावामनुरक्तचेतसं त्वया वियुक्तां मरणाय निश्चिताम् ।
नयस्व मां साधु कुरुष्व याचना नातो मया ते गुरुता भविष्यति ॥23॥

अनन्य भावे अनुरक्त आपणावरी तुम्ही त्यागता मरण निश्चित।
मला बरोबर न्या याचना अशी न भार होईन मी आपणावरी ॥23॥

तथा ब्रुवाणामपि धर्मवत्सलां न च स्म सीता नृवरो निनीषति ।
उचाच चैनां बहु संनिवर्तने वने निवासस्य च दु:खितां प्रति ॥24॥

ऐके प्रार्थना श्रीराम धर्मवत्सल परी नेण्या तिला न इच्छित असे तो ।
निवृत्त करण्या तिला सांगती किती कष्ट असती राहण्या वनात ॥24॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तविंश: सर्ग:॥27॥

अयोध्याकाण्ड सर्ग 28

स एवं ब्रूवतीं सीतां धर्मज्ञां धर्मवत्सल:।
न नेतुं कुरुते बुद्धिं वने दु:खानि चिन्तयन ॥1॥

ऐकुनी वचन सीतेचे धर्मज्ञा धर्मवत्सल ।
वनी दु:खे जाणून तिज नेण्या अनुत्सुक ॥1॥

सान्त्वयित्वा ततस्तां तु बाष्पदूषितलोचनाम् ।
निवर्तनार्थे धर्मात्मा वाक्यमेतदुवाच ह ॥2॥

सान्त्वन तिचे करण्या आसवे नयनी जिच्या ।
निवृत्त करण्या जाण्या पासून वनवासी तिला ॥2॥
सीते महाकुलीनासि धर्मे च निरता सदा ।
इहाचरस्व धर्मं त्वं यथा मे मनसः सुखम् ॥3॥
उत्तम कुळातिल सीते धर्मे आचरसी सदा ।
ज्यामुळे मज संतोष तोच धर्म असे तुझा ॥3॥
सीते यथा त्वां वक्ष्यामि तथा कार्यं त्वयाबले।
वने दोषा हि बहवो वसतस्तान् निबोध मे ॥4॥

सांगतो मी जसे सीते करावे अबले तुवा ।
बाधती अनेक दु:खे वनी राहतसे तया ॥4॥

सीते विमुच्यतामेषा वनवासकृता मति:।
बहुदोषं हि कान्तारं वनमित्यभिधीयते ॥5॥

सीते वनात जाण्याचा सोड आग्रह कारण ।
अनेक दोष कान्तारी तसे दुर्गम ते असे ॥5॥

हितबुद्ध्या खलु वचो मयैतदभिधीयते ।
सदा सुखं न जानामि दु:खमेव सदा वनम् ॥6॥

हितार्थ तुझिया ऐसे आहे सांगत मी तुला ।
जाणतो वनी सुख ना दु:ख मात्र सदैवच ॥6॥

गिरिनिर्झरसम्भूता गिरिनिर्दरिवासिनाम् ।
सिंहानां निनदा दु:खा: श्रोतुं दु:खमतो वनम् ॥7॥

गिरिनिर्झर आवाज ऐकुनी सिंह तेथिल ।
गर्जती ऐकुनी भीती वाटे दु:खमयी वनी ॥7॥

क्रीडमानाश्च विस्रब्धा मत्ता: शून्ये तथा मृगा:।
दृष्ट्वा समभिवर्तन्ते सीते दु:खमतो वनम् ॥8॥

वनी शून्य पशू क्रीडा करती पाहुनि मानवा ।
करती चाल तयांवरती असे दु:खमयी वन ॥8॥

सग्राहा: सरितश्चैव पङ्कवत्यस्तु दुस्तरा:।
मत्तैरपि गजैर्नित्यमतो दु:खतरं वनम् ॥9॥

मगरी नद्यात असती पङ्के दुस्तर लंघणे ।
मत्त हत्ति सदा फिरती दु:खतर असे वन ॥9॥

लताकण्टकसंकीर्णा: कृकवाकूपनादिता:।
निरपाश्च सुदु:खाश्च मार्गा दु:खमतो वनम् ॥10॥

मार्ग कण्टक वेलींनी फिरती प्राणि जंगली ।
चालणे कष्ट्कारक म्हणुनी दु:खमय वन ॥10॥

सुप्यते पर्णशय्यासु स्वयंभग्नासु भूतले ।
रात्रिषु श्रमखिन्नेन तस्माद् दु:खमतो वनम् ॥11॥

दिने थकुनी रात्री भेगाळलेल्या भूवरी ।
पर्णशय्येवरी निद्रा म्हणुनी दु:खमयी वन ॥11॥

अहोरात्र च संतोष: कर्तव्यो नियतात्मना ।
फलैर्वृक्षावपतितै: सीते दु:खमतो वनम् ॥12॥

वृक्षावरुनी फळे जी पडती खाउनी कंठणे ।
संतुष्ट निग्रहे चित्त राखणे वन दु:खद ॥12॥

उपवासश्च कर्तव्यो यथा प्राणेन मैथिलि ।
जटाभारश्च कर्तव्यो वल्कलाम्बरधारणम् ॥13॥

उपवास शक्य होई तेवढा करणे मैथिली ।
जटाभार शिरी वस्त्रे म्हणुनी वल्कलधारण ॥13॥

देवतानां च पितॄणां च कर्तव्यं विधिपूर्वकम् ।
प्राप्तानामतिथीनां च नित्यश: प्रतिपूजनम् ॥14॥

विधिपूर्वक कर्तव्य देवता पितरा प्रति ।
येता अतिथी सर्वांचे करणे नित्यपूजन ॥14॥

कार्यस्त्रिरभिषेकश्च काले च नित्यश:
चरतां नियमेनैव तस्माद् दु:खतरं वनम् ॥15॥

नियमपूर्वक स्नान तिन्ही वेळा आवश्यक।
प्रत्येक दिवशी ऐसे दु:खदायक वन ॥15॥

उपहारश्च कर्तव्य: कुसुमै: स्वमाहते ।
आर्षेण विधिना वेद्यां सीते दु:खमतो वनम् ॥16॥

स्वहस्ते आणुनि पुष्पे करणे देवता पूजा ।
वेदोक्त विधिने तेव्हां सीते दु:खमय वन ॥16॥

यथालब्धेन कर्तव्य: संतोषस्तेन मैथिलि ।
यताहारैर्वनचरै: सीते दु:खमतो वनम् ॥17॥

मिळेल जैसे अन्न संतोष त्यात मानणे ।
वनी जैसे उपलब्ध सीते दु:खरूप वन ॥17॥

अतीव वातस्तिमिरं बुभुक्षा चाति नित्यश:।
भयानि च महान्त्यत्र ततो दु:खतरं वनम् ॥18॥

प्रचंड वादळ घोर अंधार भूक अति नित्य।
भयाचा अतिरेक त्यामुळे वन दु:खकारक ॥18॥

सरीसृपाश्च बहवो बहुरूपाश्च भामिनि।
चरन्ति पथि ते दर्पात ततो दु:खतरं वनम् ॥19॥

पहाडी पुष्कळ सर्प अनेक रूप धारिणी ।
पथी चालति गर्वाने त्यामुळे दु:खतर वन ॥19॥

नदी निलयना: सर्पा नदीकुटिलगामिन:।
तिष्ठन्त्यावृत्य पन्थानमतो दु:खतरं वनम् ॥20॥

नदीत राहती तैसे कुटिल नदीसमान ।
वेटोळे पथि करिती त्यामुळे दु:खद वन ॥20॥

पतङ्गा: वृश्चिका: कीटा दंशाश्च मशकै: सह ।
बाधान्ते नित्यमबले सर्वं दु:खमतो वनम् ॥21॥

पतंग किडे विंचू डांस मच्छर सर्व हे ।
दंश करण्या पहाती तदा दु:खतर वन ॥21॥

द्रुमा: कण्टकिनश्चैव कुशा: काशाश्च भामिनि ।
वने व्याकुलशाखाग्रास्तेन दु:खमतो वनम् ॥22॥

वृक्ष कंटक युक्त कुश कास प्रसारित ।
असती वनि सर्वत्र म्हणुनी वन भयानक ॥22॥

कायक्लेशाश्च बहवो भयानि विविधानि च ।
अरण्यवासे वसतो दु:खमेव सदा वनम् ॥23॥

शरीरक्लेश तसे नानाप्रकारचे भय त्यासवे ।
अरण्यातिल वास दु:खदायक त्यामुळे ॥23॥

क्रोधलोभो विमोक्तव्यौ करतव्या तपसे मति:।
न भेतव्यं च भेतव्ये दु:खं नित्यमतो वनम् ॥24॥

क्रोध लोभ यांचा त्याग करुनी तपात मन ।
भ्यावे न भयानकास असे दु:ख सदा वनी ॥24॥

तदलं ते वनं गत्वा क्षेमं नहि वनं तव ।
विमृशन्निव पश्यामि बहुदोषकरं वनम् ॥25॥

म्हणून वनि ना जाई क्षेम तेथे नसे तुज ।
विचार करता वाटे दोषकारक तुज वन ॥25॥

वनं तु नेतुं न कृता मतिर्यदा बभूव रामेण तदा महात्मना ।
न तस्य सीता वचनं चकार तं ततोऽब्रवीत् राममिदं सुदु:खिता ॥26॥

वनात नेण्यास नसे त्यास इच्छा रामास महात्म्यास तेव्हां ।
परंतु सीता नच मानुनी ते अश्या प्रकारे श्रीरामास बोले ॥26॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टाविंश: सर्ग:॥28॥

अयोध्याकाण्ड सर्ग 29

एतत तु वचनं श्रुत्वा सीता रामस्य दु:खिता ।
प्रसक्ताश्रुमुखी मन्दमिदं वचनमब्रवीत ॥1॥
रामाचे बोल ऐकूनी सीता दु:खी हळू हळू ।
अश्रुभरल्या नेत्रांनी बोले वचन यापरी ॥1॥
ये त्वया कीर्तिता दोषा वने वस्तव्यतां प्रति ।
गुणानित्येव तान विद्धि तव स्नेहपुरस्कृता ॥2॥

दोष आपण कथिले जे वास्तव्याचे वनातल्या ।
गुणरूप होतिल ते जाणा स्नेहे आपुल्या ॥2॥

मृगा: सिंहा: गजाश्चैव शार्दूला शरभास्तथा।
चमरा: सृमराश्चैव ये चान्ये वनचारिण: ॥3॥
अदृष्टपूर्वरूपत्वात सर्वे ते तव राघव ।
रूपं दृष्ट्वापसर्पेयुस्तव सर्वे हि बिभ्यति ॥4॥

मृग सिंह तसे हत्ती वाघ शरभहि ते तसे।
चमर नील धेनू हे तैसे वन्य प्राणी अन्यही ॥3॥

यापूर्वी न पाहिलेले आपले रूप राघव ।
भयभीत होती सर्व तैसे भिउनी जातिल ॥4॥

त्वया सह गन्तव्यं मया गुरुजनाज्ञया ।
त्वद्वियोगेन मे राम त्यक्तव्यमिह जीवनम् ॥5॥

गुरुवाज्ञेनेच तुम्हासंगे येणे मम होत राघवा ।
कारण त्यजिन प्राण रामा तुमच्याविना ॥5॥

नहि मां त्वत्समीपस्थामपि शक्रोऽपि राघव ।
सुराणामीश्वर: शक्त: प्रघर्षयितुमोजसा ॥6॥

असता तुम्हासवे मी देवांचा राजा इंद्रही ।
न शके बलाने स्पर्श करण्या मजला धजे ॥6॥

पतिहीना तु या नारी न सा शक्ष्यति जीवितुम् ।
काममेवंविधं राम त्वया मम निदर्शितम् ॥7॥

राहणे जीवित नारी नसे शक्य पतीविना ।
ऐसे दर्शविले गेले आपणाकडुनी मला ॥7॥

अथापि च महाप्राज्ञ ब्राह्मणानां मया श्रुतम् ।
पुरा पितृगृहे सत्यं वस्तव्यं किल मे वने ॥8॥

पित्याघरि ब्राह्मणांनी सांगितले होते ऐकले ।
वास्तव्य होईल वनी महाप्राज्ञ सत्य ते घडे ॥8॥
लक्षणिभ्यो द्विजातिभ्य: श्रुत्वाहं वचनं गृहे ।
वनवासकृतोत्साहा नित्यमेव महाबल ॥9॥
हस्तरेखा पाहुनीया ब्राहमणे सांगितले जे ।
ऐकुनी वनवासात जाण्या उत्सुक मी सदा ॥10॥
आदेशो वनवासस्य प्राप्तव्य: स मया किल ।
सा त्वया सह भाहं यास्यामि प्रिय नान्यथा ॥10॥

अटळ नशिबी माझ्या वनवास चुके न तो ।
म्हणुनी येत मी स्वामी अन्य प्रिय नसे मज ॥10॥

कृतादेशा भविष्यामि गमिष्यामि त्वया सह ।
कालश्चाय समुत्पन्न: सत्यवान् भवतु द्विज: ॥11॥

भोगीन जे नशिबात काळ त्याचाच हा असे ।
द्विजवचन सत्य ठरण्या आपणासह येत मी ॥11॥

वनवासे हि जानामि दु:खानि बहुधा किल ।
प्राप्यन्ते नियतं वीर पुरुषैरकृतात्मभि: ॥12॥

वनवासी दु:ख फार जाणते परि वीर ते ।
मानती दु:ख ते ज्याना इंद्रिये मन वश नसे ॥12॥

कन्यया च पितुर्गेहे वनवास: श्रुतो मया ।
भिक्षिण्या: शमवृत्तायां मम मातुरिहाग्रत:॥13॥

पितुर्गृही कन्या असता मातेपुढति भिक्षिणी ।
शान्तिने वनवासाची गोष्ट सांगितली असे ॥13॥

प्रसादितश्च वै पूर्वं त्वं मे बहुतिथं प्रभो ।
गमनं वनवासस्य कांक्षितं हि सह त्वया ॥14॥

येथ येता पूर्वीही मी आपणा होते प्रार्थिले ।
इच्छा वनि जाण्याची होती आपणा मान्यही ॥14॥
कृतक्षणाहं भद्रं ते गमनं प्रति राघव ।
वनवासस्य शूरस्य मम चर्या हि रोचते ॥15॥
अनुज्ञा आपली आहे वनी जाण्यास राघव ।
वनात शूर पतिची सेवा करणे मला प्रिय ॥15॥
शुद्धात्मन् प्रेमभावाद्धि भविष्यामि विकल्मषा ।
भर्तारमनुगच्छन्ती भर्ता हि परदैवतम् ॥16॥

शुद्धात्मन् प्रेमभावाने वनी आपल्यासह ।
होईल पाप मम दूर स्वामि हा स्त्रीस देवता ॥16॥

प्रेत्यभावे हि कल्याण: संगमो मे सदा त्वया ।
श्रुतिर्हि श्रूयते पुण्या ब्राहमणानां यशस्विनाम् ॥17॥

परलोकेही कल्याण सदा संयोग आपला ।
सह येता या विषयी पवित्र श्रुति सांगते ॥17॥

इहलोके च पितृभिर्या स्त्री यस्य महाबल।
अद्भिर्दत्ता स्वधर्मेण प्रेत्यभावेऽपि तस्य सा ॥18॥

इहलोके पिता कन्या धर्मानुसार देइ ज्या ।
जलसंकल्पे परलोके त्याचीच स्त्री ती होतसे ॥18॥

एवमस्मात स्वकां नारी सुवृत्तां हि पतिव्रताम् ।
नाभिरोचयसे नेतुं त्वं मां केनेह हेतुना ॥19॥

धर्मपत्नी आपली मी व्रत पाळी पतिव्रता ।
कारणे कोणत्या नाही नेता आपल्याबरोबरी ॥19॥

भक्तां पतिव्रतां दीनां मां समां सुखदु:खयो:।
नेतुर्महसि काकुत्स्थ समानसुखदु:खिनीम् ॥20॥

भक्त,दीन सुखदु:खात सदैव मी पतिव्रता ।
नेण्या योग्य काकुत्स्थ सुखदु:खे समान मी ॥20॥

यदि मां दु:खितामेवं वनं नेतु न चेच्छसि ।
विषमग्निं जलं वाहमास्थास्ये मृत्युकारणात ॥21॥

दु:खिता मजसी नेणे जर तुम्ही न इच्छिता ।
विष,अग्नि,जल भक्षून अंत करीन आपुला ॥21॥

एवं बहुविधं तं सा याचते गमनं प्रति ।
नानुमेने महाबाहुस्तां नेतुं विजनं वनम ॥22॥

याचना करिता सीता प्रकारे विविध अश्या ।
रामे तिज वनि नेण्या नसे अनुमति दिली ॥22॥
एवमुक्ता तु सा चिन्ता मैथिली समुपागता ।
स्नापयन्तीव गामुष्णैरश्रुभिर्नयनच्युतै:॥23॥
त्यानी ऐसे वदता मैथिली बहु चिन्तित ।
अश्रुपात करोनीया धरणी भिजवीतसे ॥23॥
चिन्तयन्तीं तां तु निवर्तयितुमात्मवान् ।
क्रोधाविष्टां तु वैदेहीं काकुत्स्थो बह्वसान्त्वयत् ॥24॥

चिन्तित कोपित वैदेही पाहुनी करण्या वश ।
रागावलेल्या सीतेचे काकुत्स्थ करि सान्त्वन ॥24॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकोनत्रिंश: सर्ग: ॥29॥

अयोध्याकाण्ड सर्ग 30

सान्त्व्यमाना तु रामेण मैथिली जनकात्मजा ।
वनवासनिमित्तर्थं भर्तारमिदमब्रवीत ॥1॥
सान्त्वन रामे केलेली मैथिली जनकात्मजा ।
वनवास निमित्ताने पतीस वदली असे ॥11॥
सा तमुत्तमसंविग्ना सीता विपुलवक्षसम ।
प्रणयाच्चाभिमानाच्च परिचिक्षेप राघवम ।2॥

विशालवक्ष रामास सीता भयभीत अशी ।
प्रेम स्वाभिमानामुळे आक्षेप करुनी वदे ॥2॥

किं त्वामन्यत वैदेह: पिता मे मिथिलाधिप:।
राम जामातरं प्राप्य स्त्रियं पुरुषविग्रहम् ॥3॥

पिता मिथिलानरेश जामातरूपे मिळवुनी ।
न जाणती पुरुषरूपे आहात स्त्रीच आपण ॥3॥

अनृतं बत लोकोऽयमज्ञानाद् यदि वक्ष्यसि ।
तेजो नास्ति परं रामे तपतीव दिवाकरे ॥4॥

मला सोडुनिया जाता अज्ञाने लोक आपणा ।
सूर्यापरि तळपे राम नसे तेज पराक्रम ।
म्हणतील असे तेव्हां दु:खदायक ते मज ॥4॥

किं हि कृत्वा विषण्णस्त्वं कुतो वा भयमस्ति ते ।
यत् परित्यक्तुकामस्त्वं मामनन्यपरायणम् ॥5॥

विषाद कसला भयही ज्यामुळे मज आपण ।
जी एकमात्र आश्रित तिचा त्याग करण्या इच्छिता ॥5॥

द्युमत्सेनसुतं वीरं सत्यवन्तमनुव्रताम् ।

सावित्रीमिव मां विद्धि त्वमात्मवशवर्तिनम् ॥6॥

द्युमत्सेनसुता सावित्री सत्यवाना तशीच मी
अनुगामिनि तुम्हास अधीन आज्ञेत आपल्या ॥6॥

न त्वहं मनसा त्वन्यं द्रष्टामि त्वदृतेऽनय ।
त्वया राघव गच्छेयं यथान्या कुलपांसनी ॥7॥

आपल्याविण अन्यास मनानेहि न पाहते ।
अन्य अकुलिना जैसी म्हणुनी सह येइन ॥7॥

स्वयं तु भार्या कौमारी चिरमध्युषिता सतीम् ।

शैलूष इव मां राम परेभ्यो दातुमिच्छसि॥8॥

विवाहित कौमार्यात सदैव राहता सवे ।

रंगकर्म्यापरि मज का देता परक्याकडे ॥8॥

शैलूष म्हणजे रंगकर्मी नट किंवा वादक त्याला बायकोच्या मिळकतीवर जगावे लागते अशी तेव्हांची परिस्थिती म्हणजे बायको नृत्य करणार व हा साथ करणार असे असावे.

यस्य पथ्यंचरामात्थ यस्य चार्थेऽवरुध्यसे ।

त्वं तस्य भव वश्यश्च विधेयश्च सदानघ ॥9॥

ज्याच्यामुळे मज शिक्षा ही राज्याभिषेक आपला ।
थांबे त्या भरताचे व्हा आज्ञापालक आपण ॥9॥

स मामनादाय वनं न त्वं प्रस्थितमर्हसि।
तपो वा यदि वारण्यं स्वर्गो वा स्यात् त्वया सह ॥10॥

मजवीण वनी जाणे अयोग्य तुम्हा त्यामुळे ।
तप करता,स्वर्गी वा वनी मी आपणासवे ॥10॥

न च मे भविता तत्र कश्चित् पथि परिश्रम:।
पृष्ठतस्तव गछन्त्या विहारशयनेष्विव ॥11॥

परिश्रम न भासतील चालता आपल्यामागुनी ।
वाटिकेत विहार किंवा शयन करण्यापरी ॥11॥

कुशकाशशरेषीका ये च कण्टकिनो द्रुमा:।
तूलाजिनसमस्पर्शा मार्गे मम सह त्वया ॥12॥

रस्त्यात खडे काटे वृक्ष कंटकयुक्तही ।
रुइकापूस मृगचर्मसम भासतील तुम्हासवे ॥12॥

महावातसमुद्धूतं यन्मामवकरिष्यति ।
रजो रमण तन्मन्ये परार्धमिव चन्दनम् ॥13॥

वाते प्रचंड उडुनी धूळ शरीरावरि जी पडे ।
चंदन उटि सदृश्या तिला समजेन मी ॥13॥

शाद्वलेषु यदा शिश्ये वनान्तर्वनगोचरा ।
कुथास्तरणयुक्तेषु किं स्यात सुखतरं तत:॥14॥

तृणशय्येवरि झोपेन वानात आपल्यासवे ।
मृदु शय्या मंचकी काय सुख याहुनि वाटते ?॥14॥

पत्रं मूलं फलं यत्तु अल्पं वा यदि वा बहु ।
दास्यसे स्वयमाहत्य तन्मेऽमृतरसोपमम ॥15॥

फळेमूळे अथवा पाने अल्प किंवा बहुतही ।
आणून आपण द्याल लागेल अमृतासम ॥15॥

न मातुर्न पितुस्तत्र स्मरिष्यामि न वेश्मन:।
आर्तवान्युपभुजानां पुष्पाणि च फलानि च ॥16॥

फळे फुले होतिल जी प्राप्त खाउनि राहिन ।
माता पिता गृह यांची न आठवण काढिन ॥16॥

नच तत्र तत: किंचित् द्रष्टमर्हसि विप्रियम् ।
मत्कृते न च ते शोको न भविष्यति दुर्भरा ॥17॥

न अप्रिय असे काही माझ्याकडून घडेल ।
कष्ट मजमुळे किंवा निर्वाह न मम दुष्कर ॥17॥

यस्त्वया सह स स्वर्गो निरयो यस्त्वया विना ।
अति जानन् परां प्रीतिं गच्छ राम मया सह ॥18॥

तुम्हासह जे स्थान स्वर्ग तुम्हाविना नरक ते ।
जाणून हे मला रामा न्या आनंदे बरोबर ॥18॥

अथ मामेवमव्यग्रां वनं नैव नयिष्यसे ।
विषमद्यैव पास्यामि मा वशं द्विषतां गमम् ॥19॥

मज निर्भय वनवासा सवे न्याल न मी विष ।
प्राशीन नच राहीन परक्यांसमवेत मी ॥19॥
पश्चादपि हि दु:खेन मम नैवास्ति जीवितम् ।
उज्झितायास्वया नाथ तदेव मरणं वरम् ॥20॥
आपणा पश्चात दु:खाने अशक्य जीवित राहणे ।
ऐसे सोडुनि मज जाता मरण श्रेयस्कर मज ॥20॥
इमं हि सहितुं शोकं मुहूर्तमपि नोत्सहे ।
किं पुनर्दश वर्षाणि त्रीणि चैकं च दु:खिता ॥21॥

तुम्हाविण पळे दोन शोके राहु न मी शके ।
चौदा वर्षे दु:खित मी कशी काढेन राघवा ॥21॥

इति सा शोकसंतप्ता विलप्य करुणं बह ।
चुक्रोश पतिमायस्ता भृशमालिङ्ग्य सस्वरम् ॥22॥

अशी दु:खाने संतप्त अति दुर्बल होउनी ।
दृढ आलिङ्गुनि पतिला आक्रोशी उच्च स्वरे॥22॥

सा विद्धा बहुभिर्वाक्यैर्दिग्धैरिव गजाङ्गना ।
चिरसंनियतं बाष्पं मुमोचाग्निमिवारणि: ॥23॥

गजाङ्गना शरे विद्ध रामाच्या वचने तशी ।
रोखलेले अश्रु ढाळी अरणी आग जशी ॥23॥

तस्या: स्फटिकसंकाशं वारिं संतापसम्भवम् ।
नेत्राभ्यां परिसुस्रावय पङ्कजाभ्यामिवोदकम् ॥24॥

नेत्रातुनी संतापे अश्रुजल स्फटिकासम ।
जणु कमलातुनि दोन जलधारा बरसती ॥24॥

तत्सितामलचन्द्राभं मुखमायतलोचनम् ।
पर्यशुष्यत बाष्पेण जलोद्धृत्मिवाम्बुजम् ॥25॥

मुख पूर्णचंद्रासम जे विशाल नेत्रे सुशोभित ।
शुष्क कमलासम जे काढता पाण्यातुनी ॥25॥

तां परिष्वज्य बाहुभ्याम् विसंज्ञामिव दु:खिताम् ।
उवाच वचनं राम: परिविश्वासयंस्तदा ॥26॥

दु:खाने शुद्ध गेलेल्या सीतेस दोन्ही बाहुनी ।
उचलुनी सांत्वनासाठी श्रीराम तिजला म्हणे ॥26॥

न देवि बत दु:खेन स्वर्गमप्यभिरोचये ।
नहि मेऽस्ति भयं किंचित् स्वयंभोरिव सर्वत:॥27॥

मिळे स्वर्गसुख जरी नको तुज दु:ख देउन ।
भय किञ्चितही नाही मला ब्रह्मदेवासम ॥27॥

तव सर्वमभिप्रायमविज्ञाय शुभानने ।
वासं न रोचयेऽरण्ये शक्तिमानपि रक्षणे ॥28॥

तव रक्षणा समर्थ जरि मी शुभानने ।
तरि तव अभिप्राय पूर्ण जाणू इच्छितो ॥28॥

यत् सृष्टासि मया सार्धं वनवासाय मैथिलि ।
न विहातुं मया शक्या प्रीतिरात्मयवता यथा ॥29॥

वनवास भोगण्यासाठी मजसवे तू जन्मली असशील मैथिली ।
तर तुजला सोडि ना मी आत्मज्ञानी जसा प्रसन्नता ॥29॥

धर्मस्तु गजनासोरु सद्भिराचरित: पुरा ।
तं चाहमनुवर्तिष्ये यथा सूर्यं सुवर्चला ॥30॥

पुर्वकाली सत्पुरुषांनी पत्नीसह जसा धर्म जपला ।
जपेन तसा मी ही मज तूही अनुसर ॥30॥

न खल्वहं न गच्छेयं वनं जनकनन्दिनी ।
वचनं तन्नयति मां पितु: सत्योपबृंहितम् ॥31॥

वनी नच मी जाणे असंभव जनक्नन्दिनी ।
सत्यवचन पित्याचे नेतसे मज वनाप्रति ॥31॥

एष धर्मश्च सुश्रोणि पितुर्मातुश्च वश्यता ।
आज्ञां चाहं व्यतिक्रम्य नाहं जीवितुमुत्सहे ॥32॥

आज्ञेत पित्यामातेच्या सुश्रोणी धर्म हा असे ।
उल्लंघुनी ती मजला अशक्य जीवित राहणे ॥32॥

अस्वाधीनं कथं दैवं प्रकारैरभिराध्यते ।
स्वाधीनं समतिक्रम्य मातरं पितरं गुरुम् ॥33॥

माता पिता गुरू सर्व सेवा अधीन आपल्या ।
उल्लंघूनि तया दैवा अस्वाधिन का योजणे ॥33॥

यत्र त्रयं त्रयो लोका: पवित्रं तत्समं भुवि ।
नान्यदस्ति शुभापाले तेनेदमभिराध्यते ॥34॥

आराधुनी जया त्रिलोकी होती प्राप्त तिन्ही अर्थ ।
माता पिता गुरू श्रेष्ठ म्हणूनी आराधती तया ॥34॥

न सत्यं दानमानौ वा यज्ञो वाप्याप्तदक्षिणा:।
तथा बलकरा: सिते यथा सेवा पितुर्मता ॥35॥

सत्य दान तथा मान दक्षिणायुक्त यज्ञही ।
मातापित्यांची सेवा असे प्रबल त्याहुनी ॥35॥

स्वर्गो धनं वा धान्यं वा विद्या पुत्राः सुखानि च ।
गुरुवृत्यनुरोधेन न किंचिदपि दुर्लभम् ॥36॥

धन धान्य किंवा स्वर्ग विद्या पुत्र सुखे तशी ।
गुरुजन सेवा करिता काहीही नच दुर्लभ ॥36॥

देवगंधर्वगोलोकान् ब्रह्मलोकांस्तथापरान् ।
प्राप्नुवन्ति महात्मानो मातापितृपरायणाः ॥37॥

देवब्रह्मगन्धर्व गोलोक प्राप्त त्याना अन्यही ।
महात्मे जे असती मातृपितृपरायण ॥37॥

स मा पिता यथा शास्ति सत्यधर्मपथे स्थित:।
तथा वर्तितुमिच्छामि स हि धर्म: समातन:॥38॥

जसे सत्यधर्मपथे केले पित्याने मम शासन ।
तसे इच्छितो करण्या तोच धर्म सनातन ॥38॥

मम सन्ना मति: सीते नेतुं त्वां दण्डकावनम् ।
वसिष्यामिति सा त्वं मामनुयातुं सुनिश्चिता ॥39॥

मजसवे राहशील वनी या तव निश्चयामुळे ।
विचार त्याविषयीचा टाकला बदलून मी ॥39॥
सा हि दिष्टानवद्याङ्गि वनाय मदिरेक्षणे ।
अनुगच्छस्व मां भीरु सहधर्मचरी भव ॥40॥
मजसंगे मदिराक्षे चल आज्ञापितो तुला ।
अनुगामिनि हो माझी तेथ धर्मे आचरी ॥40॥
सर्वथा सदृशं सीते मम स्वस्य कुलस्य च ।
व्यवसायमनुक्रान्ता कान्ते त्वमतिशोभनम् ॥41॥

ममसमवेत येण्याचा चांगला निश्चय तुझा ।
दोन्ही कुलांना योग्य सर्वथा सीते वल्लभे ॥41॥

आरभस्व शुभश्रोणिवनवासक्षमा: क्रिया:।
नेदानिं त्वदते सीते स्वर्गोऽपि मम रोचते ॥42॥

आरम्भ हे शुभश्रोणि कर्मे निघण्यापूर्विची ।
दृढनिश्चये मजला स्वर्गहि तुच्छ तुझ्याविना ॥42॥

ब्राह्मणेभ्यश्च रत्नानि भिक्षुकेभ्यश्च भोजनम् ।
देहि चाशंसमानेभ्य: संत्वरस्व च मा चिरम् ॥43॥

ब्राह्मणां रत्ने दान भिक्षुकांना भोजन ।
देइ सत्वर न करी विलम्ब नको व्हावया ॥43॥

भूषणानि महार्हाणि व्रवस्त्राणि यानि च ।
रमणीयाश्च ये केचित क्रीडार्थाश्चाप्युपस्करा:॥44॥
शयनीयानि यानानि मम चान्यानि यानि च ।
देहि स्वभृत्यवर्गस्य ब्राह्मणानामनन्तरम ॥45॥

बहुमूल्य आभूषण वस्त्रेहि सुंदर तशी ।
रमणीय अश्या वस्तु क्रीडा उपकरणे तशी ॥44॥

शय्या उत्तम याने उपयुक्त वस्तू अश्या ।
करुनि दान उरे सर्व वाटुनी टाकि सेवकां ॥45॥

अनुकूलं तु सा भर्तुर्ज्ञात्वा गमनमात्मन:।
क्षिप्रं प्रमुदिता देवी दातुमेव प्रचक्रमे ॥46॥

अनुकूल वनी नेण्या पतीस पाहता सीता ।
प्रमुदित होउनिया दाने करण्यात गुंतली ॥46॥

तत: प्रहष्टा प्रतिपूर्णमानसा यशस्विनी भर्तुरवेक्ष्य भाषितम् ।
धनानि रत्नानि च दातिमङ्गना प्रवक्रमे धर्मभूतां मनस्विनी ॥47॥

जिचे मनोरथ पूर्ण ती यशस्विनी आज्ञा पतीची मानुनि त्यापरी ।
करी सुरू दान करण्यास रत्ने धर्मात्मा ब्राह्मणां धनही तसे ॥47॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्रिंश: सर्ग:॥30॥

अयोध्याकाण्ड सर्ग 31

एवंश्रुत्वा स संवादं लक्ष्मण: पूर्वमागत:।
बाष्पपर्याकुलमुख: शोकं सोढुमशक्नुवन् ॥1॥
लक्ष्मण पूर्वी आलेला संवाद तो ऐकुनी ।
डोळ्यात भरती अश्रू शोक ना त्या आवरे ॥1॥
स भ्रातुश्चरणौ गाढं निपीड्य रघुनन्दन:।
सीतामुवाचातियशां राघवं च महाव्रतम् ॥2॥

पकडुनी पद बन्धूचे घट्ट तो रघुनन्दन ।
यशस्विनि सीतेस व्रतधारि रामा वदे ॥2॥
यदि गन्तुं कृता बुद्धिर्वनं मृगगजायुतम् ।
अहं त्वानुगमिष्यामि वनमग्रे धनुर्धर:॥3॥
वनी मृगपशू युक्त जाण्याचे निश्चित मनी ।
तर मीहि धनुर्बद्ध चालेन आपणापुढे ॥3॥
मया समेतोऽरण्यानि रम्याणि विचरिष्यसि ।
पक्षिभिर्मंगयूथैश्च संघुष्टानि समन्तत: ॥4॥

मजसंगे वनी रम्य कलकल पक्ष्याची जिथे ।
गुंजारव भ्रमरांचा विहार आपण करा ॥4॥
न देवलोकाक्रमणं नामरत्वमहं वृणे ।
ऐश्वर्य चापि लोकानां कामये न त्वया विना ॥5॥
देवतालोकी जाणे वा अमरत्व प्राप्त करणे ।
किंवा ऐश्वर्य सर्वांचे नलगे तुजवाचुनि ॥5॥
एवं ब्रुवाण: सौमित्रिर्वनवासाय निश्चित:।
रामेण बहुभि: सान्त्वैर्निषिद्ध:: पुनरब्रवीत ॥6॥

वनवासी निश्चित जाणे ठरविता हे लक्ष्मण ।
शान्त शब्दे श्रीरामे विरोध करता बोले पुन्हा ॥6॥

अनुज्ञातस्तु भवता पूर्वमेव यदस्म्यहम् ।
किमिदानीं पुनरपि क्रियते मे निवारणम् ॥7॥

पूर्वीपासुनि आज्ञा जवळी राहण्याची तुम्ही ।
दिधली असता तुम्ही आता रोखता मज ॥7॥

यदर्थं प्रतिषेधो मे क्रियते गन्तुमिच्छत:।
एतदिच्छामि विज्ञातुं संशयो हि ममानघ ॥8॥

जाण्यास मम प्रतिरोध करिसी का रघुनन्दन ।
कारण जाणण्या इच्छी मला संशय वाटतो ॥8॥

ततोऽब्रवीन्महातेजा रामो लक्ष्मणमग्रत:।
स्थितं प्राग्गमिनं धीर: याचमानं कृताञ्जलिम् ॥9॥

जोडुनी हात रामास लक्ष्मण पुढती उभा ।
राम महातेजस्वी त्यावरी त्याजला म्हणे ॥9॥

स्निग्धो धर्मरतो धीर:सततं सत्पथे स्थित:।
प्रिय: प्राणसमो वश्यो विजेयश्च सखा च मे ॥10॥

धर्मशील प्रेमळ वीर सन्मार्गी स्थिर पराक्रमी ।
प्राणप्रिय मज सखा आज्ञापालक मम वश ॥10॥

मयाद्य सह सौमित्रे त्वयि गच्छति तद्वनम् ।
को भजिष्यति कौसल्या< सुमित्रां वा यशस्स्विनीम् ॥11॥

मजसंगे सौमित्रा तू वनी येशिल तर मग ।
माता कौसल्या सुमित्रा यांची सेवा कोण करी ॥11॥

अभिवर्षति कामेर्य: पर्जन्य: पृथिवीमिव ।
न कामपाशपर्यस्तो महातेजा महीपति:॥12॥

जलवर्षे जसा मेघ पृथ्वीवरी तसे जना ।
महाराज जना देती प्रेमपाशी बद्ध ते ॥12॥

सा हि राज्यमिदं प्राप्य नृपस्याश्वपतेः सुता ।
दुःखितानां सपत्नीनां न करिष्यति शोभनम् ॥13॥

मिळवुनी राज्य नृपाचे कैकेयी अश्वपतीसुता ।
दुःखित सवतींसह ती न करील योग्य वर्तन ॥13॥

न भरिष्यति कौसल्यां सुमित्रां च सुदुःखितम् ।
भरतो राज्यमासाय कैकेय्यां पर्यवस्थितः ॥14॥

मिळता भरता राज्य मातेच्या अधीन राहुनी ।
कौसल्या सुमित्रा दु:खी करील त्यांचे न पोषण ॥14॥

तामार्यां स्वमेवेह राजानुग्रहणेन वा ।
सौमित्रे भर कौसल्यामुक्तमर्थममुं चर ॥15॥

दोघींचे राहुन येथे स्वप्रयत्ने वा अनुग्रहे ।
पित्याच्या करी पालन प्रयोजन सिद्ध हे करी ॥15॥

एवं मयि च ते भक्तिर्भविष्यति सुदर्शिता ।
धर्मज्ञगुरुपूजायां धर्म्श्चाप्यतुलो महान् ॥16॥

यामुळे प्रकट होईल भक्ती मजवरील तुझी ।
धर्मज्ञ गुरुपूजेचा धर्म प्राप्त तुला घडे ॥16॥

एवं कुरुष्व सौमित्रे मत्कृते रघुनन्दन ।
अस्माभिर्विप्रहीणाया मातु: न भवेत सुखम् ॥17॥

सौमित्रा मजसाठी हे करी कारण आपल्या ।
माता न सुखी होती दोघां सोडुनी आपणा ॥17॥

एवमुक्तस्तु रामेण लक्ष्मण: श्लक्ष्णया गिरा ।
प्रत्युवाच तदा रामं वाक्यज्ञो वाक्यकोविदम् ॥18॥

मर्म जाणुन वाक्याचे लक्ष्मण मधुर वाणीने ।
तात्पर्य जाणत्या रामा देई उत्तर ते असे ॥18॥

तवैव तेजसा वीर भरत: पूजयिष्यति ।
कौसल्यां च सुमित्रां च प्रयतो नास्ति संशय :॥19॥

प्रभावे आपल्या वीर मातांना भरत आपुल्या ।
पूजील पवित्र भावे मुळी संशय यात ना ॥19॥

यदि दु:स्थो न रक्षेत भरतो राज्यमुत्तमम् ।
प्राप्य दुर्मनसा वीर गर्वेण च विशेषत: ॥20॥

तमहं दुर्मतिं क्रूरं वधिष्यामि न संशय:।

तत्पक्शानपि तान् सर्वांस्त्रैलोक्य्मपि किं तु सा ॥21॥

कौसल्या बिभूदार्या सहस्रं मद्विधानपि ।

यस्या: सहस्रं ग्रामानां सम्प्राप्तमुपजीविनाम् ॥22॥

जर उत्तम राज्यास रक्षे भरत योग्य ना ।

अथवा दुर्बुद्धीने मातांचे न करी रक्षण ।\॥20

तर दुर्मती त्यास वधीन यात न संशय ।

जरी त्रैलोक्यहि त्यामागे त्यांचीहि तीच दशा ॥21॥

पोसेल स्वत: कौसल्या लोकांस सहस्रावधि ।
सहस्र गावे तिच्या नावे पाळण्यास्तव आश्रितां ॥22॥

तदात्मभरणे चैव मम मातुस्तथैव च ।
पर्याप्ता मद्विधानां च भरणाय मनस्विनी ॥23॥

त्यामुळे स्वत:चे मम मातेचे आणखी काहींचे ।
करण्या उदरभरण समर्थ ती मनस्विनी ॥23॥

कुरुष्व मामनुचरं वैधवें नेह विद्यते ।
कृतार्थोऽहं भविष्यामि तव चार्थ: प्रकल्पते । ॥24॥

म्हणून मज येउदे न धर्म त्यामुळे बुडे ।
कृतार्थ मी होईन कार्यही सिद्ध आपुले ॥24॥

धनुरादाय सगुणं खनित्रपिटकाधरः।
अग्रतस्ते गमिष्यामि पन्थानं तव दर्शयन् ॥25॥

धनुष्य प्रत्यन्चेसह खोरे पीटिका घेउनी ।
चालीन आपल्यापुढती करीत मार्गदर्शन ॥25॥

आहरिष्यामि ते नित्यं मूलानि च फलानिच ।
वन्यानि च तथान्यानि स्वाहाहांणि तपस्विनाम् ॥26॥

नित्य आणिन फळे मूळे तैसे वन्यपदार्थही ।
खावया योग्य जे होती वनी राहाणाऱ्यांस्तव ॥26॥

भवांस्तु सह वैदेह्या गिरिसानुषु रंस्यसे ।
अहं सर्वं करिष्यामि जाग्रत: स्वपतश्च ते ॥27॥

वैदेहीसह आपण करता भ्रमण गिरीवरी ।
करीन सगळे आपण जागृत वा सुप्त राहता ॥27॥

रामस्त्वनेन वाक्येन सुप्रीत: प्रत्युवाच तम् ।
व्रजापृच्छस्व सौमित्रे सर्वमेव सुहृज्जनम् ॥28॥

प्रसन्न होत बोलांनी राम बोलति यावर ।
सुहृज्जन माता यांची आज्ञा जाण्या वनात घे ॥28॥

ये च राज्ञो ददौ दिव्ये महात्मा वरुण: स्वयम् ।
जनकस्य महायज्ञे धनुषी रौद्रदर्शने ॥29॥
अभेद्ये कवचे दिव्ये तूणीं चाक्षय्यसायकौ ।
आदित्यविमलाभौ द्वौ खड्गौ हेमपुरिष्कृतौ ॥30॥
सत्कृत्य निहितं सर्वमेतदाचार्यसद्मनि ।
सर्वमायुधमादाय क्षिप्रमाव्रज लक्ष्मण ॥31॥

महात्मा वरुणानी जे महायज्ञी जनका ।
धनुष्य भयंकर दोन दिव्य असती दिले ॥29॥
अभेद्य कवच तसे भाते अक्षय्यबाणयुक्त दो ।
सूर्यापरि तेजस्वी दो खड्ग सुवर्ण भूषित ॥30॥
वरदक्षिणेत मिळे जे सत्कारपूर्वक स्थित ।
आचार्यगृही सर्व शीघ्र ते आणि लक्ष्मण ॥31॥
स सुहृज्जनमामन्त्र्य वनवासाय निश्चित:।
इक्ष्वाकु गुरुमागम्य जग्राहायुधमुत्तमम् ॥32॥

सुहृदा सांगुनी सज्ज वनवासासाठि जात तो ।
इक्ष्वाकु गुरु प्रति जात अस्त्रे उत्तम घेतसे ॥32॥

तत दिव्यं राजशार्दूल: सत्कृतं माल्यभूषितम् ।
रामाय दर्शयामास सौमित्रि: सर्वमायुधम् ॥33॥

राजशार्दुल सौमित्र दिव्य शस्त्रे सर्वही ।
माल्यविभूषित रामा आणुनी सर्व दाखवी ॥33॥

तमुवाचात्मवान् राम: प्रीत्या लक्ष्मणमागतम् ।
काले त्वमागत: सौम्य कांक्षिते मम लक्ष्मण ॥34॥

येता लक्ष्मण प्रेमाने वदे राम मनस्वी त्या ।
आलास योग्य वेळी येणे तव इष्ट लक्ष्मणा ॥34॥

अहं सप्रदातुमिच्छामि यदिदं मामकं धनम् ।
ब्राह्मणेभ्यस्तपस्विभ्यस्त्वया सह परंतप ॥35॥

शत्रुसंताप लक्ष्मणा धन माझे तुझ्यासवे ।
तेजस्वी ब्राह्मणा दान तुझ्यासह करु इच्छितो ॥35॥

वसन्तीह दृढं भक्त्या गुरुषु द्विजसत्तमा:।
तेषामपि च मे भूय: सर्वेषां चोपजीवनम् ॥36॥

गुरुविषयी दृढभक्त श्रेष्ठ ब्राह्मण मजसवे ।
त्यांना सर्व आश्रितांना धन हे वाटु इच्छितो ॥37॥

वसिष्ठपुत्रं तु सुयज्ञमार्य त्वमानयाशु प्रवरं द्विजानाम् ।
अपि प्रयास्यामि वन समस्तानभ्यर्थ शिष्टानपरान द्व्जातीन ॥37॥

वसिष्ठपुत्र जे सुयज्ञ आर्य तया उरले त्या बोलवा शीघ्र
सत्कार सर्वांचा करून मी वनात मी जाईन त्यानंतर ॥38॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकत्रिंश: सर्ग: ॥31॥

अयोध्याकाण्ड सर्ग 32

ततः शासनमाज्ञाय भ्रातुः प्रियकरं हितम् ।
गत्वा स प्रविवेशाशु सुयज्ञस्य निवेशनम् ॥1॥
आज्ञा मानून बंधूची हितकर प्रियही तशी ।
गुरुपुत्र सुयज्ञाच्या प्रवेशी लक्ष्मण गृही ॥1॥
तं विप्रमग्न्यगारस्थं वन्दित्वा लक्ष्मणोऽब्रवीत् ।
सखेऽभ्यागच्छ पश्य त्वं वेश्म दुष्करकारिणः॥2॥

विप्र तो अग्निशाळेत प्रणाम करुनी तया ।
म्हणे येउनि रामाच्या गृही त्याची भेट घ्या ॥2॥

ततः संध्यामुपास्थाय गत्वा सौमित्रिणा सह ।
क्रष्टुं स प्राविशल्लक्ष्या रम्यं रामनिवेशनम् ॥3॥

तेव्हां करुनी संध्या लक्ष्मणासह जाउनी ।
प्रवेशी लक्ष्मिसंपन्न रामभवनी रम्य जे ॥3॥

तमागतं वेदविदं प्राञ्जलिः सीतया सह ।
सुयज्ञमभिचक्राम राघवोऽग्निमिवार्चितम् ॥4॥

तेजस्वी अग्निसमान येता सुयज्ञ श्रीराम ।
सीतेसह करी त्याचे जोडुनी हात स्वागत ॥4॥

जातरूपमयैत्मुख्यैरङ्गदै: कुण्डलै: शुभै: ।
सहेमसूत्रेर्मणिभि: केयरैर्वलयैरपि ॥5॥
अन्यैश्च रत्नैर्बहुभि: काकुत्स्थ: प्रत्यपूजयत ।

करी नंतर काकुत्स्थ तयाचे पूजन अर्पुनी
सुवर्ण कुंडले अङ्गद सुवर्णसूत्री ओविलि ॥5॥
केयूर,वलये, मोती अनेक रत्नेही तशी।

सुयज्ञं स तदोवाच राम: सीताप्रचोदित:॥6॥

हारं च हेमसूत्रं च भार्यायै सौम्य हारय ।

रशनां चाथ सा सीता दातुमिच्छति ते सखी ॥7॥

सीतेच्या इच्छेनुसार श्रीराम सुयज्ञा वदे ॥6॥

सखी तव पत्नीची इच्छिते देण्यास तिला ।

सुवर्णसूत्रासह हार तिजला कंकणेही द्या ॥7॥

अङ्गदानि च चित्राणि केयूराणि शुभानि च ।

प्रयच्छति सखी तुभ्यं भार्यायै गच्छती वनम् ॥8॥

केयूर तसे सुन्दर विचित्र अङ्गदासह ।
पत्नीस तुझ्या सीता देतसे जाता वनी ॥8॥

पर्यमग्र्यास्तरणं नानारत्नविभूषितम् ।
तम्पीच्छति वैदेही प्रतिष्ठापयितुं त्वयि ॥9॥

शय्येसह विभूषित नानारत्ने पलंगही ।
वैदेही इच्छिते तोही पाठवण्या तव गृही ॥9॥

नागः शत्रुजयो नाम मातुलोऽयं ददौ मम ।
तंते निष्कसहस्रेण ददामि द्विजपुङ्गव ॥10॥

गज शत्रुजय नामे मामानी दिधला मज ।
सहस्र मुद्रांसमवेत अर्पितो तोही मी तुला ॥10॥

इत्युक्त: स तु रामेण सुयज्ञ प्रतिगृह्य तत ॥
रामलक्ष्मणसीतानां प्रयुयोजाशिष: शिवा:॥11॥

श्रीरामे वदता ऐसे वस्तू सर्व घेऊन त्या ।
राम लक्ष्मण सीतेस दे मङ्गल आशिर्वच ॥11॥

अथ भ्रातरमव्यग्रं प्रियं राम: प्रियंवदम् ।
सौमित्रि तमुवाचेदं ब्रह्मेव त्रिदशेश्वरम् ॥12॥

शान्तभावे उभा भ्राता वचन प्रिय जो वदे ।
राम त्यास वदे ब्रह्मा देवेश इंद्रा जसा ॥12॥

अगस्त्यं कौशिकं चैव तावुभौ ब्राह्मणोत्तमौ ।
अर्चयाहूय सौमित्रे रत्नै: सस्यमिवाम्बुभि:॥13॥
तर्पयस्व महाबाहो गोसहस्रेण राघव ।
सुवर्णरजतेश्चैव मनीभिश्च महाधनै: ॥14॥

अगस्त्य विश्वामित्र उभया उत्तम द्विजा ।
बोलावूनि करी पूजा रत्नभारासवे तया ॥13॥

मेघ जसा जलवर्षावे तृप्त शेतीस करी जसे ।
सोने चांदी गायी रत्ने देउनी तोषवी तयां ॥14॥

कौसल्यां च य आशीर्भिर्भक्तः पर्युपतिष्ठति ।
आचार्यस्तैत्तिरीयाणामभिरूपश्च वेदवित ॥15॥
तस्य यानं च दासीश्च सौमित्रे सम्प्रदापय ।
कौशेयेन च वस्त्राणि यावत तुष्यति स द्विजः॥16॥

ब्राह्मण जे यजुर्वेदी तैत्तिरीय शाखाध्ययन ।
करती कौसल्या मातेस आसीर्वचति प्रतिदिनी ॥15॥

त्याना वाहने दासी वस्त्रे रेशमि धन बहु ।
संतुष्ट होतिल ज्याने करी प्रदान तेवढे ॥16॥

सूतश्चित्ररथश्चार्य सचिव: सुचिरोषित:।
तोशयेनं महाहश्च रत्नैर्वस्त्रैर्धनैस्तथा ॥17॥
पशकाभिश्च सर्वाभिर्गवां दशशतेन च ।

चित्ररथ नामे सूत असे श्रेष्ठ सचिवही ।
दीर्घ सेवेत द्या त्यास बहुमूल्य रत्ने धन ॥17॥
तसे उत्तम श्रेणीचे पशु गायी सहस्रही ।

ये चेमे कठकालापा बहवो दण्डमाणवा: ॥18॥

नित्यस्वाध्यायशीलत्वावान्नान्यत कुर्वन्ति किञ्चन ।

अलसा: स्वादुकामाश्च महतां चापि सम्मता: ॥19॥

तेषामशीतियानानि रत्नपूर्णानि दापय ।

शालिवाहसहस्रं च द्वे शते भद्रकांस्तथा ॥20॥

मजसवे ब्रह्मचारी कठ, कलाप शाखीय ॥18॥

अध्यायी रत त्यामुळे कार्य अन्य करीति ना ।

भिक्षा न मागती अलसे स्वादिष्ट खाणे इच्छिती ॥19॥

महापुरुषे सन्मान्य तयां रत्नभारित ।
उंट ऐंशी तसे बैल खाद्यान्नासह सहस्र द्या ॥20॥

व्यञ्जनार्थं च सौमित्रे गोसहस्रमुपाकुरु ।
मेखलीनां महासङ्ग: कौसल्यां समुपस्थित:।
तेषां सहस्र सौमित्रे प्रत्येकं सम्प्रदापय ॥21॥
त्यांना दह्यातुपासाठी सहस्र गायी दान द्या ।
मेखलाधारी ब्रह्मचारी माता कौसल्येकडे ।
आलेले तया प्रत्येकी सहस्र मुद्रा दान द्या ॥21॥

अम्बा यथा मो नन्देच्च कौसल्या मम दक्षिणाम् ।
तथा द्विजातीस्तान् सर्वाल्लंलक्ष्मणार्चय सर्वश:॥22॥

दक्षिणा मम देण्याने कौसल्या माता मम ।
आनंदित होईल ऐसे सर्वां सम्मानित करी ॥22॥

पुरुषशार्दूलस्तद् धनं लक्ष्मण: स्वयम् ।
यथोक्तं ब्राह्मणेंद्राणाममददाद् धनदो यथा ॥23॥

त्याप्रमाणे पुरुषसिंह लक्ष्मण कुबेरापरी ।
ब्राह्मणां श्रेष्ठ धन दान करी सांगितले जसे ॥23॥

अथाब्रवीत् बाष्पगलांस्तिष्ठतश्चोपजीविन:।
स प्रदाय बहुद्रव्यमेकैकस्योपजीवनम् ॥24॥
लक्ष्मणस्य च यद् वेश्म गृहं च यदिदं मम ।
अशून्यं कार्यमेकैकं यावदागमनं मम ॥25॥

नंतर अश्रूपूर्ण नेत्रे प्रत्येक उभ्या सेवका ।
निर्वाहा चौदा वर्षे योग्य धन देओनिया ॥24॥
सांगे सर्वां जोवरी मी वनात लक्ष्मणासह ।
घरा सोडुन अन्यत्र कुठे जाऊ नका तुम्ही ॥25॥

इत्युक्त्वा दु:खितं सर्वं जनं तमुपजीविनम् ।
उवाचेदं धनाध्यक्षं धनमानीयतां मम ॥26॥

सर्व सेवक दु:खी ते वनी जाता पाहुनी ।
सांगे राम कोषाध्यक्षा आणा धन सर्व असेल जे ॥26॥

तत: स पुरुषव्याघ्रस्तद् धनं सह लक्ष्मण:।
द्विजेभ्यो बालवृद्धेभ्य: कृपणेभ्यो ह्यदापयत ॥28॥

लक्ष्मणासह रामाने वृद्ध ब्राह्मण बालकां ।
दीनदुबळ्या सर्वांना धन वाटुन टाकले ॥28॥

तत्रासीत पिङ्गलो गार्ग्यस्त्रिजटो नाम वै द्विज:।
क्षतवृत्तिर्वने नित्यं फालकुद्दाललाङ्गली ॥29॥

तेव्हां तिथे गार्ग्य त्रिजट नामे ब्राह्मण ।
फाळ कुदळ घेवोनी शोधी फल मूल भक्षण्या ॥29॥

तं वृद्धं तरुणी भार्या बालानादाय दारकान् ।
अब्रवीद् ब्राह्मणं वाक्यं स्त्रीणां भर्ताहि देवता ॥30॥
अपास्य फालं कुद्दालं कुरुष्व वचनं मम ।
रामं दर्शय धर्मज्ञं यदु किञ्चिदवाप्स्यसि ॥31॥

वृद्ध तो स्वत: त्याची पत्नी परि तरुण असे ।
म्हणे त्याला असे ती की स्त्रीला देवता पती ॥30॥
परि ऐका माझे फाळ कुऱ्हाड फेकुनि द्या ।
धर्मज्ञ रामास भेटा मिळेल धन आपणासही ॥31॥

स भार्याया वच: श्रुत्वा शाटीमाच्छाद्य दुश्छदाम् ।
स प्रातिष्ठत पन्थानं यत्र रामनिवेशनम् ॥32॥

ऐकुनी वचन पत्नीचे फाटके धोतर नेसुनी ।
जातसे मार्गावरी तो श्रीराम भवनाकडे ॥32॥

भृग्वंगिर:समं दीप्त्या त्रिजटं जनसंसदि ।

आपञ्चमाया: कक्षाया नैतं कश्चिदवारयत ॥33॥

भृगु अंगिरासम तेजस्वी त्रिजट जनातुनी ।

जाई कक्षात रामाच्या न कोणी त्यास रोखत ॥33॥

स राममासाद्य तदा त्रिजटो वाक्यमब्रवीत ।

निर्धनो बहुपुत्रोऽस्मि राजपुत्र महाबल ॥34॥

क्षतवृतिर्वने नित्यं प्रत्यवेक्षस्व मामिति ।

त्रिजट जाउनी बोले रामास वचन असे ।

निर्धन मी पुत्र बहु मला असती महाबल ॥34॥
नसे प्राप्ति वनी राही मजवरी कृपा करी ॥

तमुवाच ततो राम: परिहाससमन्वितम् ॥35॥
गवां सहस्रमप्येकं न च विश्राणितं मया ।
परिक्षिपसि दण्डेन यावत्तावदवाप्स्यसे ॥36॥

विनोदे वदे श्रीराम गाई असंख्य मजकडे ॥35॥
सहस्रहि न दिल्या कोणा फेका दंडा आपला ।
जाईल जेथवरी तितक्या सर्व होतिल आपल्या ॥36॥

स शाटी परित: कट्यां सम्भ्रान्त: परिवेष्टय ताम् ।

आविध्य दण्डं चिक्षेप सर्वप्राणेन वेगत: ॥37॥

वस्त्र सावरुनी आपले दंडा फिरवुनी ब्राह्मण ।

शक्ति एकवटुनी सर्व फेकी दूर अन्तरी ॥37॥

स तीर्वां सरयूपारं दण्डस्तस्य कराच्च्युत:।

गोव्रजे बहुसाहस्रे पपातोक्षणसंनिधौ ॥38॥

पडे जाउनी दंडा जी गोशाला शरयूपारचि ।

बैलाजवळी एका सहस्र गाई जिथे ॥38॥

तं परिष्वज्य धर्मात्मा आ तस्मात सरयूतटात ।

आनयामास ता गावस्त्रिजटस्याश्रमं प्रति ॥39॥

त्रिजटा कवळुनी रामे गाइ स्थानापर्यंत त्या ।

मागवुनी त्रिजटाच्या आश्रमी पाठवी तदा ॥39॥

उवाच तदा रामस्तं गर्गमभिसांत्वयन ।

मन्युर्न खलु कर्तव्य: परिहारो ह्ययं मम ॥40॥

गर्गवंशी तया राम सांत्वन करुनी म्हणे ।

विनोदे बोललो तैसे न थट्टा करण्या आपुली ॥40॥

इदंहि तेजस्तव यद् दुरत्ययं तदेव जिज्ञासिमितुमिच्छता मया ।
इमं भवानर्थमभिप्रचोदिनी वृणीष्व किंचेदपरं व्यवससि ॥41॥

हे तेज आपुले दुर्लंघ्य असे जाणावे म्हणुनी आपणा ।
मी केले प्रेरित फेकण्या दंडा मागावे अजुनही काहिही ॥41॥

ब्रवीमि सत्येन न ते स्म यन्त्रणां धनं हि यद्यन्मम विप्रकारणात ।
भवत्सु सम्यकप्रतिपादनेन मयार्जितं चैव यशस्करं भवेत ॥42॥

संकोच न धरा मनि सत्य बोलतो धन असे जे ब्राह्मणांसाठीच ।
विधीनुसार आपणासारख्यास देता दान यशवृद्धि करी मम हे धन ॥42॥

ततः सभार्यस्त्रिजटो महामुनिर्जवामनीकं प्रतिगृह्य मोदितः।
यशोबलप्रीतिसुखोपबंहिणीस्तदाशिषः प्रत्यवद्न्महात्मनः ॥43॥

एवढे मिळता खिल्लार गाईंचे त्रिजट पत्नीसह प्रसन्न होत अति ।
तयामुळे आशीर्वाद श्रीरामा देती वाढण्या यश,प्रीति,बल,सुख तसे ॥43॥

स चापि रामः प्रतिपूर्णपौरुषौ महाधनं धर्मबलैरुपार्जितम् ।
नियोजयामास सुहृज्जने चिराद् यथार्हसम्मानवचः प्रचोदितः ॥44॥

पराक्रमी राम भगवान उपार्जित धर्मबले धन महान त्यानन्तर ।
सम्मानपूर्ण वचने प्रेरित सुहृज्जना देत राही पर्याप्त काल ॥44॥

द्विज: सुहृद् भृत्यजनोऽथवा तदा दरिद्रभिक्षाचरणश्च यो भवेत ।
न तत्र कश्चिन्न बभूव तर्पितो यथार्हसम्माननदानसम्भ्रमै: ॥45॥

न राही तेव्हां सुहृद,सेवक दरिद्र ब्राह्मण असा भिक्षुकही कोंणी ।
जो न झाला संतुष्ट श्रीरामाच्या सन्मान आदर सत्कारे तृप्त ॥45॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे द्वात्रिंश: सर्ग:॥32॥

अयोध्याकाण्ड सर्ग 33

दत्त्वा तु सह वैदेह्या ब्राह्मणेभ्यो धनं बहु ।
जग्मतुः पितरं द्रष्टं सीतया सह राघवौ ॥1॥

सीतेसह धन बहू करुनी दान ब्राह्मणां ।
राम लक्ष्मण दोघेही पित्या जाति भेटण्या ॥1॥

ततो गृहीते प्रेष्याभ्यामशोभेतां तदायुधे ।
मालादामभिरासक्ते सीतया समलंकृते ॥2॥

सेवकांच्या कडे त्यांच्या आयुधे पुष्पशोभित ।
चन्दने सीतेकडुनी अलंकृत पूजनास्तव ॥2॥

ततः प्रासादहाणि विमानशिखराणि च ।
अभिरुह्य जनः श्रीमानुदासीनो व्यलोकयत ॥3॥

तेव्हां प्रासादशिखरी महाली उंच जाउनी ।
न्याहाळति तिघांना त्या उदासीन तेव्हां जन ॥3॥

न हि रथ्याःसुशक्यन्ते जन्तुं बहुजनाकुलाः।
आरुह्य तस्मात प्रासादाद् दीना पश्यन्ति राघवम ॥4॥

गर्दीमुळे रस्त्यात चालणे कठिण होतसे ।
म्हणुनी गृहशिखरी जाउनी पाहती जन ॥4॥

पदातिं सानुजं दृष्ट्वा ससीतं च जनास्तदा ।
ऊचुर्बहुजना वाच: शोकोपहतचेतस:॥5॥

श्रीराम लक्ष्मण सीता चालत जाता पाहुनी ।
शोकव्याकुल जन खेदाने म्हणती असे ॥5॥

यं यान्तमनुयाति स्म चतुरङ्गबलं महत् ।
तमेकं सीतया सार्धमनुयाति स्म लक्ष्मण: ॥6॥

अरेरे ज्यांच्या मागे चाले चतुरंग दल ।
श्रीराम एकटे मागे सीता लक्ष्मण चालती ॥6॥

ऐश्वर्यश्च रसज्ञः सन् कामानां चाकरो महान्।
नेच्छत्येवानृतं कर्तुं वचनं धर्मगौरवात् ॥7॥

ऐश्वर्य लोळे पायी सर्वां कामनापूर्ति जो ।
असत्य पितुर्वचना न करी धर्म पाळण्या ॥7॥

या न शक्या पुरा द्रष्टं भूतैराकाशगैरपि ।
तामद्य सीतां पश्यन्ति राजमारगगता जनाः ॥8॥

जिला न पाहू शकती प्राणी विचरती नभी ।
तिला राजमार्गावरी चालता पाहती जन ॥8॥

अङ्गरागोचितां सीतां रक्तचन्दनसेविनीम् ।
वर्षमुष्णं च शीतं च नेष्यत्याशु विवर्णताम् ॥9॥

अङगराग सेवनयोग्य रक्तचन्दन सेविनी ।
ऊन पाउस थंडीने विवर्ण कान्ति होइल ॥9॥

अद्य नूनं दशरथः सत्यमाविश्य भाषते।
नहि राजा प्रियं पुत्रं विवासयितुमर्हति ॥10॥

दशरथ राजा आज सत्त्व सोडुनि बोलती ।
कोणता राजा सांगेल प्रियपुत्रा गृह सोडण्या ॥10॥

निर्गुणस्यापि पुत्रस्य कथं स्याद् विनिवासनम् ।
किं पुनर्यस्य लोकोऽयं जितो वृत्तेन केवलम् ॥11॥

निर्गुण पुत्रालाही न करिती निर्वासित ।
चरित्रे जिंकी लोकांना वनवास कैसा तया ॥11॥

आनृशंस्यमनुक्रोश: श्रुतं शीलं दम: शम:।
राघवं शोभयन्त्येते षड्गुणा: पुरुषर्षभम् ॥12॥

शम दम दया,विद्या,क्षमा अक्रूरता सहा ।
गुणांनी नरश्रेष्ठ श्रीराम मंडित सदा ॥12॥

तस्मात तस्योपघातेन प्रजा: परमपीडिता:।
औंदकानीव सत्त्वानि ग्रीष्मे सलिलसंक्षणम ॥13॥

प्रजा दु:खित म्हणुनि आघाते त्यावरी जसे ।
उष्म्याने तडफडती जीव सुकता जलनिधी ॥13॥

पीडया पीडितं सर्वं जगदस्य जगत्पते:।
मूलस्येवोपघातेन वृक्ष: पुष्पफलोपग: ॥14॥

व्यथेने श्रीरामाच्या जग सर्वच पीडित ।
कापता मूळ जसा वृक्ष फळांसह फुलांसह ॥14॥

मूलं ह्येष मनुष्याणां धर्मसारो महाद्युतिः।
पुष्पं फलं च पत्रं च शाखाश्चास्येतरे जनाः॥15॥

श्रीराम मूळ तेजस्वी धर्म बळ ज्याचे असे ।
सर्व प्राणी जगातील शाखा पत्र,फुले फळे ॥15॥

ते लक्ष्मण इव क्षिप्रं सपत्न्यः सहबान्धवाः।
गच्छन्तमनुगच्छामो येन गच्छन्ति राघवः॥16॥

लक्ष्मणापरि आम्हीही बन्धुपत्न्यांसह निघू ।
अनुसरुनी श्रीरामा जाऊ त्याच्या मागुती ॥16॥

उद्यानानि परित्यज्य क्षेत्राणि च गृहाणि च ।
एकदु:खसुखा राममनुगच्छाम धार्मिकम् ॥17॥

श्रीरामा धार्मिकासंगे घर शेती सर्व सोडुनि ।
जाउनी सुखदु:खात साथ त्याची आम्ही करू ॥17॥

समुद्धृतनिधानानि परिध्वस्ताजिराणि च ।
उपात्तधनधान्यानि हृतसाराणि सर्वश:॥18॥

रजसाभ्यवकीर्णानि परित्यक्तानि दैवतै:।
मूषकै: परिधावद्भिअरुबिलैरावृतानि च ॥19॥
अपेतोदकधूमानि हीनसम्मार्जनानि च ।
प्रणष्टबलिकर्मेज्यामन्त्रहोमजपानि च ॥20॥
दुष्कालेनेव भग्नानि भिन्नभाजनयन्ति च ।
अस्मत्यक्तानि कैकेयी वेश्मानि प्रतिपद्यताम् ॥21॥

धन गुप्त उखडून खोदून गृह आंगण ।
घेऊनिया धनधान्य आवश्यक वस्तु नाशुनी ॥18॥

धुळीने भरुनी जावो सोडुनी देवतां घरी ।
बिळे घरात होवोनी मूषक धावोत तिथे ॥19॥
आग न लागो तेथे न पाणी पडो तिथे ।
वैश्वदेव बलि यज्ञ होम मन्त्र जप नसे ॥20॥
दुष्काळ पडे ऐसे घर भाण्डी मोडकी ।
अश्या घरांच्या स्थानी करो राज्य कैकेयी ॥21॥
वनं नगरमेवास्तु येन गच्छति राघवः।
अस्माभिश्च परित्यक्तं पुरं सम्पद्यतां वनम् ॥22॥

श्रीराम जातील वन तेच नगर होइल ।
सोडता नगर आम्ही हे वनात परिवर्तित ॥22॥

बिलानि दंष्टिण: सर्वे सानूनि मृगपक्षिण:।
त्यजन्त्वस्म्द्भयागीता गजा: सिहा वनान्यपि ॥23॥

बिळे सोडतिल साप गिरिशिखरे पक्षि मृग ।
गजसिंहहि जातील सोडून वन आम्हामुळे ॥23॥

अस्मत्यक्तं प्रपद्तन्तु सेव्यमानं त्यजन्तु च ।
तृणमांसफालादानां देशं व्यालमृगंद्विजम् ॥24॥

प्रपद्यंता हि कैकेयी सपुत्रा सह बान्धवै:।

राघवेण वयं सर्वं वने व्त्स्याम निर्वृता:॥25॥

त्यागून त्याचे स्थान जातील जे आम्हि सोडले ।

तृणभक्षी मांसभक्षी सर्प पशु पक्षी जिथे ॥24॥

कैकेयी राही अधिकारी ती पुत्र बांधवासह ।

राघवासवे आनंदे आम्ही सर्व राहू वनी ॥25॥

इत्येवं विविधा वाचो नानाजनसमीरिता:।

शुश्राव राघव: श्रुत्वा न विचक्रेऽस्य मानसम् ॥26॥

स तु वेश्म पुनर्मातु: कैलासशिखरप्रभम् ।
अभिचक्राम धर्मात्मा मत्तमातङ्गविक्रम:॥27॥

नानाजन बोलती ते संभाषण वेगवेगळे ।
ऐकती श्रीराम ऐकोनी विकार न मनि उद्भवे ॥26॥
मत्त गजराजासम ते कैलासशिखरापरी ।
भवनी कैकेयीच्या शुभ्र ते पुन्हा प्रवेशती ॥27॥

विनीतवीरपुरुषं प्रविश्य तु नृपालयम्।
ददर्शावस्थितं दीनं सुमन्त्रमविदूरत:॥28॥

प्रवेशी विनयशील पुरुष नृप आलये।
पाही दीन सुमन्त्रास उभा जो दीन दु:खित ॥28॥

प्रतीक्षमाणोऽभिजनं तदात मनार्तरूप: प्रहसन्निवाथ ।
जगाम राम: पितरं दिदृक्षु: पितुर्निदेशं विधिवच्चिकीर्षु: ॥29॥

उभे तिथे दु:खित नागरीक न राम पीडित होत शोके ।
पित्याचि आज्ञा विधिपूर्वक पाळण्या जाती पुढे करीत हास्य ॥29॥

तत्पूर्वमैक्ष्वाकसुतो महात्मा रामो गमिष्यन् नृपमार्तरूपम् ।
व्यतिष्ठ्यत प्रेक्ष्य तदा सुमन्त्रं पितुर्महात्मा प्रतिहारणार्थम् ॥30॥

जाण्या पित्याजवळि शोकमग्न इक्ष्वाकुनंदन पाहतसे सुमन्त्रा ।
देण्यास आगमनाचि आपल्या सूचना तिथेच थांबति काजि काल ॥30॥

पितुर्निदेशेन तु धर्मवत्सलो वनप्रवेशे कृतबुद्धिनिश्चय:।
स राघव:प्रेक्ष्य सुमन्त्रमब्रवीनिवेदयस्वागमनं नृपाय मे ॥31॥

वनात जाण्या कृतनिश्चय पित्याच्या आज्ञेवरुनि श्रीरामचंद्र सुमन्ता ।
पाहूनि बोलति तया पित्यास सूचना देण्यास आगमनाची तयांच्या ॥31॥

इत्यार्थे शीमद्रामायणे वाल्मोकीये आदिकाव्य ऽयोध्याकाण्डे त्रयस्त्रिंश: सर्ग:॥33॥

अयोध्याकाण्ड सर्ग 34

ततः कमलपत्राक्षः श्यामो निरुपमो महान् ।
उवाच रामस्तं सूतं पितुराख्याहि मामिति ॥1॥
स रामप्रेषितः क्षिप्रं संतापजाकलुषेंद्रिम्।
प्रविश्य नृपतिं सूतो निःश्वसन्तं ददर्श ह ॥2॥
श्यामसुंदर श्रीराम कमलाक्ष निरुपम ।
वदे सूता पित्या सांग आलो मी भेटण्या तया ॥1॥

सुमन्त्र जाउनि पाही रामाने धाडता नृपा ।
कांपता देह संतापे घेताना दीर्घ श्वास तो ॥2॥

उपरक्तमिवादित्यं भस्मच्छन्नमिवाबलम् ।
तटाकमिव निस्तोयमपश्यज्जगतीपतिम् ॥3॥
आबोध्य च महाप्राज्ञः परमाकुलचेतनम् ।
राममेवानुशोचन्तं सूतः प्राञ्जलिअरब्रवीत ॥4॥

राहुग्रस्त सूर्य जणु भस्माच्छादित अग्निही ।
जलहीन सरोवर ऐसे निस्तेज जगत्पती ॥3॥

चित्त व्याकुळ रामाचे करती चिन्तन मनी ।
हात जोडुनिया सूत नृपा संबोधुनि म्हणे ॥4॥

तं वर्धयित्वा राजानं पूर्वं सूतो जयाशिषा ।
भयविक्लवया वाचा मन्दया श्लक्ष्णयाब्रवीत ॥5॥

आशीर्वाद देउनिया नृपा विजयसूचक ।
भयव्याकुल मन्द वाणीने बोलला असे ॥5॥

अयं स पुरुषव्याघ्रो द्वारि तिष्ठति ते सुतः ।
ब्राह्मणेभ्यो धनं दत्वा सर्वं चैवोपजीविनाम् ॥6॥

स त्वां पश्यतु भद्रं ते रामः सत्यपराक्रमः।
सर्वान् सुहृद् आपृच्छ्य त्वां हीदानी दिदृक्षते ॥7॥
गमिष्यति महारण्यं तं पस्य जगतीपते ।
वृत्तं राजगुणैः सर्वैरादित्यमिव रश्मिभिः ॥8॥

ब्राह्मणा सेवकां आश्रित धन देउनि आपले ।
पुरुषसिंह श्रीराम राही उभे द्वारात आपल्या ॥6॥
सुहृदां भेटुनी सर्व त्यांचा निरोप घेउनी ।
दर्शना आपुल्या येती आज्ञा देता आपण ॥7॥

श्रीराम गुणसंपन्न किरणे युक्त आदित्यचि ।
महारण्यात जाणार पहा आपणही तयां ॥8॥

स सत्यवाक्यो धर्मात्मा गाम्भीर्यात सागरोपम:।
आकाशैव निष्पङ्को नरेन्द्र: प्रत्युवाच तम् ॥9॥

सत्यवादी धर्मात्मा गम्भीर समुद्रापरी ।
आकाशसम निर्दोष नरेन्द्र देत उत्तर ॥9॥

सुमन्तानय मे दारान् ये केचिदिह मामका:।
दारै: परिवृत: सर्वैर्द्रष्टमिच्छामि राघवम् ॥10॥

सुमन्त्रा सर्व ज्या माझ्या स्त्रियांना बोलावी इथे ।
श्रीरामास तयांसंगे इच्छितो पाहण्यास मी ॥10॥

सोऽन्त:पुरमतीत्यैव स्त्रियस्ता वाक्यमब्रवीत ।
आर्यो ह्वयति वो राजा गम्यतां तत्र मा चिरम॥11॥

अन्त:पुरातिल स्त्रियांना सुमन्त्र जाउनि म्हणे ।
महाराज बोलवीति सर्वां तरी शीघ्र तुम्ही चला ॥11॥

एवमुक्ता: स्त्रिय: सर्वा: सुमन्त्रेण नृपाज्ञया ।
प्रचक्रमुस्तद् भवनं भर्तुराज्ञाय शासनम॥12॥

राजाज्ञेने स्त्रियां सर्वां सुमन्त्रे वदता असे ।
राण्या पतीच्या आदेशे भवनाकडे चालती ॥12॥

अर्धसप्तशतास्तत्र प्रमदास्ताम्रलोचना:।
कौसल्यां परिवार्याथ शनैर्जग्मुधृतव्रता: ॥13॥

साडेतीनशे युवती ताम्रलोचन पतिव्रता ।
नृपभवनी करती प्रवेश कौसल्येसह ॥13॥

आगतेषु च द्वारेषु समवेक्ष्य महीपति:।
उवाच राजा तं सूतं सुमन्त्रानय मे सुतम् ॥14॥

द्वारातुनि येताना पाहुनिया तयां नृप ।
रामास सुमन्त्रा आण वदे राजा असे सुता ॥14॥

स सुतो राममादाय लक्ष्मणं मैथिली तथा।
जगामाभिमुखस्तूर्णं सकाशं जगतीपते:॥15॥

श्रीराम लक्ष्मण सीता यांना घेउनिया सवे ।
नृपाची आज्ञा होता सुमन्त्र शीघ्र येतसे ॥15॥

स राजा पुत्रमायान्तं दृष्ट्वा चारात् कृताञ्जलिम् ।
उत्पपातासनात् तूर्णमार्त: स्त्रीजनसंवृत: ॥16॥

दुरून पुत्रा पाहून येता हात जोडुनी ।
स्त्रियांसमवेत दु:खी उठती आसनावरुनी ॥16॥

सोऽभिदुद्राव वेगेन रामं दृष्ट्वा विशाम्पति:।
तमसंप्राप्य दु:खार्त: पपात भुवि मूर्च्छित:॥17॥

त्यास पाहुनि वेगाने धाव घेति त्याच्याकडे ।
परि त्यापूर्वीच पडे मूर्च्छित दु:खे भूवरी ॥17॥

तं रामोभ्यपतत् क्षिप्रं लक्ष्मणश्च महारथ:।
विसंज्ञमिव दु:खेन सशोकं नृपतिं तथा ॥18॥

दु:खामुळे अचेतन महाराजांप्रति त्वरेने ।
श्रीराम लक्ष्मण धावुनी त्यांच्या जवळी पोचति ॥18॥

स्त्रीसहस्रनिनादश्चात संजज्ञे राजवेश्मनि।
हा हा रामेति सहसा भूषणध्वनिमिश्रित:॥19॥

आभूषणध्वनीसंगे "हा हा राम " असा आर्त ।
नाद स्त्रीसहस्रांचा अन्त:पुरातुन येतसे ॥19॥

तं परिष्वज्य बाहुभ्यां तावुभौ रामलक्ष्मणौ ।
पर्यङ्के सीतया सार्धं रुदन्त: समवेशनम् ॥20॥

श्रीराम लक्ष्मण दोघे सीतेसह आक्रंदती ।
उठवुनी महाराजांस शय्येवर ते ठेवती ॥20॥

अथ रामो मुहूर्तस्य लब्धसंज्ञं महीपतिम् ।
उवाच प्राञ्जलिर्बाष्पशोकार्णवपरिप्लुतम् ॥21॥

शोकाश्रु सागर लुप्त येता मुहूर्ते शुद्धित ।
महाराजांस श्रीराम वदती हात जोडुनी ॥21॥

आपृच्छे त्वां महाराज सर्वेषामीश्वतोऽसि नः।
प्रस्थितं दण्डकारण्यं पश्य त्वं कुशलेन माम् ॥22॥

जाताना दंडकारण्यी आज्ञा घेण्यास येतसे ।
स्वामी आपण राहूदे कृपादृष्टी मजवरी ॥22॥

लक्ष्मणं चानुजानीहि सीता चान्येतु मां वनम् ।
कारणैर्बहुभिस्तथ्यैर्वार्यमाणौ न चेच्छत:॥23॥
अनुजानीहि सर्वान् न: शोकमुत्सृज्य मानद ।
लक्ष्मणं मां च सीतां च प्रजापतिरिवात्मजान् ॥24॥

सांगुनि सत्ये फार जरि अवरोधले तयां ।
लक्ष्मण आणि सीता आग्रह धरती वनी ॥23॥

येण्यास्तव मजसंगे त्यामुळे आज्ञा आपण ।
द्यावी त्यानाहि जैसे प्रजापति सनकादिकां ॥24॥

प्रतीक्षमाणमव्यग्रमनुज्ञां जगतीपते:।
उवाच राजा सम्प्रेक्ष्य वनवासाय राघवम् ॥25॥

राजाज्ञेची शान्तभावे प्रतीक्षा श्रीराम करी ।
वनवासी जाण्यास्तव महाराज म्हणति त्या ॥25॥

अहं राघवं कैकेय्या वरदानेन मोहित:।
अयोध्यायां त्वमेवाद्य भव राजा निगृह्य माम् ॥26॥

वरदाने कैकेयीच्या राघवा असे बद्ध मी ।
परि कैदेत टाकून मजला तू राजा बन ॥26॥

एवमुक्तो नृपतिना रामो धर्मभृतां वर:।
रत्युवाचाञ्जलिं कृत्वा पितरं वाक्यकोविद:॥27॥

म्हणता ऐसे महाराज संभाषणकुशल जो ।
श्रीराम धर्मात्मा त्यांना उत्तर ऐसे देतसे ॥27॥

भवान् वर्षसहस्राय पृथिव्या नृपते पति:।
अहं त्वरण्ये वत्स्यामि न मे राज्यस्य कांक्षिता ॥28॥

महाराज सहस्र वर्षे आपण पृथ्वी अधिपती ।
मी तर वनी राहीन राज्याची न मला स्पृहा ॥28॥
नव पञ्च च वर्षाणि वनवासे विहृत्य ते ।
पुन: पादौ ग्रहीष्यामि प्रतिज्ञांते नराधिप ॥29॥
वनवासी चौदा वर्षे प्रतिज्ञेपरि आपुल्या ।
राहुनी फिरुनि येईन चरणी आपल्या पुन्हा ॥29॥
रुदन्नार्त: प्रियं पुत्रं सत्यपाशेन संयुत:।
कैकेय्या चोद्यमानस्तु मिथो राजा तमब्रवीत ॥30॥

हट्टाने कैकेयीच्या बद्ध सत्यपाशी तसे ।
आर्तभावे रुदन करिता बोलती दशरथ नृप ॥30॥

श्रेयसे वृद्धये तात पुनरागमनाय च ।
गच्छस्वारिष्टमव्यग्रःपन्थानमकुतोभयम् ॥31॥

कल्याण वृद्धिस्तव जाई परत येण्यास्तव ।
तुमचा मार्ग निर्विघ्न निर्भय होवो इच्छितो ॥31॥

न हि सत्यात्मनस्तात धर्माभिमनस्तव ।
संनिवर्तयितुं बुद्धिः शक्यते रघुनन्दन ॥32॥

अद्य त्विदानिं रजनी पुत्र मा गच्छ सर्वथा ।

एकाहं दर्शनेनापि साधु तावच्चराम्यहम् ॥33॥

सत्यस्वरुप धर्मात्मा रघुनन्दन असिस तू ।

तव विचार बदलणे असम्भव असे तरी ॥32॥

एक रात्र राहुनी येथे यात्रा नंतर सुरू करी ।

दिन एक दर्शनाचे तुझ्या सुख मला मिळो ॥33॥

मातरं मां च सम्पश्यन् वसेमामद्य शर्वरीम् ।

तर्पित: सर्वकामैस्त्वं श्व: काल्ये साशयिष्यसि ॥34॥

अवस्था तव मातेची माझी पाहुनी रात्र ही ।
आम्हाकडुनी होऊनी तृप्त प्रात:काली निघे उद्या ॥34॥

दुष्करं क्रियते पुत्र सर्वथा राघव प्रिय ।
त्वया हि मत्प्रियार्थं तु वनमेवमुपाश्रितम् ॥35॥

राघवा प्रिय दुष्कर हे अससी कार्य करीत तू ।
प्रिय माझे करण्यास वनी जात अससि तू ॥35॥

न चेतन्मे प्रियं पुत्र शपे सत्येन राघव ।
छन्नया चलितस्त्वस्मि स्त्रिया भस्माग्निकल्पया ॥36॥

वञ्चना या तु लब्धा मे तां त्वं निस्तर्तुमिच्छसि।
अनया वृत्तसादिन्या कैकेय्याभिप्रचोदित:॥37॥

सांगतो शपथेवर हे मज प्रिय न राघवा ।
राखेखालिल अग्नीसम कैकेयीने भयंकर ॥36॥
लपवुनी अभिप्राय वञ्चना मम जी केली ।
जाण्यास त्यामुळेच वनात निघसी आज तू ॥37॥

न चैतदाश्चर्यतमं यत त्वं ज्येष्ठ सुतो मम ।
अपानृतकथं पुत्र पितरं कर्तुमिच्छसि ॥38॥

आश्चर्य कसले नाही गुणे वये ज्येष्ठ पुत्र तू ।
त्यामुळे पित्यास पाही करण्या सत्यवादि तू ॥38॥

अथ रामस्तदा श्रुत्वा पितुरार्तस्य भाषितम।
लक्ष्मणेन सह भ्रात्रा दीनो वचनमब्रवीत ॥39॥

ऐकुनी पित्याचे वचन शोकाकुल राम तेधवा ।
लक्ष्मणासह होउनि दु:खी पित्यास ऐसे म्हणे ॥39॥

राप्स्यामि यानद्य गुणान् को मे श्वस्तान् प्रदास्यति ।
अपक्रमणमेवात: सर्वकामैरहं वृणे ॥40॥

उत्तम चर्या आज जी मिळेल का ती मज उद्या ।
सर्व मोह सोडुनि आज निघणे उत्तम दिसे ॥40॥

इयं सराष्ट्रा सजना धनधान्यसमाकुला ।
मया विसृष्टा वसुधा भरताय प्रदीयताम् ॥41॥

धनधान्य सम्पन्न पृथ्वी जनांसह त्यागितो मी ।
मी सोडलेली आपण भरता प्रदान करा ॥41॥

वनवासकृता बुद्धिर्न च मेऽद्य चलिष्यति ।
यस्तु युद्धे वरो दत्त: कैकेयी वरद त्वया ॥42॥

दीयतां निखिलेनैव सत्यस्त्वं भव पार्थिव ।

निश्चयी वनवासाच्या नाही शक्य प्रतारण ।

वर देवासुरयुद्धात दिले कैकेयीस आपण ॥42॥

देऊनीया पूर्णरूपे आपण सत्यवादी बना ।

अहं निदेशं भवन्तो यथोक्तमनुपालनम् ॥43॥

चतुर्दश समा वत्स्ये वने वनचरैः सह ।

मा विमर्शो वसुमती भरताय प्रदीयताम् ॥44॥

यथोक्त आपुली आज्ञा पाळुनीया वनात मी }}43॥

राहीन चौदा वर्षे वनचरासमवेत मी ॥
विचार न करा अन्य पृथ्वी भरतास द्या ॥44॥

नहि मे कांक्षितं राज्यं सुखमात्मनि ना प्रियम् ।
यथानिदेशं कर्तुं वै तवैव रघुनन्दन ॥45॥

सुखास्तव वा हितासाठी स्वजनांच्या न वांछिले ।
आपल्या आज्ञा म्हणुनि इच्छिले रघुनन्दन ॥45॥

अपगच्छस्तु ते दु:खं मा भूर्बाष्पपरिप्लुत:।
नहि क्षुभ्यति दुर्धर्ष: समुद्र: सरितापति:॥46॥

दु:ख दूर हो आपुले अश्रुपात करू नका ।
जसा सरित्पति क्षुब्ध दुर्घर्ष न होतसे ॥46॥

नैवाहं राज्यमिच्छामि न सुखं न च मेदिनीम् ।
नैव सर्वानिमान् कामान् न स्वर्गं न च जीवितुम् ॥47॥

राज्याची नसे इच्छा भोग वा पृथ्विची मज ।
स्वर्गाचीहि नसे तैसी जीविताचीहि नसे मज ॥47॥

त्वामहं सत्यमिच्छामि नानृतं पुरुषर्षभ ।
प्रत्यक्षं तव सत्येन सुकृतेन च ते शपे ॥48॥

घेतो शपथ कर्मांची आपल्या शुभ सत्यही ।
वच सत्य आपुले व्हावे मिथ्या न व्हावे कदा ॥48॥

न च शक्यं मया तात स्थातुं क्षणमपि प्रभो ।
स शोकं धरयस्वेमं नहि मेऽस्ति विपर्यय: ॥49॥

थांबणे क्षण एकहि न शक्य मज तात हे ।
न करा शोक पर्याय मजला दुसरा नसे ॥49॥

अर्थितो ह्यस्मि कैकेय्या वनं गच्छेति राघव ।
मया चोक्तं व्रजामीति तत्सत्यमनुपालये ॥50॥

याचना करि कैकेयी रामा जा वनवासि तू ।
वचन दिधले तिजला सत्य ते करणे मज ॥50॥

मा चोत्कंठां कृथा देव वने रंस्यामहे वयम् ।
प्रशान्तहरिणाकीर्णे नानाशकुनिनादते ॥51॥

पहाण्या आम्हा उत्कंठा नका दावु वनी आम्ही ।
मोदे राहु मृगांसवे कलरवा पक्ष्यांसवे ऐकत ॥51॥

पिता हि दैवतं तात देवतामपि स्मृतम् ।
तस्माद् दैवतमित्येव करिष्मामि पितुर्वच ॥52॥

पिता हे दैवत तात देवतांचेहि मानती ।
मानुनी देवता तुम्हा आज्ञा पाळत आपुली ॥52॥
चतुर्दशसु वर्षेषु गतेषु नृपसत्तम ।
पुनर्द्रक्ष्यसि मां प्राप्तं संतापोऽयं विमुच्यताम् ॥53॥
संताप न करी तात येईन चौदा वर्षानंतर।
दिसेन आपणा येथ आपल्यासमोर मी ॥53॥
येन संस्तंभनीयोऽयं सर्वो बाष्पकुलो जनः।
त्वं पुरुषशार्दूल किमर्थं विक्रियां गतः॥54॥

बाष्पाकुल जना धीर देउनी करणे शांत ।
कर्तव्य ज्याचे विकल नरसिंह तुम्ही कसे ॥54॥

पुरं च राष्ट्रंच मही च केवला मया विसृष्टा भरताय दीयताम् ।
अहं निदेशं भवतोऽनुपालयन् वनं गमिष्यामि चिराय सेवितुम् ॥55॥

पुरी,राष्ट्र ,पृथिवी सर्व सोडली मी हे सर्व आपण भरतास द्यावे ।
आदेश भवान् आपुला पाळण्या वनी जात मी रहाण्या दीर्घकाल ॥55॥

मया विसृष्टां भरतो महीमिमां सशैलखण्डां सपुरोपकाननाम् ।
शिवासु सीमास्वनुशास्तु केवलं त्वया यदुक्तं नृपते तथास्तु तत् ॥56॥

मी सोडलेली पृथ्वी पर्वत,नगरे उपवनांसह पालन करो भरत ।
राहून कल्याण मर्यादांत पूर्ण करी वचन जे आपण दिधले नरेश्वर ॥56॥

न मे तथा पार्थिव धीयते मनो महत्सु कामेषु न चात्मन: प्रिये ।
यथा निदेशे तव शिष्टसम्मते व्यपैतु दु:खं तव मत्कृतेऽनघ ॥57॥

पार्थिव वस्तूत न रमे मन माझे जितके आज्ञापालनात आपल्या ।
म्हणुन मजविषयी दु: ख जे आपणा वाटते मनात ते दूर जायला हवे ॥57॥

तदद्य नैवानघ राज्यमव्ययं न सर्वकामात् वसुधां न मैथिलीम् ।
न चिन्तितं त्वामनृतेन योजयन् वृणीव सत्यं व्रतमस्तु ते तथा ॥58॥

म्हणून आज नरेश अक्षय राज्य आधिपत्य वसुधेचे तसे सर्व भोग ।
जानकीसवे स्वीकारत नसे वाटे फक्त प्रतिज्ञा आपली सत्य व्हावी ॥58॥

फलानि मूलानि च भक्षयन् वने गिरीश्च पश्यन् सरित: सरांसि च ।
वनं प्रविश्यैव विचित्रपादपं सुखी भविष्यामि तथास्तु निर्वृति: ॥59॥

विचित्र वृक्षांनी युक्त वनी प्रवेशून पहात पर्वत.सरिता सरोवरे तशी।
भक्षूनिया वनी फळे मुळे त्यासवे राहीन सुखी आपण शान्त रहावे ॥59॥

एवं स राजा व्यसनाभिपन्नस्तापेन दु:खेन च पीड्यमान:।
आलिङ्ग्य पुत्रं सुविनश्टसंज्ञो भूमिं गतो नैव चिचेष्ट किञ्चित ॥60॥

राजा असा पुत्रवियोग संकटि संताप दु;खे बहु पीडित असा ।
पुत्रास आलिङ्गुनि होउनी निश्चेष्ट भूमीवरी पडे होउनी जड शीळ ॥60॥

देव्य: समस्ता रुरुदु: समेतास्तां वर्जयित्वा नरदेवपत्नीम् ।
रुदन् सुमन्त्रोऽपि जगाम मूर्च्छा हाहाकृतं तत्र बभूव सर्वम् ॥61॥

राण्याहि सर्व लागति रडाया सवे सोडुनि कैकेयी एकमात्र ।
सुमन्त्र रडती आणि होति मूर्च्छित सर्वत्र हाहा:कार मजे सर्वत्र ॥61॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुर्त्रिंश: सर्ग: ॥34॥

अयोध्याकाण्ड सर्ग 35

ततो निधूय सहसा शिरो नि:श्वस्य चासकृत ।
पाणिं पाणौ विनिष्पिष्य सन्तन् कटकटाय्य च ॥1॥
लोचने कोपसंरक्ते वर्णं पूर्वोचितं जहत ।
कोपाभिभूत: सहसा संतापमशुभं गत: ॥2॥
मन: समीक्षमाणश्च सूतो दशरथश्य च ।
कम्पयन्निव कैकेय्या हृदयं वाकशरै: शितै: ॥3॥

सुमन्त्र सारथि येता शुद्धीवर उठुनी बसे ।
नेत्र रागाने आरक्त मुखावर येइ काळिमा ॥1॥
संतापे मनि क्रोधाने कांपती बडविती शिर ।
पुन:पुन्हा दीर्घ श्वास हातावर हात चोळती ॥2॥
अवस्था दशरथाच्या मनाची पाहुनि वाग्बाणे।
हृदय कैकेयीचे करण्या कंपित बोलती ॥3॥

वाक्यवज्ररनुपमैर्निर्भिन्दन्निव चाशुभै:।
कैकेय्या: सर्वमर्माणि सुमन्त्र: प्रत्यभाषत ॥4॥

आपले वचनरूपी वज्र मर्मस्थाने विन्धित ।
कैकेयीस वच तीक्ष्ण सुमन्त्र लागे बोलण्या ॥4॥

यस्यास्तव पतिस्त्यक्तो राजा दशरथ: स्वयम् ।
भर्ता सर्वस्य जगत: स्थावरस्य चरस्य च ॥5॥
नह्यकार्यतमं किञ्चित्तव देवीह विद्यते ।
पतिघ्नीं त्वामहं मन्ये कुलनीमपि चान्तत: ॥6॥

जिने जगाचा धर्ता पति महाराज दशरथा ।
त्यागिला तिला कुकर्म दुसरे कराया न उरे॥5॥

वाटते मज की हत्या पतीची तुज हातुन।
घडणार अन्ती कुला नाशक होसि तू ॥6॥

यन्महेन्द्रमिवाजव्यं दुष्प्रकम्प्यमिवाचलम् ।
महोदधिमिवाक्षोभ्यं संतापयसि कर्मभि:॥7॥

जे अजिन्क्य महेन्द्रासम अचल पर्वतापरि ।
सागरासम शान्त त्या स्वकर्मे क्रोध आणसि ॥7॥

मावमंस्था दसहरथं भरतारं वरदं पतिम् ।
भर्तुरिच्छा हि नारीणां पुत्रकोट्या विशिष्यते ॥8॥

पति पालक वरदाता अवमानि न दशरथा ।
पतीच्छा असे नारीस कोटि पुत्राहुनी प्रिय ॥9॥

यथावयो हि राज्यानि प्राप्नुवन्ति नृपक्षयै ।
इक्ष्वाकुकुलनाथेऽस्मिंस्तं लोपयितुमिच्छसि ॥10॥

नृप परलोकि जाता राज्य ज्येष्ठ पुत्रा मिळे ।
परंपरा मिटविसि तू असता कुलस्वामी जीवित ॥10॥

राजा भवतु ते पुत्रः भरतः शास्तु मेदिनीम् ।
वयं तत्र गमिष्यामो यत्र रामो गमिष्यति ॥11॥

होवो तव पुत्र राजा करो भरत शासन ।
इथे परि आम्ही जाऊ जेथे श्रीराम जातसे ॥11॥

न च ते विषये कश्चिद् ब्राह्मणो वस्तुमर्हति।
तादृशं त्वममर्यादमद्य कर्मं करिष्यसि ॥12॥
नूनं सर्वे गमिष्यामो मार्गं रामनिषेवितम् ।

न राज्यात तुझ्या वास करेल कोणि ब्राह्मण।
मर्यादाहीन असे कृत्य जर करशील आज ॥12॥
उद्याच आम्ही सर्व रामाचा मार्ग अवसरू ।

त्यक्ता या बान्धवै: सर्वैर्ब्राह्मणै: साधुभि: सदा ॥12॥

का प्रीती राज्यलाभेन तव देवि भविष्यति ।

तादृशं त्वममर्यादं कर्मं कर्तुं चिकिर्षसि ॥13॥

सोडतील बांधव सर्व साधु ब्राह्मणही तसे ॥12॥

राज्य मिळता ऐसे आनंद कसला तुज ॥

मर्यादाहीन असे कृत्य पाहसी करण्यास तू ॥13॥

आश्चर्यमिव पश्यामि यस्यास्ते वृत्तमीदृशम् ।

आचरन्त्या न विवृत्ता सद्यो भवति मेदिनी ॥14॥

आश्चर्य मला वाटे कृत्याने तव या अश्या ।
त्वरित दुभंगे न कशी पृथ्वी अत्याचारामुळे ॥14॥

महाब्रह्मर्षिसृष्टा या ज्वलन्तो भीमदर्शना: ।
धिग्वादण्डा न हिंसन्ति रामप्रजानने स्थिताम् ॥15॥

महाब्रह्मर्षि जे शाप भस्म करण्या देति ते ।
रामा घालविण्या सज्ज कैसे न करती तुला ॥15॥

आनं छित्वा कुठारेण निम्बं परिचरेत् तु क:।
यश्चैनं पयसा सिञ्चेन्नैवास्य मधुरो भवेत् ॥16॥

आम्र छाटुनि कुऱ्हाडीने लिम्ब खाइल का कुणी ।
दुधाने सिंचन करिता मधुर ते होईल का ॥16॥

आभिजात्य हि ते मन्ये यथा मातुस्तथैव च ।
न हि निम्बात स्रवेत क्षौद्रं लोके निगदितं वचः॥17॥

स्वमातेपरी मज वाटे स्वभाव तुझाहि असे ।
लिंबातुनी नसे शक्य मिळणे मध लोकवाक्य हे ॥17॥

तव मातुरसद्वाहं विद्म पूर्वं यथा श्रुतम् ।
पितुस्ते वरदः कश्चित ददौ वरमनुत्तमम् ॥18॥

दुराग्रह तव मातेचा जाणतो पूर्वी ऐकला ।
साधु एक असे देत वर उत्तम पित्या तव ॥18॥

सर्व भूतरुतं तस्मात संजज्ञे वसुधाधिप:।
तेन तिर्यग्गतानां च भूतानां विदितं वच: ॥19॥

कैकेयनरेश लागे समजाया त्या वरामुळे।
पशुपक्षी तसे तिर्यक योनिजात जे बोलती ॥19॥

ततो जृम्भस्य शयने विरुताद् भूरिवर्चस:।
पित्स्ते विदितो भाव: स तत्र बहुधाहसत ॥20॥

शय्येवरी पिता तव ऐके जृम्भ पक्षी जे वदे ।
कळुनी त्यातिल अर्थ हसती ते पुन:पुन्हा॥20॥
तत्र ते जननी कृद्धा मृत्युपाशमभीप्सती।
हासं ते नृपते सौम्य जिज्ञासामीति चाब्रवीत ॥21॥
त्यामुळे जननी कृद्ध म्हणे गळफास घेइन ।
जर कारण हसण्याचे न सांगाल सौम्या मज ॥21॥
नृपश्चोवाच तां देवीं हासं शंसामि ते यदि।
ततो मे मरणं सद्यो भविष्यति न संशय: ॥22॥

बोले नृपती तेव्हां जर सांगितले कारण ।
क्षणी त्या मम मृत्यू होईल हे नि:संशय ॥23॥

माता ते पितरं देवि पुन: केकयमब्रवीत ।
शंस मे जीव वा मा वा न मां त्वं प्रहसिष्यसि ॥24॥

माता तव बोले देवी पित्यास त्यावर पुन्हा ।
मरा वा जगा तुम्ही माझ्यावर हंसू नका ॥24॥

मातेस वाटत असते की पिताश्री आपल्यालाच हसत आहेत

प्रियया च तथोक्त: स कैकेय: पृथिवीपति:।

अस्मै तं वरदायार्थ कथयामास तत्त्वत:॥24॥

प्रिय राणीस घेऊनी साधूकडे वर देइ जो।

नृप नेई तयासंगे वराचा अर्थ सांगण्या ॥25॥

तत: स वरद:साधू राजानं प्रत्यभाषत ।

प्रियतां ध्वंसतां वैयं मा शंसिस्त्वं महीपते ॥25॥

तेव्हां वर देणारा साधू राजास बोलला ।

मरो वा सोडुनि जावो राज्ञी तिज सांगू नको ॥25॥

स तच्छ्रुत्वा वचस्तस्य प्रसन्नमनसो नृप:।

मातरं ते निरस्याशु विजहार कुबेरवत ॥26॥

बोल ऐकुनिया त्याचे आनंदी हो उनि नृप ।

काढी बाहेर घरातून राही कुबेरवत स्वत:॥26॥

तथा त्वमपि राजानं दुर्जनाचरिते पथि।

असद्वाहमिमं मोहात कुरुषे पापदर्शिनी ॥27॥

दुर्जनापरी तूही पाप ठेउनी मनी ।

मोहवश राजास धरिसी अयोग्य आग्रह ॥27॥

सत्यश्चात्र प्रवादोऽयं लौकिक: प्रतिभाति मा ।

पितॄन् समनुजायन्ते नरा मातरमङ्गना:॥28॥

लोक म्हणती ते सत्य आज वाटे खरे मज ।

निपजे पित्यासम पुत्र कन्या मातेसम असे ॥28॥

नैवं भव गृहाणेदं यदाह वसुधाधिप:।

भर्तुरिच्छामुपास्वेह जनस्यास्य गतिर्भव ॥29॥

ऐसे न बनता तूही स्वीकार पतिचे वच ।

पति इच्छा अनुसरुनी आनंदित जनां करी ॥29॥

मा त्वं प्रोत्साहिता पापैर्देवराजसमप्रभम् ।

भर्तारं लोकभर्तारमसद्धर्ममुपादध ॥30॥

देवराजतुल्य भर्त्या कराया कर्म अनुचित ।

नको लावूस ऐकोनी पापीजन विचार तू ॥30॥

न हि मिथ्या प्रतिज्ञातं करिष्यति तवानघ:।

श्रीमान् दशरथो राजा देवि राजीवलोचन:॥31॥

श्रीमान दशरथ राजा राजीवलोचन ना कधी ।

असत्य प्रतिज्ञा करती मुक्त पापापासुनी ॥31॥

ज्येष्ठो वदान्य: कर्मण्य: स्वधर्मस्यापि रक्षिता।

रक्षिता जीवलोकस्य बली रामोऽभिषिच्यताम् ॥32॥

श्रीराम ज्येष्ठ भावात उदार सृष्टीचे रक्षक ।
कर्मज्ञ धर्मपालक होवो राज्याभिषेक त्यां ॥32॥

परिवादो हि ते देवि महांलोके चरिष्यति ।
यदि रामो वनं याति विहाय पितरं नृपम् ॥33॥

जर राम वनी जाती सोडुनी दशरथा पित्या ।
आपली होइल दुष्कीर्ति सर्वत्र लोकामध्ये ॥33॥

स्वराज्यं राघव:पातु भव त्वं विगतज्वरा ।

नहि ते राघवादन्य: क्षम: पुरवरे वसन् ॥34॥

रामास राज्य देऊनी निश्चिन्त होउनि रहा ।

नसे राघवाविण अन्य योग्य नगरा धारण्या ॥34॥

रामेहि यौवराज्यस्थे राजा दशरथो वनम् ।

प्रवेक्ष्यति महेष्वास: पूर्ववृत्तमनुस्मरन् ॥35॥

युवराज पदी राम प्रतिष्ठित होता वनी।

दशरथ नृप जातील अनुसरुनी पूर्वजां ॥35॥

इति सान्त्वैश्च तीक्ष्णैश्च कैकेयीं राजसंसदि ।

भूय: संक्षोभयामास सुमन्त्रस्तु कृताञ्जलि:॥36॥

नैव सा क्षुभ्यते देवी न च स्म परिदूयते ।

न चास्या मुखवर्णस्य लक्ष्यते विक्रिया तदा ॥37॥

सान्त्वनपूर्ण तसे बोल कठोरसुद्धा बोलुनी ।

वळविण्या कैकेयीचे मन सुमन्त्र प्रयत्न करी ॥36॥

न क्रुद्ध होई देवी दु:खही न होई तिला ।

मुखावरिल वा वर्ण न होतसे किंचित कमी ॥37॥

अयोध्याकाण्ड सर्ग 36

ततः समन्त्रमैक्ष्वाकः पीडितोऽत्र प्रतिज्ञया ।
सबाष्पमतिनिःश्वस्य जगादेदं पुनर्वचः॥1॥

प्रतिज्ञापीडित राजा घेउनिया दीर्घ श्वास।
अश्रुभरल्या नेत्रांनी सुमन्त्रा बोलले असे ॥1॥

सूत रत्नसुसंपूर्णा चतुर्विधबला चमूः।
राघवस्यानुयात्रार्थं क्षिप्रं प्रतिविधीयताम् ॥2॥

चतुरंग रत्नपूर्ण सेना श्रीरामामागुनी।
आज्ञा दे पाठवण्याची सुमन्ता शीघ्र हे करी ॥2॥

रूपाजीवाश्च वादिन्यो वणिजश्च महाधना:।
शोभयन्तु कुमारस्य वाहिनी: सुप्रसारिता:॥3॥

रूपवान बोलक्या नारी कुशल वैश्य महाधनी ।
सेनेस कुमाराच्या सुशोभित करण्या पाठवी ॥3॥

ये चैनमुपजीवन्ति रमते यैश्च वीर्यत:।
तेषां बहविधं दत्त्वा तानप्यत्र नियोजय ॥4॥

श्रीरामाजवळि राहून निर्वाह करतात जे ।
पराक्रम पाहुनि ज्यांचा प्रसन्न श्रीराम होतसे ।
सर्वां त्या धन देऊनी पाठवा त्यांच्यासवे ॥4॥

आयुधानि च मुख्यानि नागरा: शकटानि च ।
अनुगच्छन्तु काकुत्स्थं व्याधाश्चारण्यकोविदा: ॥5॥

आयुधे सर्व तऱ्हेची नागरिक शकटांसह ।
वनाचे जाणकार व्याध श्रीरामासह पाठवा ॥5॥

निघ्नन् मृगान् कुञ्जरांश्च पिबंश्चारण्यकं मधु।

नदीश्च विविधा: पश्यन् न राज्यं संस्मरिष्यति ॥6॥

मृगां गजां सारुनि मागे करीत मधुसेवन।
नद्यां विविध पाहूनी राज्या विस्मरतील ते ॥6॥

धान्यकोशश्च य: कश्चिद् धनकोशश्च मामक:।
तौ राममनुगच्छेतां वसन्तं निर्जने वने ॥7॥

वनी निर्जन वास्तव्य श्रीराम करणार तो ।
धनकोश धान्यसाठा त्याच्यासमवेत पाठवा ॥7॥

यजन् पुण्येषु देशेषु विसृजंश्चाप्तदक्षिणा:।

ऋषिभिष्चापि संगम्य प्रवत्स्यति सुखं वने ॥8॥

वनी पावन करुनी यज्ञ देउनि दक्षिणा।
आचार्यां ऋषींसमवेत राहतील सुखे वनी ॥8॥

भरतश्च महाबाहुरयोध्यां पालयिष्यति।
सर्वकामैः पुनः श्रीमान् रामः संसाध्यतामिति॥9॥

भरत महाबाहू तो करी अयोध्यापालन ।
सर्व साधनसंपन्न करुनि रामा वनि पाठवा ॥9॥

एवं ब्रुवति काकुत्स्थे कैकेय्या भयमागतम।

मुखं चाप्यगमच्छोषं स्वरश्चापि व्यरुध्यत॥10॥

दशरथ वच ऐकोनी कैकेयी भयकंपित ।

घश्या कोरड पडुनी अशक्य होई बोलणे ॥10॥

सा विषण्णा च संत्रस्ता मुखेन परिशुष्यता ।

राजानमेवाभिमुखी कैकेयी वाक्यमब्रवीत ॥11॥

विषण्ण होउनिया त्रस्त पाहुनी राजाकडे ।

म्हणे शुष्क वाणीने कैकेयी वाक्य तेधवा ॥11॥

राज्यं गतधनं साधो पीतमण्डां सुरामिव ।

निरास्वाद्यतमं शून्यं भरतो नाभिपत्स्यते ॥12॥

सुरा साररहित न घेती पिण्या कुणि जसे ।

धनहीन शून्य राज्य भरता नच पाहिजे ॥12॥

कैकेय्यां मुक्तलज्जायां वदन्त्यामतिदारुणम् ।

राजा दशरथो वाक्यमुवाचायतलोचनाम् ॥13॥

सोडुनी लाज कैकेयी अत्यन्त कटु बोलण्या ।

लागे तेव्हां दशरथ विशालनयनेस बोलला ॥13॥

वहन्तं कि तुदसि नियुज्य धुरि माहिते ।

अनार्ये कृत्यप्रारब्धं किं न पूर्वमुपारुध ॥14॥

रामास वनि धाडून दु:खि मी परि त्यावरी।
चाबुकासम मारुनी कठोर बोला त्यावरी ।
अनार्ये छळसी मला प्रारंभी मागसी जेव्हां ।
सामग्रि पाठवण्याला प्रतिबंध न का करी ॥14॥

तसैतत क्रोधसंयुक्तमुक्तं श्रुत्वा वराङ्गना ।
कैकेयी द्विगुणं क्रुद्धा राजानमब्रवीत ॥15॥

ऐकुनी वचन राजाचे क्रोधयुक्त वराङ्गना ।

त्याहुनी जास्त क्रोधाने उसळुनी त्यास वदे ॥15॥

तथैव वंशे सगरो ज्येष्ठपुत्रमुपारुधत।

असमञ्ज इति ख्यातं तथायं गन्तुमर्हति॥16॥

वंशात आपल्या ज्येष्ठ सगरपुत्रा असमञ्ज ।

काढले घराबाहेर तसेच रामास करा ॥16॥

एवमुक्तो धिगित्येव राजा दशरथोऽब्रवीत ।

वीडितश्च जनः सर्वः सा च तन्नाबुध्यत ॥17॥

धिक्कार करुनी राजा म्हणे जन सर्व येथिल ।

लाजती परि अनौचित्ये आपल्या तू न लज्जित ॥17॥

तत्र वृद्धो महामात्र: सिद्धार्थो नाम नामत:।

शुचिर्बहुमतो राज्ञ: कैकेयीमिदमब्रवीत ॥18॥

जनी सिद्धार्थ नावाचा मन्त्री वृद्ध शुद्धाचरणी ।

राजास आदरणीय कैकेय़ीस असे वदे ॥18॥

असमञ्जो गृहीत्वा तु क्रीडत: पथि दारकान।

सरयां प्रक्षिपन्नप्सु रमते तेन दुर्मति:॥19॥

असमञ्ज उचलुनि मार्गी फेकी शरयूजली।

खेळती बालके मार्गि आनंद त्यास असा मिळे ॥19॥

तं दृष्ट्वा नागराः सर्वे कृद्धा राजानमब्रुवन् ।

असमञ्ज वृणीष्वैकमस्मान् वा राष्ट्रवर्धन ॥20॥

नगरवासी कुपित राजास बोलती तुम्ही ।

असमञ्जासवे एकटे रहा वा त्यास हाकला ॥20॥

तानुवाच ततो राजा किंनिमित्तमिदं भयम् ।

ताश्चापि राज्ञा सम्पृष्टा वाक्यं प्रकृतयोऽब्रुवन् ॥21॥

विचारी राजा त्यांना कशाचे भय वाटते ।

त्यावरी सांगती त्याला प्रजाजन काय ते ॥21॥

क्रीडतस्त्वेष नः पुत्रान् बालानुभ्रान्तचेतसः।

सरय्यां प्रक्षिपन्मोदतुलां प्रीतिमश्नुते ॥22॥

खेळणाऱ्या बालका आमच्या पकडुनी भयग्रस्त त्यां।

शरयू नदीत फेकी मूर्ख आनन्द घेतसे ॥22॥

स तासां वचनं श्रुत्वा प्रकृतीनां नराधिपः।

तं तत्याजाहितं पुत्रं तासां प्रियचिकीर्षया ॥23॥

ऐकुनी प्रजाजन वाक्य त्यांच्या कल्याणास्तव ।

त्यागिले आपुला पुत्रा अहितकारक दुष्ट जो ॥23॥

तं यानं शीघ्रमारोप्य सभार्यं सपरिच्छदम् ।

यवज्जीवं विवास्योऽयमिति तानन्वशात् पिता ॥24॥

पत्नीसह आवश्यक सामग्री देउनी रथी ।

राज्याबाहेरी आजन्म काढे सांगुनि सेवकां ॥24॥

स फालपिटकं गृह्य गिरिदुर्गाण्यलोकयत् ।

दिशः सर्वास्त्वनुचरन् स यथा पापकर्मकृत् ॥25॥

इत्येनमत्यजद् राजा सगरौ वै सुधार्मिकः।

रामः किमकरोत् पापं येनाइवमुपरुध्यते ॥26॥

फाळ पेटारा घेउनि तो हिंडे वनि पर्वति ।

भटके सर्व दिशांना पापाकर्मानुसार तो ॥25॥

राजा सगर सुधार्मिक त्याग त्याचा असा करी ॥

रामाने कोणते पाप केले त्या फिरणे असे ?॥26॥

न हि कंचन पश्यामो राघवस्यागुणं वयम् ।

दुर्लभो ह्यस्य निरयः शशाङ्कस्येव कल्मषम् ॥27॥

कोणतेही अवगुण ना रामात दिसती आम्हा ।

द्वितीयेच्या चन्द्रात जशी मलिनता नसे ॥27॥

अथवा देवि त्वं कञ्चिद् दोषं पश्यसि राघवे ।

तमद्य ब्रूहि तत्त्वेन तदा रामो विवास्यते ॥28॥

जर दोष किञ्चित देवी रामात दिसे तुज ।

सांग त्याप्रमाणे त्यास निष्कासित करणे योग्य ॥28॥

अदुष्टस्य हि संत्याग: सत्पथे निरतस्य च ।

निर्दहेदपि शक्रस्य द्युतिं धर्मविरोधवान् ॥29॥

त्याग सज्जन सन्मार्गी पुरुषाचा अधर्मच ।

इंद्र तेजा करी दग्ध कृत्य धर्मविरोधी असे ॥29॥

तदलं देवि रामस्य श्रिया विहतया त्वया ।

लोकतोऽपि हि ते रक्ष्य: परिवाद: शुभानने ॥30॥

राज्याभिषेक रामाचा थांबवूनि लाभ न तुझा ।

टाळण्या लोकनिन्देस प्रयत्न करण्या हवा ॥30॥

श्रुत्वा तु सिद्धार्थवचो राजा श्रान्ततरस्वर:।

शोकोपहतया वाचा कैकेयीमिदमब्रवीत ॥31॥

सिद्धार्थवच ऐकोनी श्रान्त झालेल्या स्वरांनी ।

कैकेयीस शोकाकुल दशरथ म्हणती असे ॥31॥

एतद्व्रतो नेच्छसि पापरूपे हितं न जानासि ममात्मनोऽथवा ।

अस्थाम मार्ग कृपणं कुचेष्टा चेष्टा हि ते सादुपथादापेता ॥32॥

न रुचे पापिणी गोष्ट ही तुला न जाणसी स्वहित मनोगता मम ॥

कुचेष्टा करिसी दु:खद मार्ग आश्रये जे साधु पुरुषांव्या विरुद्ध असे ॥32॥

अनुव्रजिष्याम्यहमद्य रामं राज्यं परित्यज्य सुखं धनं च ।

सर्वे च राज्हा भरतेन च त्वं यथासुखं भुक्ष्य चिराय राज्यम् ॥33॥

सोडुनि राज्या धना सुखा मी रामाबरोबर जाण्या इच्छितो मी ।

तू एकटि भरतासव्र सदैव सुखेनैव राज्या उपभोगती रहा तू ॥33॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये ऽयोध्याकाण्डे षट्त्रिंश: सर्ग:\\36॥

अयोध्याकाण्ड सर्ग 37

महामात्रवचः श्रुत्वा रामो दशरथं तदा ।
अभ्यभाषत वाक्यं विनयज्ञो विनीतवत् ॥1॥

विनयशील श्रीराम महामात्रवाक्य ऐकुनी ।
विनयाने दशरथास विनयज्ञ बोले असा ॥1॥

त्यक्तभोगस्य मे राजन् वने वन्येन जीवतः।
किं कार्यमनुयात्रेण त्यक्तसङ्गस्य सर्वतः॥2॥

परित्यागुनि भोगास वनात वन्य जीवन ।
कंठणे असता सेना त्यक्तसंगा कशास्तव ॥2॥
यो हि दत्त्वा द्विपश्रेष्ठं कक्षायां कुरुते मन:।
रज्जुस्नेहेन किं तस्य त्यजत: कुञ्जरोत्तमम् ॥3॥
गजदान करोनीया दोर लोभ कशास्तव ।
हत्तीचे दान करणाऱ्या आसक्ति ही कशास्तव ॥3॥
तथा मम सतां श्रेष्ठ किं ध्वजिन्या जगत्पते ।
सर्वाण्येवानुजानामि चीराण्येवानयन्तु मे ॥4॥

तसे श्रेष्ठ महाराज मज सेना कशास्तव ।
भरता सर्व देतो मी आणा मजला वल्कले ॥4॥
खनित्रपिटके चोभे समानयत गच्छत ।
चतुर्दश वने वासं वर्षाणि वसतो मम ॥5॥
पेटारा कुदळी आणा मजसाठी दासीजन ।
वनवासी चौदा वर्षे तेच उपयोगी मला ॥5॥
अथ चीराणि कैकेयी स्वमाहृत्य राघवम् ।
उवाच परिधत्स्येति जनौघे निरपत्रपा ॥6॥

निर्लज्ज कैकेयी स्वत: आणुनी वल्कले म्हणे ।
जनसमुदायापुढे रामा वदे परिधान ही करा ॥6॥

स चीरे पुरुषव्याघ्र कैकेय्या: प्रतिगृह्य ते ।
सूक्ष्मवस्त्रमवक्षिप्य मुनिवस्त्राण्यवस्त ह ॥7॥

पुरुषसिंह श्रीराम कैकेयीकडुनि घेउनी ।
वस्त्रे उत्तम सोडून करी परिधान वल्कले ॥7॥

लक्ष्मणश्चापि तत्रैव विहाय वसने शुभे ।
तापसाच्छादने चैव जग्राह पितुरग्रत:॥8॥

लक्ष्मणहि सोडून तेथे वस्त्रे उत्तम आपली ।
तपस्व्यांची परिधान करी वस्त्रे पित्यापुढे ॥8॥

अथात्मपरिधानार्थं सीता कौशेयवासिनी ।
सम्प्रेक्ष्य चीरं संत्रस्ता पृषती वागुरामिव ॥9॥
सा व्यपत्रप्रमाणेव प्रगृह्य च सुदुर्मना:।
कैकेय्या: कुशचीरे ते जानकी शुभलक्षणा ॥10॥
अश्रुसंपूर्णनेत्रा च धर्मज्ञा धर्मदर्शिनी ।
गन्धरवराजप्रतिमं भर्तारमिदमब्रवीत ॥11॥

कथं नु चीरं बध्नन्ति मुनयो वनवासिनः।
इति ह्यकुशला सीता सा मुमोह मुहुर्मुहुः ॥12॥

रेशमी वस्त्रांकित सीता मृगीसम जाळे पाहुनि ।
भयभीत होत पाहूनी वल्कले तिजसाठीची ॥9॥
हातून कैकेयीच्या वस्त्रे वल्कल दोन ती।
घेता लज्जित होई ती जानकी शुभलक्षणी ॥10॥
अश्रुपूर्ण नेत्रांनी धर्मज्ञ धर्मचारिणी ।
गन्धर्वसम तेजस्वी पतीस विचारी आपल्या ॥11॥

कशी धारण करती वल्कले मुनि वनामध्ये ।
तिज ज्ञात नसल्याने परिधान करता चुके ॥12॥

कृत्वा कण्ठे स्म सा चीरमेकमादाय पाणिना।
तस्थौ ह्यकुशला तत्र व्रीडिता जनकात्मजा ॥13॥

गळ्यात एक घालूनी दुसरे हाती धरूनिया ।
जाणकार नसे म्हणुनी मुग्ध राही उभी तिथे ॥13॥

तस्यास्तत क्षिप्रमागत्य रामो धर्मभूतां वर:।
धीरं बबन्ध सिताया: कौशेयस्योपरि स्वयम ॥14॥

तेव्हां शीघ्र तिच्यापाशी जाउनी राम धर्मात्मा ।
रेशमी वस्त्रावर तिच्या वल्कल बांधू लागला ॥14॥

रामं प्रेक्ष्य तु सीतायां बध्नंतं चीरमुत्तमम् ।
अन्त:पुरश्चरा नार्यो मुमुचुर्वारि नेत्रजम् ॥15॥

सीतेस नेसवताना स्वत: रामास वल्कले ।
अन्तपुरी पाहुनिया स्त्रियांच्या नयनी जल ॥15॥

ऊचुश्च परमायत्ता रामं ज्वलिततेजसम् ।
वत्स नैव नियुक्तेयं वनवासे मनस्विनी ॥16॥

खिन्न होउनि त्या सर्व श्रीरामा तेजस्वी बोलती ।
मनस्विनी सीतेस वनवास आज्ञापिला नसे ॥16॥

पितुर्वाक्यानुरोधेन गतस्य विजनं वनम् ।
तावद् दर्शनमस्या न: सफलं भवतु प्रभो ॥17॥

पित्राज्ञा पाळण्यासाठी वनी जाता आपण ।
दर्शने इच्या होईल जीवन सफल आमुचे ॥17॥

लक्ष्मणेन सहायेन वनं गच्छस्व पुत्रक ।
नेयमर्हति कल्याणि वस्तुं तापसवद् वने ॥18॥

लक्ष्मणाच्या सहाय्याने पुत्रा तू वनि जाशिल ।
कल्याणि सीता नसे योग्य वास करण्या वनामधे॥18॥

कुरु नो याचनां पुत्र सीता तिष्ठतु भामिनी ।
धर्मनित्य: स्वयं स्थातुं न हीदानीं त्वमिच्छसि ॥19॥

याचना असे आमुची राहील सीता भामिनि।
धर्मपरायण म्हणुनी ना येथ रहाया इच्छि तू ॥19॥

तासामेवांविधा वाच: श्रुण्वन् दशरथात्मज:।
बबन्धैव तथा चीरं सीतया तुल्यशीलया ॥20॥

धीरे गृहीते तु तया सबाष्पो नृपतेर्गुरुः।
निवार्य सीतां कैकेयीं वसिष्ठो वाक्यमब्रवीत ॥21॥

ऐकुनीहि वच मातांचे सीतेस परिधान वल्कल।
श्रीराम करुनी देई स्वभावे पतिसमान जी ॥20॥
त्यामुळे नयनी अश्रू नृपगुरुंच्या येति ते ।
थांबवूनि सीतेस कैकेयीला म्हणति ते ॥21॥

अतिप्रवृत्ते दुर्मेधे कैकेयि कुलपांसनि ।
वञ्चयित्वा तु राजानं न प्रमाणेऽवतिष्ठसि ॥22॥

कुलकलङ्किनि कैकेयी दुष्टबुद्धि फसवुनी ।
नृपास न होसी तुष्ट मर्यादा ओलांडसी ॥22॥
न गन्तव्यं वनं देव्या सीतया शीलवर्जिते ।
अनुष्ठास्यति रामस्य सीता प्रकृतमासनम् ॥23॥
शील परित्यागिसि दुष्टे सीता जाइल ना वनी ।
रामास्तव सिंहासन जे बसेल ती त्यावरी ॥23॥
आत्मा हि दारा: सर्वेषां दारसंग्रहवर्तिनाम् ।
आत्मेयमिति रामस्य पालयिष्यति मेदिनीम् ॥24॥

पत्नी आत्मा गृहस्थांची तशीच सीता असे ।
रामाची म्हणुनी राज्य तीच पालन करेल ॥24॥

अथ यास्यति वैदेही वनं रामेण संगता ।
वयमत्रानुयास्याम: पुरं चेदं गमिष्यति ॥25॥
अन्तपालाश्च यास्यन्ति सदारो यत्र राघव:।
सहोपजीव्यं राष्ट्रं च पुरं च सपरिच्छदम् ॥26॥

वैदेही श्रीरामासंगे वनात जर जाइल ।
सर्व लोक आम्ही सुद्धा पूर्ण नगरहि जाइल ॥25॥

अन्त:पुर रक्षकही जाती सपत्निक जेथ राघव ।
आवश्यक सामग्रिसवे राष्ट्र पुरवासीहि जातिल ॥26॥

भरतश्च सशत्रुघ्नश्चीरवासा वनेचर:।
वने वसन्तं काकुत्स्थमनुवत्स्यति पूर्वजम् ॥27॥

भरतासवे शत्रुघ्न वनी नेसुनि वल्कले ।
आणि सेवा करतील अग्रज रामाची तिथे ॥27॥

तत: शून्यां गतजनां वसुधां पादपी: सह ।
त्वमेका शाधि दुर्वृत्ता प्रजानाम्हिते स्थिता ॥28॥

फक्त वृक्ष जिथे ऐश्या शून्य पृथ्वीवर करी ।
राज्य दुर्वृत्ता अहित प्रजेचे करतेस तू ॥28॥

न हि तद् भविता राष्ट्रं यत्र रामो न भूपतिः।
तद् वनं भविता राष्ट्रं यत्र रामो निवत्स्यति ॥29॥

नसतील जेथ श्रीराम ते राष्ट्र म्हणुनी नसे ।
वनी जिथे वसतील राष्ट्र स्वतन्त्र ते बने ॥29॥

न ह्यदत्तां महीं पित्रा भरतः शास्तुमिच्छति ।
त्वयि वा पुत्रवद् वस्तं यदि जातो महीपतेः॥30॥

पित्याने राज्य दिलेले न इच्छी भरत शासण्या ।
पुत्रवत तुझ्यासंगे राहणेही न इच्छील तो ॥30॥
यद्यपि त्वं क्षितितलाद् गगनं चोत्पतिष्यसि ।
पितृवंशचरित्रज्ञ: सोऽन्यथा न करिष्यति ॥31॥
पृथ्वी सोडुनि आकाशी तू जाशील तरीहि तो ।
पितृकुल आचारा विरुद्ध न जाईल कधी ॥31॥
तत त्वया पुत्रगर्धिन्या पुत्रस्य कृतमप्रियम।
लोके नहि स विद्येत यो न राममनुव्रत:॥32॥

पुत्राचे करिता प्रिय करसी अप्रिय वास्तवे ।
संसारि नसे पुरुष श्रीरामभक्त जो नसे ॥32॥

द्रक्ष्यस्यद्यैव कैकेयि पशुव्यालमृगद्विजान् ।
गच्छत: सह रामेण पादपांश्च तदुन्मुखान् ॥33॥

पाहशिल तू कैकेयी पशु सर्प पक्षी मृग ।
वनी जाती वृक्षसुद्धा उत्सुक जाण्या सवे ॥34॥

अथोत्तमान्याभरणानि देवि देहि स्नुषायै व्यपनीय चीरम् ।
न चीरमस्या: प्रविधीयतेति न्यवारयत् तद् वसनं वसिष्ठ: ॥34॥

स्नुषा असे जानकि तिज देई उत्तम वस्त्रे वल्कला सोडुनी ।
न योग्य वल्कल तिला म्हणून वसिष्ठ थाम्बवीती नेसण्या॥34॥

एकस्य एकस्य रामस्य वने निवासस्त्वया वृत: कैकयराजपुत्रि॥
विभूषितेयं प्रतिकर्मनित्या वसत्वरण्ये सह राघवेण ॥35॥

केवळ रामास वनी निवास वदलीस तू कैकेयराजपुत्री।
नसे सीतेस नित्यकर्मास्तव ती राहिल विभूषित श्रीरामासवे ॥35॥

यानैश्च मुख्यै: परिचारकैश्च सुसंवृता गच्छतु राजपुत्री ।
वस्त्रैश्च सर्वै: सहितैर्विधान नेयं वृता ते वरसम्प्रदाने ॥36॥

योग्य वाहन सेवक तशी आभूषणे वस्त्रे उपकरणे ही तशी।
यासवे जाईल ती तिच्या वनवासाची चर्चा न केली होतीस तू ॥36॥

तस्मिंस्थथा जल्पति विप्रमुख्ये गुरौ नृपस्याप्रतिमप्रभावे ।
नैव स्म सीता विनिवृत्तभावा प्रियस्य भर्तुं प्रतिकारकामा ॥37॥

ऐसे जरी म्हणति विप्रमुख्य वसिष्ठ प्रभावशाली अप्रतिम ।
तरी पतिसमान वेषभूषा सीता करी वल्कल धारिणी ती ॥37॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तत्रिंश: सर्ग: ॥37॥

अयोध्याकाण्ड सर्ग 38

तस्यां चीरं वसानायां नाथवत्यामनाथवत ।
प्रचुक्रोश जन: सर्वो धिक त्वां दशरथं त्विति ॥1॥
वल्कले नेसली सीता अनाथ असल्यापरी ।
पाहूनी लोक दु:खाने दशरथा धिक्कारती ॥1॥
तेन तत्र प्रणादेन दु:खत: स महीपति:।
चिच्छेदजीविते श्रद्धां धर्मे यशसि चात्मन:॥2॥

स नि:श्वस्योष्णमैक्ष्वाकस्तां भार्यामिदब्रवीत ।
कैकेयि कुशचीरेण न सीता गन्तुमर्हति ॥3॥

त्यांच्या ध्वनिने दु:खी महाराज दशरथ ।
सोडती श्रद्धा आपल्या यश धर्म जिवनाचिही ॥2॥
उष्णश्वास घेउनि ते बोलति कैकेयीस असे ।
वल्कले नेसुनि सीता वनी जाण्या न योग्य ती ॥3॥

सुकुमारी च बाला च सततं च सुखोचिता।
नेयं वनस्य योग्येति सत्यमाह गुरुर्मम ॥4॥

कोमल असे बाला ती सदैव सुखात राहिली ।
वनी जाण्या नसे योग्य जसे गुरुनी बोलले॥4॥

इयं हि कस्यपि करोति किंचित तपस्वनी राजवरस्य पुत्रे।
या चीरमासाद्य जनस्य मध्ये स्थिता विसंज्ञा श्रमणीव काचित ॥5॥

तपस्विनी जनकपुत्रि कुणा कशास देईल त्रास असे राजकुळातली ती ।
तिला नेसुनि वल्कले जनांसमोर भिक्षुकीसम उभी राहण्या लागे ॥5॥

चीराण्यपास्याज्जनकस्य कन्या नेयं प्रतिज्ञा मम दत्तपूर्वा ।
यथासुखं गच्छतु राजपुत्री वनं समग्रा सह सर्वरत्नै:॥6॥

सोडूनि वल्कले अश्या रूपात वनी जासि असे न बोललो मी ।
सम्पूर्ण वस्त्रे अलंकारासवेच रत्नासवे जाउनि सुखी रहा तू ॥6॥

अजीवनाण मया नृशंसा कृता प्रतिज्ञा नियमेन तावत ।
त्वया हि बाल्यात प्रतिपन्नमेतत तन्मा दहेद् वेणुमिवात्मपुष्पम् ॥7॥

न राहण्या जीवित मी तुझ्या राहूनि वचनी प्रतिज्ञा करि खडतर ।
अज्ञानि तूही वल्कले तिला नेसवीसि माझी प्रतिज्ञा मज जाळिते जणु ॥7॥

रामेण यदि ते पापे किंचित्कृतमशोभितम् ।
अपकार: क इह ते वैद्रह्या दर्शितोऽधमे ॥8॥

अधमे जरि रामाने केला अपराध तुझा कधी ।
दाखवी काय वैदेही सीतेचा अपराध तो ॥8॥

मृगीवोत्फुल्लनयना मृदुशीला मनस्विनी ।
अपकारं कमिव ते करोति जनकात्मजा ॥9॥

मृगीसम नेत्र जिचे स्वभावे मधुर कोमल ।
जनकनंदिनी ऐसी अपकारि तुला कसे ॥9॥

ननु पर्यप्तमेवं ते पापे रामविवासनम् ।
किमेभि: कृपणेर्भूय: पातकैरपि ते कृते ॥10॥

रामास वनि धाडूनी घडता पाप पुरेपुर ।
कशास्तव नेसवुनी वल्कले पातकी भर ॥10॥

प्रतिज्ञातं मया तावत् त्वयोक्तं देवि श्रुण्वता ।
रामं यदभिषेकाय त्वमिहागतमब्रवी ॥11॥

श्रीराम अभिषेकास येता तू वदलीस जे ।
ऐकुनीया प्रतिज्ञा मी तेव्हां तैसीच केलि मी॥11॥

तत्त्वेतत् समतिक्रम्य निरयं गन्तुमिच्छसि ।
मैथिलिमपि या हि त्वमीक्षसे चीरवासिनीम् ॥12॥

प्रतिज्ञेस उल्लंघून जानकीलाहि वल्कले ।
धारिता पहाण्या इच्छी नरकात जाशील तू ॥12॥

एवं ब्रुवन्तं पितरं रामः सम्प्रस्थितो वनम् ।
अवाक्शिरसमासीनमिदं वचनमब्रवीत् ॥13॥

मान खाली घालुनिया बैसलेल्या दशरथा ।
वनि जाया निघालेला राम ऐसे वदे पित्या ॥13॥

इयं धार्मिक कौसल्या मम माता यशस्विनी ।
वृद्धा चाक्षुद्रशीला च न च त्वां देव गर्हते ॥14॥

मया विहीनां वरद प्रपन्नां शोकसागरम् ।

अदृष्टपूर्वव्यसनां भूयः सम्मतुमर्हसि ॥15॥

मम माता कौसल्या स्वभावे उच्च उदार जी।

वृद्ध होई कधी निंदा आपली न करीतसे ॥14॥

अपूर्व अश्या संकटी मी सोडुनिया जाता तिला ।

दु:खसागरी बुडेल तिला अधिक आदरा ॥15॥

पुत्रशोकं यथा नछेत् त्वया पूज्येन पूजिता ।

मां हि संचिन्तयन्ती सा त्वयि जीवेत् तपस्विनी ॥16॥

पूज्य आपण सन्मान करिता पुत्रशोक तिला ।
जाणवेल न राहील जीवित ती तपस्विनी ॥16॥
इमां महेन्द्रोपम जातगर्धिनी तथा विधातुं जननीं ममार्हसि ।
यथा वनस्थे मयि शोककर्शिता न जीवितं न्यस्य यमक्षयं व्रजेत ॥18॥
सदा राहील उत्सुक मज भेटण्या ती शोकग्रस्त प्राणां न त्यजो।
म्हणूनि ऐश्या स्थितीत तिज ठेवा ज्यामुळे न शंका अशी उद्धवेल ॥18॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्म्कीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टात्रिंश: सर्ग: ॥38॥

अयोध्याकाण्ड सर्ग 39

रामस्य तु वच: श्रुत्वा मुनिवेषधरं च तम् ।
समीक्ष्य सह भार्याभी राजा विगतचेतस:॥1॥

मुनिवेषधारि रामास पाहुनी वचन बोलता ।
स्त्रियांसमवेत राजा शोके बेशुद्ध होतसे ॥1॥

नैनं दु:खेन संतप्त: प्रत्यवैक्षत राघवम् ।
न चैनमभिसम्प्रेक्ष्य प्रत्यभाषत दुर्मना: ॥2॥

दु:खे संतप्त झाल्याने रामा पाहू न शके ।
आणि पहाता दु:खाने उत्तर देऊ न शके ॥2॥

स मुहूर्तमिवासंज्ञो दु:खितश्च महीपति:।
विललाप महाबाहू राममेवानुचिन्तयन् ॥3॥

बेशुद्ध काही काळ येता शुद्धि महीपती ।
महाबाहु श्रीरामाच्या विचारे रूदन करी ॥3॥

मन्ये खल मया पूर्वं विवत्सा बहव: कृता:।
प्राणिनो हिंसिता वापि तन्मामिंदमुपस्थितम् ॥4॥

वाटे पूर्वजन्मी मी पाडसां गाइपासुनी ।
दूर केले असावे वा प्राणिहिंसा मजहातुनी ।
असावी घडलि त्याचे फळस्वरुप संकट ॥4॥

न त्वेवानागते काले देहाच्च्यवति जीवितम् ।
कैकेय्या क्लिश्यमानस्य मृत्र्मम न विद्यते ॥5॥

वेळ आल्याविना प्राण देहा नच सोडतो ।
म्हणुनि कैकयीक्लेशे मृत्यु न होतसे मम ॥5॥

योऽहं पावकसंकाशं पश्यामि पुरत: स्थितम् ।

विहाय वसने सूक्ष्मे तापसाच्छादमात्मजम् ॥6॥

अग्नीसम तेजस्वी पुत्रा पुढती पाहतो ।

त्यागुनी रेशमी वस्त्रे वल्कले तापस नेसुनी ॥6॥

एकस्या: खलु कैकय्या: कृतेऽयं खिद्यते जन:।

स्वार्थे प्रयतमानाया: संश्रित्य निकृतिं त्विमाम् ॥7॥

वराचा मम आश्रय घेउनी स्वार्थ साधुनी ।

कैकेयीच्या प्रयत्ने या दु:खात जनसर्व हे ॥7॥

एवमुक्त्वा तु वचनं बाष्पेण विजतेंद्रिय:।

रामेति सकृदेवोक्त्वा व्याहर्तुं न शशाक स:॥8॥

बोलता एवढे अश्रू येती शीथिल इन्द्रिये ।

एकदा उच्चारुनी राम मूर्च्छित बोलु ना शके ॥8॥

संज्ञां तु प्रतिलभ्यैव मुहूर्तात स महीपति:।

नेत्राभ्यामश्रुपूर्णाभ्यां सुमन्त्रमिदमब्रवीत॥9॥

काही काळानंतर शुद्ध येउनि सुमन्त्राकडे ।

अश्रुपूर्ण नेत्रे बघुनी महाराज बोलती असे ॥9॥

औपवाह्यं रथं युक्त्वा त्वमायाहि हयोत्तमै:।

प्रापयैनं महाभागमितो जनपदात् परम् ॥10॥

अश्व उत्तम जोडोनी रथ योग्य आणूनिया ।

जनपदातुन बाहेर रामा सोडी बसवुनी ॥10॥

एवं मन्ये गुणवतां गुणानां फलमुच्यते ।

पित्रा मात्रा च यत्साधुर्वीरो निर्वास्यते वनम् ॥11॥

मातापिता वनी श्रेष्ठ पुत्रास आपुल्या धाडती ।

वाटे गुणवान पुरुषां फल शास्त्रात हे असे ॥11॥

राज्ञो वचनमाज्ञाय सुमन्त्रः शीघ्रविक्रमः।

योजयित्वा ययौ तत्र रथमश्वैरलंकृतम् ॥12॥

ऐकुनी वचन राजाचे सुमन्त्र शीघ्र जाउनी ।
रथ उत्तम अश्वांनी सुशोभित आणवी तिथे ॥12॥

तं रथं राजपुत्राय सूत: कनकभूषितम् ।
आचचक्षेऽञ्जलिं कृत्वा युक्त परमवाजिभि: ॥13॥

सुवर्णभूषित रथ उत्तम अश्व जोडुनी ।
राजपुत्रास्तव बोले सुमन्त्र हात जोडुनी ॥13॥

राजा सत्वरमाहूय व्यापृतं वित्तसंचये ।

उवाच देशकालज्ञो निश्चितं सर्वत: शुचि:॥14॥

देशकालज्ञ बोलावी राजा कोषाध्यक्षा त्वरे ।
धनसंग्रह व्यापारा नियुक्त त्याला निश्चित ॥14॥

वासांसि च वराहाणि भूषणानि महान्ति च ।
वर्षाण्येतानि संख्याय वैदेह्या: क्षिप्रमानव: ॥15॥

वस्त्रे बहुमूल्य महान आभूषणे विदेहकुमारीस ।
पर्याप्त चौदा वर्षे मोजुनी त्वरित मागवा ॥15॥

नरेंद्रेणैवमुक्तस्तु गत्वा कोशगृहं तत:।

प्रायच्छत सर्वमाहत्य सीतायै क्षिप्रमेव तत ॥16॥

सांगता हे नरेंद्राने कोषाध्यक्ष जाउनी त्वरे ।

सर्व वस्तु आणुनि त्या सीतेस समर्पित ॥16॥

सा सुजाता सुजातानि वैदेही प्रस्थिता वनम् ।

भूषयामास गात्राणि तैर्विचित्रर्विभूषणै: ॥17॥

उत्तम कुलत्पन्न वैदेही निघता वनी ।

भूषवी सुन्दर देहां बहुमूल्य आभूषणे ॥17॥

व्यराजयत वैदेही वेश्म तत सुविभूषिता ।

उद्यतोऽशुमत: काले खं प्रभेव विवस्वत:॥18॥

प्रात:काली उदित सूर्य आकाशास भूषवि जसा ।
आभूषणे विभूषित सीता भूषवी गृह आपुले ॥18॥

तां भुजाभ्यां परिष्वज्य श्वश्रूर्वचनमब्रवीत ।
अनाचरन्तीं कृपणं मुर्युपाघ्राय मैथिलीम् ॥19॥

कौसल्या छातीजवळी घेत सीतेस हुंगुनि ।
सदाचरणी सदैव बोले वचन हे तिज ॥19॥

असत्य: सर्वलोकेऽस्मिन् सततं सत्कृता: प्रियै:।

भर्तारं नानुमन्यन्ते विनिपातगतं स्त्रिय:॥20॥

सम्मानित पतिद्वारा न त्या संकटि आदरी।

सम्पूर्ण जगती स्त्रीला असती म्हणुनी जाणती ॥20॥ (असती न सती।

एष स्वभावो नारीणामनुभूय पुरा सुखम् ।

अल्पामप्यापदं प्राप्य दुष्यान्ति प्रजहत्यपि ॥21॥

सुख भोगति अशा नारी यथेष्ट पतिपासुनी ।

विपत्तीत तया दोष देउनी साथ सोडती ॥21॥

असत्यशीला विकृता दुर्गा अहृदया: सदा ।

असत्य: पापसंकल्पा: क्षणमात्रविरागिण: ॥22॥

असत्य विकृता दुर्गा निर्दयी पापकल्पिणी ।
अल्पकारणे होती विरक्त पतीप्रति ॥22॥

न कुलं न कृतं विद्या न दत्तं नापि संग्रह:।
स्त्रीणां गृह्णाति हृदयनित्यहृदया हि ता: ॥23॥

कुल उत्तम उपकार विद्या भूषण दान हे।
भावते न स्त्रियां ऐशा निर्मम हृदयामुळे ॥23॥

साध्वीनां तु स्थितानां तु शीले सत्ये श्रुते स्थिते ।

स्त्रीणां पवित्रं परमं पतिरेको विशिष्यते ॥24॥

राहती ज्या सदाचारी कुलोचित शास्त्र पाळुनी ।
पति हाच सर्वस्व पवित्र त्यां श्रेष्ठ देवता ॥24॥

स त्वया नावमन्तव्य: पुत्र: प्रव्राजितो वनम् ।
तव देवसमस्त्वेष निर्धन: सधनोऽपि वा ॥25॥

मम पुत्र वनी प्रेषित अनादर त्याचा न करी ।
असो निर्धन वा सधन देवतातुल्य परी तुला ॥25॥

विज्ञाय वचनं सीता तस्या धर्मार्थसंहितम् ।

कृत्वाञ्जलिमुवाचेदं श्वश्रूमभिमुखे स्थिता: ॥26॥

धर्मार्थ युक्त वचना सासूच्या ऐकुनी तिच्यापुढे ।

हात जोडुनिया बोले सीता वचना अश्या ॥26॥

करिष्ये सर्वमेवाह्मार्या यदनुशास्ति माम् ।

अभिज्ञास्मि यथा भर्तुर्वर्तितव्यं श्रुतं च मे ॥27॥

आपला पालन उपदेश पूर्णरूपे करीन मी ।

पतीसवे वर्तेन मजला विदित जे असे ॥27॥

न मामसज्जनेनार्यां समानयितुमर्हति ।

धर्माद् विचलितुं नाहमलं चन्द्रादिव प्रभा ॥28॥

असज्जन स्त्रियांसम मज समजू नका आपण ।

न सोडीन पत्निधर्म जशी चन्द्राला प्रभा ॥28॥

नातम्त्री वाद्यते वीणा नाचक्रो विद्यते रथ:।

नापति: सुखमेधेत या स्यादपि शतात्मजा ॥29॥

तारेविण न वाजे वीणा चक्राविण चालतो न रथ ।

तशी शतपुत्रांची माता पतीविण नसे सुखी ॥29॥

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुत:।

अमितस्य तु दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥30॥

पिता भ्राता आणि पुत्र देती जे सुख परिमित ।
पति दे अपरिमित कोणती स्त्री न पूजि त्या ॥30॥

साहमेवंगता श्रेष्ठा श्रुतधर्मपरावरा ।
आर्ये किमवमन्येयं स्त्रिया भर्ता हि दैवतम् ॥31॥

श्रेष्ठ स्त्रिया तशी माता यांकडून धर्मज्ञान मी ।
मिळता का अवमानीन स्त्रीला भर्ताच दैवत ॥31॥

सीतायां वचनं श्रुत्वा कौसल्या हृदयङ्गमम् ।

शुद्धसत्त्वा मुमोचाश्रु सहसा दु:ख हर्षज, ॥32॥

ऐकुनी वचन सीतेचे कौसल्या मनि शुद्ध जी ।

दु:ख आणखि आनंदे अश्रुपात करु लागली ॥32॥

तां प्राञ्जलिरभिप्रेक्ष्य मातृमध्येऽतिसत्कृताम् ।

राम: परमधर्मात्मा मातरं वाक्यमब्रवीत् ॥33॥

सम्मानित मातांमध्ये उभ्या मातेस आपुल्या ।

श्रीराम हात जोडूनी धर्मात्मा बोलु लागला ॥33॥

अम्ब मा दु:खिता भूत्वा पश्येस्त्वं पितरं मम ।

क्षयोऽपि वनवासस्य क्षिप्रमेव भविष्यति ॥34॥

वनवासाकारण म्हणूनी नको पाहुस दु:खे पित्या ।
अवधी वनवासावा संपेलच शीघ्रही ॥34॥

सुप्तायास्ते गमिष्यन्ति नव वर्षाणि पञ्चच ।
समग्रमिहं सम्प्राप्तं मां द्रक्ष्यसि सुहृद्वृतम् ॥35॥

चौदा वर्षे जातील झोपेतच झोपता तुझ्या ।
उठता पाहशील मला सीता लक्ष्मण सुहृदांसवे ॥35॥

एतावदभिनीतार्थमुक्त्वा स जननी वच:।

त्रय: शतशतार्धा हि ददर्शावेक्ष्य मातर:॥36॥

ताश्चापि स तथैवार्तां मातृर्दशरथात्मज:।

धर्मयुक्तमिदं वाक्यं निजगाद कृताञ्जलि:॥37॥

मातेस बोलुनि ऐसे इतर साडेतीनशे ।

मातांकडे दृष्टिक्षेप टाकी शोकाकुल तयां ॥36॥

कौसल्येसम पाहूनी हात जोडुनि तयां ।

श्रीराम सांत्वना देई धर्मयुक्त वचे तयां ॥37॥

संवासात् परुषं किंचिदज्ञानादपि यत् कुलम् ।

तन्मे समुपजानीतं सर्वाश्चामन्त्रयामि वः ॥38॥

राहता सदा एकत्र अज्ञाने अपराध मी ।

केला असेल तर क्षमा करा मज निरोप द्या ॥38॥

वचनं राघवस्यैतद् धर्मयुक्तं समाहितम् ।

शुश्रु वुस्ताः स्त्रियः सर्वाः शोकोपहतचेतसः॥39॥

राघवाचे धर्मयुक्त असे वचन ऐकुनी ।

स्त्रियाचे त्या मन होई शोकाने अतिव्याकुळ ॥39॥

जज्ञोऽथ तासां संनादः क्रौञ्चीनामिव निस्वनः ।

मानवेन्द्रस्य भार्याणामेवं वदति राघवे ॥40॥

श्रीराम वचन ऐकूनी त्या क्रौन्च पक्षिणींपरी ।

आक्रंदति सर्व माता नादे भवन भारित ॥40॥

मुरजपणवमेघघोषवद् दशरथवेश्म बभूव यत् पुरा ।

विलपितपरिदेवनाकुलं व्यसनगतं तद्भूत् सुदु:खितम् ॥41॥

मुरज पणव मेघ आदि वाद्ये दशरथभवन जे भरुनि जातसे ।

तेच विलाप रुदन यांनि भरूनी संकटमय दु:खे भरलेले दिसे ॥41॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकांडे एकोनचत्वारिंश: सर्ग: ॥39॥

अयोध्याकाण्ड सर्ग 40

अथ रामस्य सीता च लक्ष्मणश्च कृताञ्जलि:।
उपसंगृह्य राजानं चक्रुर्दीना: प्रदक्षिणम् ॥1॥
तदा राम लक्ष्मण सीता दीनभावे कृताञ्जली ।
चरणस्पर्श राजास करती प्रदक्षिणा तशी ॥1॥
तं चापि समनुज्ञाप्य धर्मज्ञ: सह सीतया ।
राघव: शोकसम्मूढो जननीमभ्यवादयत ॥2॥

निरोप घेउनि त्यांचा मातेचे दु:ख पाहुनी ।
शोकव्याकुल होऊनी प्रणाम करती तिला ॥2॥

अन्वक्षं लक्ष्मणो भ्रातु: कौसल्यामभ्यवादयत ।
अपि मातु: सुमित्राया जग्राह चरणौ पुन: ॥3॥

त्यानंतर प्रणाम करुनी कौसल्येस लक्ष्मण ।
आपुली जननी सुमित्रा चरणस्पर्श तिचा करी ॥3॥

तंवन्दमानं रुदती माता सौमित्रिमब्रवीत ।
हितकामा महाबाहं मूर्युपाघ्राय लक्ष्मणम ॥4॥

लक्ष्मण आपला पुत्र प्रणाम करि पाहुनी ।
सुमित्रा मस्तक चुंबी आणि त्यास वदे अशी ॥4॥

सृष्टत्वं वनवासाय स्वनुरक्त: सुहृज्जने ।
रामे प्रमादं मा कार्षी: पुत्र भ्रातरि गच्छति ॥5॥

श्रीरामाचा अनुरागी भक्त तू म्हणुनी तुला ।
पाठवते वनि त्याच्या सेवेत प्रमाद न करी ॥5॥

व्यसनी वा समृद्धो वा गतिरेष तवानघ ।
एष लोके सतां धर्मो यज्ज्येष्ठवसहगो भवेत ॥6॥

संकटि वा समृद्धीत आदर्श तो तुजला असे ।
ज्येष्ठ भ्रात्या अनुसरणे धर्म हाच असे इथे ॥6॥

इदं हि वृत्तमुचितं कुलस्यास्य सनातनम् ।
दानं दीक्षा च यज्ञेषु तनुत्यागो मृधेषु हि ॥7॥

यज्ञी दीक्षा करणे दान रणी शरीर त्यागणे ।
कुलाचा या उचित हा सनातन आधार असे ॥7॥

लक्ष्मणं त्वेवमुक्तासौ संसिद्धं प्रियराघवम् ।
सुमित्रा गच्छ गच्छेति पुनः पुनृवाच तम् ॥8॥

लक्ष्मणा म्हणुनी ऐसे सिद्ध जाण्यास राघवा ।
मङ्गल आशिष देत लक्ष्मणास पुम्हा वदे ॥8॥

रामं दसहरथं विद्धि माम विद्धि जनकात्मजाम् ।
अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात यथासुखम् ॥9॥

रामा दशरथ मानी तू सीतेस माता तव ।
वना अयोध्या मानी करी प्रस्थान आता सुखे ॥9॥

ततः सुमन्त्रः काकुत्स्थं पाञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ।
विनीतो विनयज्ञश्च मातलिसवं यथा ॥10॥

ककुत्स्थकुल रामास मातलि इंद्रा जसा ।
सुमन्त्र हात जोडून विनयपूर्वक म्हणतसे ॥10॥
रथमारोह भद्रं ते राजपुत्र महायश:।
क्षिप्रं त्वां प्रापयिष्यामि यत्र मा राम वक्ष्यसे ॥11॥
कल्याण असो श्रीरामा रथी बैसा महायशा ।
श्रीराम सांगतिल तेथे सोडीन आपणा सत्वर ॥11॥
चतुर्दश हि वर्षाणि वस्तव्यानि वने त्वया ।
तान्युपक्रमितव्यानि यानि देव्या प्रचोदित:॥12॥

आजपासुनि वर्षांची गणना चौदा होण्या सुरू ।
कैकेयीदेवीने आजच सांगितले जाण्या असे ॥12॥

तं रथं सूर्यसंकाशं सीता हृष्टेन चेतसा ।
आरुरोह वरारोहा कृत्वालंकारमात्मन: ॥13॥

अलंकार धारुनी उत्तम तेजस्वी सूर्यासम रथी ।
प्रसन्न चित्त आरूढ सीता सुन्दरि होतसे ॥13॥

वनवासं हि संख्याय वासांस्याभरणानि च ।
भर्तारमनुगच्छन्त्यै सीतायै श्वशुरो ददौ ॥14॥

पतीसह जाता सीतेस श्वशुरे वस्त्रे आभूषणे ।
वर्षसंख्येनुसारेण दिली होती बरोबर ॥14॥

तथैवायुधजातानि भ्रातृभ्यां कवचानि च ।
रथोपस्थे प्रविन्यसय सचर्मं कठिनं च यत ॥15॥

बधूद्वयां तसेच अस्त्रे शस्त्रे कवचे तशी ।
रथात ठेवुनी मागे चर्मपेटी कुदळीसह ॥15॥

अथो ज्वलनसंकाशं चामीकरविभूषितम ।
तमारुरुहतुस्तूर्णं भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥16॥

दीप्तिमान जणू अग्नी सम दोघे त्यानंतर ।
रथी होति आरूढ सुवर्ण भूषित जो असे ॥16॥

सीतातृतीयानारूढा दृष्ट्वा रथमचोदयत ।
सुमन्त्रः सम्मतानश्वान् वायुवेगसमाजवे ॥17॥

सीता तिसरी त्यात रथारूढ हो पाहुनी ।
सुमन्त्र वायुवेगाने रथाश्वांना दौडवी ॥17॥

प्रयाते तु महारण्यं चिररात्राय राघवे ।
बभूव नगरे मूर्छा बलमूर्छा जनस्य च ॥18॥

दीर्घ काल अरण्यात जाण्या निघता राघव ।
पुरवासी दर्शनार्थी सर्व मूर्छित लोक ते ॥18॥

ततः समाकुलसम्भ्रान्तं मत्तसंकुपितद्विपम् ।
हयसिञ्चितनिर्घोषं पुरमासीन्महास्वनम् ॥19॥

पुरवासी व्याकुळ होती मत्त गज अश्वही तसे ।
धावती ध्वनि त्यासंगे आभूषणांचा होतसे ॥19॥

ततः सबालवृद्धा सा पुरी परमपीडिता ।
राममेवाभिदुद्राव घर्तिः सलिलं यथा ॥20॥

आबालवृद्ध पुरीतील मागे धावति पीडित ।
रामाकडे जसे व्याकुळ उष्म्याने पाण्याकडे ॥20॥

पार्श्वत:पृष्ठतश्चापि लम्बमानास्तदुन्मुखा:।
बाष्पपूर्णमुखा: सर्वे तमच शनि:स्वना:॥21॥

रथामागे पुढे काही पकडुनि राहती जन ।
पाण्याने भरुनी डोळे उच्चरवे म्हणती असे ॥21॥

संयच्छ वाजिनां रश्मीन् सूत याहि शनै: शनै: ।
मुखं द्रक्ष्याम रामस्य दुर्दर्श नो भविष्यति ॥22॥

लगाम खेचुनिया सूता रथ चालवि हळू हळू ।
रामाचे मुख पाहूदे भविष्यात जे दुर्लभ ॥22॥

आयसं हृदयं नूनं राममातुरसंशयम् ।
यद् देवगर्भप्रतिमे वनं याति न भिद्यते ॥23॥

निश्चित हदय मातेचे लोहाचे बनले असे ।
जाता देवतुल्य पुत्र वनी जे नच भंगते ॥23॥

कृतकृत्या हि वैदेही छायेवानुगता पतिम् ।
न जहाति रता धर्मे मेरुमर्कप्रभा यथा ॥24॥

कृतार्थ असे वैदेही पतीसह छायेपरी ।
न त्यागे पतिला जैसी सूर्यप्रभा मेरुपर्वता ॥24॥

अहो लक्ष्मण सिद्धार्थः सततं प्रियवादिनम् ।
भ्रातरं देवसंकाशं यस्त्वं परिचरिष्यसि ॥25॥

लक्ष्मणा कृतार्थ तूही देवतुल्य बंधूसवे ।
सदा प्रिय वदे ऐशा राहून सेवशील त्या ॥25॥

महत्येषा हि ते बुद्धिरेष चाभ्युदयो महान् ।
एष स्वर्गस्थ मार्गस्य यदेमनुगच्छसि ॥26॥

असे तुझी बद्धि विशाल महान अभ्युदय हा तुझा ।
श्रीरामा अनुसरुनी मार्ग स्वर्गाचा तुज मिळे ॥26॥

एवं वदन्तस्ते सोढुं न शेकुर्बाष्पमागतम् ।
नरास्तमनुगच्छन्ति प्रियमिक्ष्वाकुनन्दनम् ॥27॥

वदती असे पुरवासी अश्रू आवरती न त्यां ।
इक्ष्वाकुनन्दनाच्या ते चालती पाठिमागुनी ॥27॥

अथ राजा वृत: स्त्रीभिर्दीनाभिर्दीनचेतन: ।
निर्जगाम प्रियं पुत्रं द्रक्ष्यामीति ब्रुवन् गृहात् ॥28॥

दयनीय दशा प्राप्त स्त्रियांसमवेत दशरथ ।
“पाहतो श्रीरामा मम” म्हणुनि बाहेरी निघे॥28॥
शुश्रुवे चाग्रत: स्त्रीणां रुदतीनां महास्वन:।
यथा नाद: करेणूमां बद्धे महति कुञ्जरे ॥29॥
आर्तनाद सर्व स्त्रियांचा पडे कानी तया जणु ।
चीत्कार हत्तिणींचा बान्धला जाता गजराज ॥29॥
पिता हि राजा काकुत्स्थ: श्रीमान् सन्नस्तदा बभौ ।
परिपूर्ण: शशी काले ग्रहेणोपप्लुतो यथा ॥30॥

श्रीरामपिता काकुत्स्थ खिन्न होत असे जणु ।
राहुग्रसित परिपूर्ण चंद्रमा तेजोहीन तो ॥30॥

स च श्रीमानचिन्त्यात्मा रामो दशरथात्मज:।
सूतं संचोदयामास त्वरितं बाह्यतामिति ॥31॥

पाहूनि अचिन्त्यात्मा राम दशरथपुत्र जो ।
सुमन्त्रा वेगाने रथ हाकण्या प्रेरित करी ॥31॥

रामो याहीति तं सूतं तिष्ठेति च जनस्तथा ।
उभयं नाशकत सूत: कर्तुमध्वनि चोदित: ॥32॥

थांबवीत जन सूतास राम सांगति त्वरा करी ।
सूत पडे दुग्ध्यात काही करू ना शके ॥32॥

निर्गच्छति महाबाहौ रामे पौरजनाश्रुभि:।
पतितैरभ्यवहितं प्रणनाश महीरज:॥33॥

नगराबाहेर श्रीराम जाताना अश्रुपात जो ।
पौरजन करिती त्याने उडती धूळ शान्त हो ॥33॥

रुदिताश्रुपरिधुनं हाहाकृतमचेतनम् ।
प्रयाणे राघवस्यासीत् पुरं परमपीडितम् ॥34॥

प्रस्थाने श्रीरामाच्या नगर पूर्ण पीडित ।
रडता जन सर्व अचेतन जणु होतसे ॥34॥

सुस्राव नयनै: स्त्रीणामस्त्रमायाससम्भवम् ।
मीनसंक्षोभचलितै: सलिलं पङ्कजैरिव ॥35॥

झरती खेदजनित अश्रु नारिनेत्रातुनी ।
कमलातूनि जलकणे जशी मासोळ्या हालता ॥36॥

दृष्ट्वा तु नृपति: श्रीमानेकचित्तगतं पुरम् ।
निपपातैव दु:खेन कृत्तमूल इव द्रुम: ॥36॥

पुरवासीया पाहूनि व्याकुलचित्त दशरथ ।
धरणीवर पडती दु:खे वृक्ष उन्मळुनी जसा॥36॥

ततो हलहलाशब्दो जज्ञे रामस्य पृष्ठत: ।
नराणां प्रेक्ष्य राजानं सीदन्तं भृशदु:खितम् ॥37॥

राजास जाता अतिदु:खे पाहुनी जनांमध्ये जे ।
रामामागे जाती त्यांचा कोलाहल पुन्हा होतसे ॥37॥

हा रामेति जना: केचिद् राममातेति चापरे ।
अन्त:पुरसमृद्धं च क्रोशन्तं पर्यदेवयन् ॥38॥

अन्त:पुर स्त्रियांसंगे विलाप दशरथाचा ।
पाहुनि 'हा राम" कोणी "हा राममाता" क्रन्दती ॥38॥
अन्वीक्षमाणो रामस्तु विषण्णं भ्रान्तचेतसम् ।
राजानं मातरं चैव ददर्शानुगतौ पथि ॥39॥
मागे वळुनी पहाता दु:खातील पिता माता ।
पाठोपाठ येताना रामा दिसति मार्गात ॥39
स बद्ध इव पाशेन किशोरो मातरं यथा ।
धर्मपाशेन संयुक्त: प्रकाशं नाभ्युदैक्षत ॥40॥

बद्ध अश्वबालक जसे मातेस न पाहू शके ।
धर्मबंधने तसा राम मातेस स्पष्ट पाहि ना ॥40॥

पदातिनौ च यानाविदु:खाही सुखोचितौ ।
दृष्ट्वा संचोदयामास शीघ्रं याहिति सारथिम् ॥41॥

सुखोपभोगी पिता माता चालत येता पाहुनी ।
सारथ्या रथ वेगाने वदे श्रीराम हाकण्या ॥41॥

नहि तत पुरुषव्याघ्रो दु:खदर्शनं पितु:।
मातुश्च सहितुं शक्तस्तोत्नैर्नुन्न इव द्विप:॥42॥

गजराज अंकुश पीडा जशी सोसू न शके ।
दु:खद अवस्था त्यांची श्रीराम पाहू न शके ॥42॥

प्रत्यगारमिवायान्ती सवत्सा वत्सकारणात् ।
बद्धवत्सा यथा धेनू राममाताभ्यधावत ॥43॥

सवत्स धेनू जैसी संध्येस वत्सास्तव ।
धावे तशीच कौसल्या धावत होती रामाकडे ॥43॥

तथा रुदन्ती कौसल्यां रथं तमनुधावतीम् ।
क्रोशन्तीं राम रामेति हा सीते लक्ष्मणेति च ॥44॥

रामलक्ष्मणसीतार्थं सवन्तीं वारि नेत्रजम ।
असकृत प्रेक्षत स तां नृत्यन्तीमिव मातरम ॥45॥

धावता रथामागुनी कौसल्या रुदन करी ।
हे राम लक्ष्मण सीते आक्रोश ऐसा करी ॥44॥
राम सीता लक्ष्मणांस्तव अश्रुपात करीत ती ।
वेडेवाकडे धावता तिजला राम पहातसे ॥45॥

तिष्ठेति राजा चुक्रोश याहि याहीति राघव:।
सुमन्त्रस्य बभूवात्मा चक्रयोरिव यान्तरा ॥46॥

सुमन्त्रा थांबवी राजा श्रीराम शीघ्रता करी ।
चक्रात फसणाऱ्याची सुमन्त्राची गति होतसे ॥46॥

नाश्रौषमिति राजानमपालब्धोऽपि वक्ष्यसि ।
चिरं दु:खस्य पापिष्ठमिति रामस्तमब्रवीत् ॥47॥

विलम्बे पित्या दु:ख म्हणुनि वेग वाढवी ।
परत येता तयां सांग ऐकण्या न आले मला ॥47॥

स रामस्य वच: कुर्वन्नुज्ञाप्य च तं जनम् ।
व्रजतोऽपि हयान् शीघ्रं चोदयामास सारथि: ॥48॥

आदेश मिळता ऐसा लोकां परतवी सुत ।
घोड्यांना शीघ्र गतीने पळविण्या सुरू करी ॥48॥

न्यवर्तत जनो राज्ञो रामं कृत्वा प्रदक्षिणम् ।
मन:साप्याशुवेगेन न न्यवर्तत मानुषम् ॥49॥

फिरती परत लोक मने रामा प्रदक्षिणा।
करुनि जरी शरीरे परी मनाने रामासवे होति ते ॥49॥

यमिच्छेत् पुनरायातं नैनं दूरमनुव्रजेत् ।
इत्यमात्मा महाराजमूचुर्दशरथं वच:॥5॥॥

मन्त्री म्हणत राजास येवो लवकर तो पुन्हा ।
इच्छा करा ऐसी जाऊ नका आणखि मागुती ॥51॥

तेषां वच: सर्वगुणोपपन्न: प्रस्विन्नगात्र: प्रविषण्नरूप:।
निशम्य राजा कृपण: सभार्यो व्यवस्थितस्तं सुतमीक्षमाण:॥51॥

ऐकत त्यांचे बोल राजा सर्वगुणसंपन्न घामाने निथळत असे ।
दु:खाचे मूर्तिमान रूप दीनभावे पुत्रा पाही राण्यांसवे ॥51॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चत्वारिंश: सर्ग: ॥40॥

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.

श्याम कुलकर्णी
तुझी माझी मोटो

हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हमरी बारी
INSURANCE
STAMPING
IMMIGRATION
VISA

वाल्मिकीरामायण- ६

मराठी

श्याम कुलकर्णी






मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय भाग सातवा

www.esahity.com